कृषीवल

रायगड, बुधवार, दि. १० डिसेंबर २०२५

किंमत ४ ₹

## ‘मतचोरी ही देशविरोधी कृती’

**नवी दिल्ली :** आज निवडणूक आयोगावरही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने कब्जा केला आहे. मी निवडणुकीतील अनियमिततेचे पुरावे दिले. सरकार निवडणूक आयोगाशी संगनमत करून मतचोरी करत आहे, असं म्हणत आज लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. मंगळवारी लोकसभेत निवडणूक सुधारणेवर चर्चा झाली. यावेळी बोलताना राहुल गांधी म्हणाले की, आज शैक्षणिक संस्थांवर कब्जा केला गेला आहे. कुलगुरूंची नियुक्ती गुणवत्तेवर नाही तर, एका संस्थेशी संलग्नतेवर आधारित करण्यात आली आहे. सीबीआय आणि ईडी या संस्थांवरही त्या संघटनेशी संबंधित लोकांनी कब्जा केला आहे.

## राज्यात थंडीचा कडाका वाढला

**पुणे :** राज्यात डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यातच थंडीचा कडाका जाणवू लागला आहे. हवेतील गारव्यामुळे नागरिकांना दिवसाही ऊबदार कपडे घालण्याची वेळ आली आहे. मंगळवारी (दि. ९) राज्यातील बहुतांश भागातील किमान तापमानाचा उतरला असून, अहिल्यानगर येथे ७.४ अंश सेल्सियस इतक्या सर्वाधिक नीचांकी तापमानाची नोंद झाली आहे. येत्या काही दिवसात तापमानात घट होण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे.उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे महाराष्ट्र गारठला आहे. विदर्भातील गोंदिया, नागपूर, यवतमाळ या जिल्ह्यातील तापमानाचा पारा ९ अंश सेल्सिअसपर्यंत उतरला आहे. राज्यात ठिकठिकाणी रस्त्याच्या कडेला शेकोट्या पेटू लागल्या आहेत.

# ...अन् बिबट्या पळाला

- **बिबट्याचा वनविभागाला गुंगारा; ढिसाळ कारभारामुळे ग्रामस्थ संतप्त**
- **सात तासांनंतर रेस्क्यू टीम दाखल; ग्रामस्थांचा जीव टांगणीला**

### नागाव ग्रामस्थांमध्ये बिबट्याची दहशत



**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

**सकाळची वेळ... नागावकरांची कामाला जाण्याची लगबग... पर्यटनामुळे गजबजलेली कॉटेज्स...दिनक्रम सुरु झालेला असतानाच नागावमध्ये बिबट्या आल्याची चर्चा सुरु झाली. सर्वांच्याच फोनची रिंग वाजू लागली. तरुणांवर बिबट्याने हल्ला केल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. आणि, संपूर्ण नागावकर रस्त्यावर उतरले. अनेकांनी बिबट्याला बघितल्याची खात्री झाल्यानंतर वनविभाग तसेच पोलिसांना कळविण्यात आले. वनविभागाची टीम आली, त्यांना बिबट्या दिसला. मात्र, ढिसाळ नियोजनामुळे बिबट्याने वनविभागाला गुंगारा देत पलायन केले. ही नाट्यमय आणि वन विभागाचा ढिसाळ कारभार चव्हाट्यावर आणणारी घटना मंगळवारी (दि.९) नागाव वर्तक वाडीजवळ घडली.**

नागावमध्ये बिबट्याचा वावर असल्याची घटना सकाळी साडेनऊ वाजता घडली. मात्र, त्याला पकडण्यासाठी रेस्क्यू टीम रायगड जिल्ह्यात नसल्यामुळे त्यांना पुण्यामधून पाचारण करण्यात आले. सायंकाळी चार वाजता रेस्क्यू टीम नागावमध्ये दाखल झाली.

पान २ वर

> “संबंधित प्रशासनाने त्यांची जबाबदारी वेळीच ओळखून योग्य ती यंत्रणा राबवली असती, तर बिबट्याला जेरबंद करणे शक्य झाले असते. सध्या बिबट्याला पकडण्यासाठी वनविभाग, पोलीस, रेस्क्यू टीमची शोधमोहीम सुरू आहे. ग्रामस्थांनी घरात राहून प्रशासनास सहकार्य करावे. माझ्यासाठी आपल्या सर्वांची सुरक्षितता महत्त्वाची आहे.”
>
> – **हर्षदा मयेकर,** सरपंच, नागाव ग्रामपंचायत

### निष्क्रिय वनविभागाचा कारभार चव्हाट्यावर

बिबट्या पकडण्याच्या कार्यात वन विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांपेक्षा पोलिसांनी जास्त मेहनत घेतल्याचे चित्र दिसून आले. मात्र, वन विभागाच्या निष्क्रियतेमुळे समोर दिसणारा बिबट्या अलगत निसटून जात होता. सकाळपासून बिबट्याला पकडण्यात निष्क्रिय ठरलेल्या वन विभागाचा कारभार यानिमित्ताने चव्हाट्यावर आला. वन विभागाने इतरांवर जास्त विसंबून न राहता स्वत:चे प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी आणले असते तर बिबट्या सापडला असता. मात्र, ते न केल्यानेच बिबट्या पलायन करण्यात यशस्वी ठरल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. वनविभागाची टीम घटनास्थळी पोहोचल्यानंतर शोधमोहिम सुरू केली. मात्र, यंत्रणा आणि अपुरे कर्मचारी यामुळे शोधमोहिमेत अडथळा येत होता. वनविभागाच्या या कृतीने त्यांनी आपल्या निष्क्रीय कार्यप्रणालीचे प्रथम दर्शन दिले. मात्र, ग्रामस्थांनी बिबट्या घरातच असल्याचा दावा करीत वनविभागाची घिसाडघाई हाणून पाडली. वन विभागाकडे योग्य साधनसामुग्री नव्हती. आणलेले पिंजरेही योग्य ठिकाणी लावले नव्हते. अपुरे मनुष्यबळ आणि अप्रशिक्षित कर्मचारी यांच्यामुळे बिबट्या पळाला.

### ग्रामस्थ आक्रमक, अधिकाऱ्यांसोबत बाचाबाची

बिबट्याला पकडण्यासाठी सकाळपासून अत्याधुनिक साधनांविना शर्थीचे प्रयत्न वनविभागाकडून करण्यात आले. परंतु, बिबट्या हातावर तुरी देऊन पसार झाला. त्यामुळे आधीच भीतीच्या छायेखाली असणारे ग्रामस्थ आक्रमक झाले. दरम्यान, सकाळपासून प्रशासनाला सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थांवर पोलीस अधिकाऱ्यांनी अरेरावीची भाषा वापरत आता एकही ग्रामस्थ रस्त्यावर दिसला तर फोडून काढण्याची तंबी दिली. त्यामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी त्यांना जाब विचारल्याने बाचाबाची झाली. त्यामुळे काही काळ वातावरणात तणाव निर्माण झाला होता.

### आज शाळेला सुट्टी

**नागाव परिसरात बिबट्याने दहशत माजविल्याने मंगळवारी शाळा लवकर सोडण्यात आल्या. दरम्यान, विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता बुधवारी नागाव हद्दीत असणाऱ्या शाळांना सुट्टी देण्याचे आदेश मुख्याध्यापकांना देण्यात येतील. त्यामुळे मुलांनी घराबाहेर येणे टाळावे. शिक्षकांसह पालकांनीही याची नोंद घ्यावी, असे आवाहन राजिप माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी महारुद्र नाले यांनी केले आहे.**

> “नागाव हे पर्यटनस्थळ आहे. याठिकाणी नेहमीच पर्यटकांची वर्दळ असते. वर्षअखेर असल्यामुळे आता पर्यटकांची संख्या वाढणार आहे. परंतु, वनविभाग बिबट्याला पकडण्यात अपयशी ठरल्याने आता भीतीचे वातावरण आहे. सोशल मीडियावर बातम्या आणि व्हिडिओ व्हायरल झाल्यामुळे त्याचा परिणाम पर्यटन व्यवसायावर होण्याची शक्यता आहे. वनविभागाकडे जाळ्या आणि पिंजऱ्यांशिवाय अत्याधुनिक साधनसामुग्री नाही, याबाबत खेद व्यक्त करावासा वाटतो. बिबट्याला लवकरात लवकर जेरबंद करावे, एवढीच सर्व ग्रामस्थांची अपेक्षा आहे.”
>
> – **प्रसाद आठवले,** ग्रामस्थ नागाव

## पैशांसाठी काय पण?

# दळवींवर कॅशबॉम्ब

- **पैशांच्या गठ्ठ्यांसोबत आमदार दळवींचा व्हिडिओ व्हायरल**
- **शिंदे गट चवताळला; रस्त्यावर तमाशा केला**

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

ठाकरे गटाचे अंबादास दानवे यांनी आ. महेंद्र दळवी यांचा पैशांच्या गठ्ठ्यासोबत शेअर केलेल्या कथित व्हिडिओमुळे महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. या व्हिडिओमध्ये शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी नोटांच्या ढिगाऱ्यासोबत दिसत असल्याचा दावा करण्यात आला आहे. अंबादास दानवे यांनी टाकलेल्या व्हिडीओ बॉम्बने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे.

दरम्यान, अलिबाग तालुक्यातील शिंदे गट चांगलाच चवताळला असून, हे आरोप फेटाळून लावत आमदारांच्या पत्नीसह त्यांच्या बगलगच्च्यांनी रस्त्यावर निषेधाचा तमाशा केला. यावेळी दानवेंचे फोटो जाळून त्यांच्यावर शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी टीका केली. यावर दानवे यांनी व्हिडीओची शहानिशा पोलिसांनीच करावी, अशी मागणी केली आहे. या घटनेचे पडसाद अधिवेशनातही उमटले. तर, सत्ताधारी भाजपचे नेते सुधीर मुनगंटीवार यांनी या व्हिडिओची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांचा हा कथित व्हिडीओ एक्सवर पोस्ट केला. या व्हिडीओत नोटांचे बंडल दिसत आहेत. दानवे यांनी आरोप केल्यानंतर दळवींनी सुनील तटकरेंवर निशाणा साधला. तटकरे यांच्यावर मी आरोप केले होते. त्या रागातून त्यांनी हा व्हिडीओ दिला असावा, असा दावा महेंद्र दळवी यांनी केला आहे. सुनील तटकरे यांनीच हे सर्व केलं, असा थेट आरोपही दळवींनी केला आहे.या सरकारकडे फक्त शेतकरी कर्जमाफीला पैसा नाही. बाकी सगळं ओक्के आहे! जनतेला जरा सांगा मुख्यमंत्री फडणवीस आणि शिंदेजी, हे आमदार कोण आहेत आणि पैशांच्या गड्ड्यांसह काय करत आहेत? असा सवाल करत ठाकरेंचे नेते अंबादास दानवे यांनी एक व्हिडिओ ट्वीट केला आहे. व्हिडिओमध्ये शिंदेंचे आमदार महेंद्र दळवी असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

### पैशांचे बंडल अन् शिंदेंचा आमदार

नागपूरमध्ये राज्याचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. मंगळवारी हिवाळी अधिवेशनाचा दुसरा दिवस होता. अधिवेशनात सत्ताधारी विरोधकांमध्ये जुंपण्याआधीच ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी केलेल्या ट्वीटने खळबळ उडाली. अंबादास दानवे यांनी शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवींचा एक धक्कादायक व्हिडिओ ट्वीट केला. ज्यामध्ये ते पैशांच्या बंडलांसोबत दिसत आहेत. या कॅशबॉम्बने राज्यभरात खळबळ उडाली आहे. या पैशाच्या चौकशीची मागणी होत आहे.

### वादग्रस्त दळवी

अनेक प्रकरणांमुळे वादग्रस्त ठरलेले अलिबाग मतदारसंघातील शिवसेनेचे विद्यमान आमदार महेंद्र दळवी यांच्याविरोधात गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील सातही मतदारसंघांतील आमदारांमध्ये ते याबाबत आघाडीवर आहेत. घरगुती हिंसाचार, चोरी, मारामारी, जमीन हडप करणे, यासंदर्भात अलिबाग पोलीस ठाण्यात २०१० पासून दळवींविरोधात गुन्हे दाखल आहेत. गुन्ह्यांबाबतची माहिती त्यांनी निवडणूक प्रतिज्ञापत्रात दिली आहे. सर्वसामान्य जनतेतूनही आता नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

### दरोडा प्रकरणात हात?

अलिबाग तालुक्यात दरोडा टाकून दीड कोटींचा मुद्देमाल लुटल्याची घटना फेब्रुवारीमध्ये घडली होती. याप्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. यामध्ये आमदारांचे सुरक्षा रक्षक तसेच घरकाम करणाऱ्यांसह अन्य दोघांना म्हणजेच एकूण सहा जणांना पोलिसांनी अटक करुन मुद्देमालही जप्त करण्यात आला होता. या प्रकरणात स्थानिक आमदारांचे लागेबांधे असल्याच्या चर्चेनंतर आता आमदारसाहेबांचे गुन्हेगारांना आशीर्वाद देतानाचे फोटो प्रचंड व्हायरल झाले होते. लोकप्रतिनिधीच गुन्हेगारांना पोसण्याचे काम करीत असल्यामुळे सध्या रायगड जिल्ह्याच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आहे.



### ही आहेत कलमे

घरगुती हिंसाचार कायदा कलम १२, १८, १९, १९, २, २० भारतीय दंड संहितेचे कलम ३७९, जमीन महसूल कायदा १६७, १८२ भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, १४३, १४७, १४८, ४२७, ३२३, ५०४, ५०६, मु. पो. ॲक्ट ३७१, ३, १३५ ॲट्रॉसिटी ॲक्ट ३१, १०, ६.

### अलिबागची अस्मिता पणाला

आजपर्यंत रायगड जिल्ह्यात समाजकारणाचे राजकारण झाले. अलिबागला एक वेगळा इतिहास आहे. सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या नगरीत अनेक दिग्गज होऊन गेले. आजही अलिबागचे नाव जगाच्या नकाशावर पोहोचविण्यात अनेकांचे योगदान आहे. पर्यटनदृष्ट्या हे शहर विकसित होत आहे. सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा तसेच राजकीय क्षेत्रात नाव कमावलेल्या अलिबागला दळवींच्या या कृत्यामुळे डाग लागला असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरु आहे. या कथित व्हिडिओमुळे अलिबागची अस्मिता पणाला लागली असल्याचीही चर्चा जोर धरीत आहे.



## वेधक

### शिडीवरुन पाय घसरुन तरुणाचा मृत्यू

**रसायनी :** रसायनीतील लाडिवली गावात भाड्याने राहणाऱ्या संतोष करण वढीया (३०) हा मद्याच्या नशेत खोलीच्या पोटमाळ्यावरुन अगर लाकडी शिडीवरुन पाय घसरुन खाली पडला. दरम्यान, त्याच्या डोक्याच्या मागील बाजूस दुखापत झाल्याने त्यास औषधोपचारासाठी चौक ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, डॉक्टरांनी तपासून त्यास मयत घोषित केले. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली असून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि माळी तपास करीत आहेत.

### केंद्र सरकारचा इंडिगोला दणका

**नवी दिल्ली :** भारतात एका आठवड्यापासून इंडिगोची विमानसेवा कोलमडलेली आहे. अनेक ठिकाणी इंडिगोच्या विमानांचं उड्डाण रद्द होत आहे, तर काही ठिकाणी विमानांच्या उड्डाणाला विलंब होत आहे. त्यामुळे प्रवासी हैराण झाले आहेत. हजारो प्रवाशांना मनस्तापाला समोरं जावं लागत आहे. इंडिगो विमानसेवेच्या गोंधळावरून अनेक प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे. या सर्व प्रकाराबाबत इंडिगोने माफीदेखील मागितली. पण अद्यापही इंडिगोच्या गोंधळाची परिस्थिती पूर्वपदावर आलेली दिसत नाही. यानंतर आता केंद्र सरकारने ॲक्शन पान २ वर

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील देवघर परिसरात अल्पवयीन मुलीवर धमकी देत लैंगिक अत्याचार करण्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे.

इंस्टाग्रामवरून परिचय वाढवत मुरुड येथील आरोपीने मुलीच्या घरापर्यंत संपर्क साधत सोबत आली नाहीस तर तुझ्या आईचा जीव घेईन, अशी धमकी देऊन तिच्यावर मानसिक दबाव टाकला. भीतीच्या छायेत मुलीला जबरदस्ती फिरायला नेण्यात आले. मुलीने सातत्याने नकार दिल्यानंतरही आरोपीने नाही आलीस तर तुलाही मारून टाकीन, अशी धमकी देत तिला सोबत घेऊन जंगल भागात लैंगिक अत्याचार केला.

सायंकाळी मुलगी घरी परतल्यावर आईने विचारपूस केली असता तिने घडलेली घटना आईला सांगितली. त्यानंतर मुलीच्या आई-वडिलांनी क्षणाचाही विलंब न करता म्हसळा पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. तक्रार मिळताच पोलिसांनी अत्यंत वेगाने कारवाई करत अवघ्या दोन तासांत आरोपीला ताब्यात घेऊन बेड्या ठोकल्या. याप्रकरणी आरोपीवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाची दखल घेत जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे तसेच म्हसळा पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत पोलीस पथकाने दाखवलेल्या तत्परतेचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# तीनपदरी पुलावरुन एकेरी वाहतूक



● (छायाचित्र : शैलेश पालकर)

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

महाड ते पोलादपूरदरम्यान मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पांढरे पट्टे रेखाटण्याचे काम गेल्या काही दिवसांपासून प्रगतीपथावर आहे. यादरम्यान चांढवे ते पार्ले, लोहारे या तीन पदरी पुलावरील वाहतूक अचानक एकेरी सुरू झाल्याचे दिसून येत आहे. मात्र, या पुलावरील तडे गेलेल्या काँक्रिटीकरणाकडे महामार्ग बांधकाम विभागाकडून सपशेल दुर्लक्ष केले जात आहे.

मुंबई-गोवा महामार्गावर चांढवे ते पार्लेदरम्यान ओव्हरब्रिजनंतर टोलनाका असून, त्यापुढे लोहारेपर्यंत तीनपदरी रुंदीचे तीन ओव्हरब्रिज आहेत. गेल्या १५ दिवसांपासून या महामार्गावर पांढरे पट्टे रेखाटण्याचे काम सुरू आहे. या कामादरम्यान, किमान ५०० मीटर आधी वाहन चालकांना पुढे एकेरी पदरावरून वाहतूक सुरू करण्यात आल्याचे कोणतेही सूचना फलक न लावताच ज्या ठिकाणी पट्टे रंगविण्याचे काम सुरू आहे; त्याठिकाणी लाल रंगाचे बॅरीकेट्स उभारून तसेच एक केशरी रंगाचा इंडिकेटर लॅम्प लावून अचानक एकेरी मार्गिका दिसून वाहनचालकांची त्या एकेरी पदरावरून वाहन नेताना तारांबळ उडत असल्याचे दृश्य दिवसांतून अनेकदा दिसून येत आहे.

काही वेळा या लाल रंगाच्या फायबरच्या बॅरिकेट्सना वाहनांचा धक्का लागून ते उडविले जात आहेत. चांढवे टोलनाक्यापुढील पान २ वर

# उपेक्षितांचे ‘बाबा’ गेले!

**। पुणे । प्रतिनिधी ।**

कामगार, हमाल, माथाडी व कष्टकरी वर्गाच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने आवाज उठवणारा बुलंद आवाज, असंघटित कष्टकऱ्यांचे ज्येष्ठ नेते डॉ. बाबा आढाव (९६) यांचे निधन झाले. पुण्यातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना वृद्धापकाळाने सोमवारी रात्री आठ वाजून २५ मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली.



त्यांच्या पश्चात पत्नी शीला, असीम व अंबर ही दोन मुले आहेत. बाबा आढाव पत्नी शीला यांच्यासह पुण्यात बिबवेवाडी परिसरात वास्तव्यास होते. असीम हा अमेरिकेत बोस्टन येथे, तर अंबर हा कॅनडातील टोरँटो येथे वास्तव्यास आहे. बाबांची तब्येत बिघडल्याने काही दिवसांपूर्वीच ते पुण्यात परतले होते. हमाल पंचायतीचे संस्थापक डॉ. बाबा आढाव यांना फुफ्फुसामध्ये जंतू संसर्ग झाल्याने उपचारासाठी हृदयविकारतज्ज्ञ व फिजिशियन डॉ. अभिजित वैद्य यांच्या निगराणीखाली पुना हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागात काही दिवसांपूर्वी दाखल केले होते. उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले.

मंगळवारी दिवसभर त्यांचे पार्थिव पुण्यातील हमाल भवन येथे अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. सायंकाळी त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी जब तक सुरज चांद रहेगा बाबा तेरा नाम रहेगा...! अमर रहे अमर रहे बाबा तेरा नाम अमर रहे च्या घोषणा देत नागरिकांनी बाबांना अखेरचा निरोप दिला.


## पाच तरुणांना अडकवले लग्नाच्या फेऱ्यात | महिलेचे थरकाप उडवणारे कारनामे

# उरणमध्ये हनीट्रॅपचा सुळसुळाट

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण-पनवेल परिसरात सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांना प्रेमाच्या सापळ्यात ओढून त्यांच्या आयुष्याशी उद्ध्वस्त खेळ करणाऱ्या एका महिलेचा हनीट्रॅप रॅकेट अखेर उघडकीस आले आहे. लहान मुलीसह उरण परिसरात राहणारी ही महिला, चांगल्या घरातील, नोकरी-व्यवसाय करणाऱ्या तरुणांना इन्स्टाग्राम व फेसबुकवरून ओळख करून प्रेमाच्या नात्यात बांधते आणि नंतर पद्धतशीररित्या आर्थिक, मानसिक व कायदेशीर शोषण सुरू करते, अशी धक्कादायक माहिती तक्रारदारांकडून समोर आली आहे.

या महिलेने आजपर्यंत किमान पाच तरुणांशी विधीनुसार लग्न



केल्याचे गंभीर उघड झाले आहे. प्रेमाच्या नावाखाली तरुणांना राज्याबाहेर फिरायला नेले जाते, विश्वास संपादन केला जातो आणि नंतर उरण येथीलच तिच्या राहत्या घरात विधीवत हार घालून लग्नाची नाटकी प्रक्रिया केली जाते. या सर्व ‘लग्नांसाठी’ ही महिला पेण तालुक्यातील एकाच भटजीला वारंवार बोलावते, अशी माहिती तक्रारीत नमूद करण्यात आली आहे.

या सर्व हनीट्रॅप रॅकेटमध्ये महिलेबरोबरच तिचा भाऊ आणि एक तरुण मित्र सक्रिय भूमिका बजावत असल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. प्रेमाच्या नात्यात विश्वास बसल्यानंतर ही महिला तरुणांकडून लाखो रुपयांची खंडणी उकळण्यास सुरुवात करते. खंडणी न दिल्यास, ती स्वत:वर बलात्काराची खोटी तक्रार, तसेच स्वत:च्या मुलीचे लैंगिक शोषण झाल्याचे आरोप पोलिसांकडे दाखल करण्याची धमकी देत तरुणांना ब्लॅकमेल करते.

आता उघडकीस आलेल्या माहितीनुसार, ही महिला यापूर्वीही उलवे पोलीस ठाण्यात अनेक वेळा खोट्या तक्रारी दाखल करत आली आहे, आणि त्या मागे घेण्यासाठी पीडितांकडून पैसे पान २ वर

### अनेक तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त

तक्रारदारांनी या संपूर्ण प्रकरणाचे स्टिंग ऑपरेशन करून ऑडिओ-व्हिडिओसह महत्त्वाचे पुरावे गोळा केले असून, हे सर्व पुरावे उलवे पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले आहेत. या प्रकरणात आणखी काही तरुण बळी पडले असण्याची प्रबळ शक्यता असून, या हनीट्रॅप टोळीमुळे अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले आहे. या संपूर्ण प्रकरणाचा लवकरच मोठ्या पर्दाफाश होणार असून, महिलेचे सर्व कारनामे आणि उपलब्ध पुरावे जनतेसमोर आणले जाणार असल्याचे तक्रारदारांनी स्पष्ट केले.

# आकाशात हेलिकॉप्टरच्या घिरट्या

### प्रशासन मात्र अनभिज्ञ



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात मंगळवारी सकाळी हेलिकॉप्टर आल्याचे दिसून आले. त्या हेलिकॉप्टरबद्दल तालुक्यातील प्रशासनाला कोणतीही माहिती नसल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, असे हेलिकॉप्टर तालुक्यात सातत्याने हवाई फेऱ्या मारत असून, हे हेलिकॉप्टर नक्की कोणाचे? असा प्रश्न सर्वसामान्य व्यक्त करीत आहेत. दरम्यान, प्रशासन काय करते? असा प्रश्न मनसेने उपस्थित केला असून, हवाईमार्गे येऊन काही अनुचित प्रकार केल्यास त्याची जबाबदारी कोणाची? असा प्रश्न मनसे जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी उपस्थित केला आहे.

मुंबईच्या जवळ असलेल्या कर्जत तालुक्यातील जमिनीकडे देशभरातील उद्योजकांचे लक्ष लागले आहे. नवनवीन प्रकल्प आणून कर्जतच्या जमिनीवर ताबा मिळवण्याचा डोळा गुंतवणूकदारांचा आहे. म्हणूनच उद्योजक कर्जतमध्ये येण्यासाठी हेलिकॉप्टर वापरत असल्याचे आढळून येत आहे. मात्र, हे हेलिकॉप्टर कर्जत तालुक्याच्या हवाई हद्दीत उतरत असताना त्याची नोंद कर्जत तालुका प्रशासनाला असावी, अशी एक साधी अपेक्षा आहे. मात्र, खासगी हेलिपॅडवर उतरणाऱ्या उद्योगपतींची संख्या वाढली असून, देशातील पहिल्या क्रमांकाचे उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या मागील पान २ वर

# उन्हाळ्यात पाण्याची चिंता मिटली

*** पंचायत समितीने बांधले २१ वनराई बंधारे * तालुका कृषी कार्यालयाचे ५० उद्दिष्ट**

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

निवडणुकांच्या काळात प्रशासन गुंतल्यानंतर वनराई बंधारे बांधण्याचा विसर पडत असल्याने उन्हाळ्यात पाणीटंचाईची तीव्रता वाढत असल्याचा पूर्वानुभव लक्षात घेता पंचायत समितीने ग्रामपंचायतींमार्फत आतापर्यंत २१ वनराई बंधारे बांधले असून, तालुका कृषी विभागातील कृषी सहायकांना प्रत्येकी ५ असे एकूण १० सहायकांमार्फत ५० वनराई बंधारे बांधण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. महसूल विभागाने तसेच शिक्षण विभागाने यावर्षी अद्याप वनराई बंधारे बांधण्यासाठी उत्सुकताही दाखवली नसल्याची माहिती प्राप्त झाली आहे.





पोलादपूर तालुक्यात उन्हाळ्यामध्ये गुरांच्या पाण्यासोबतच कपडे, भांडी धुण्याच्या तसेच आवश्यक वाटल्यास पिण्याच्या आंघोळीच्या पाण्यासाठी वनराई बंधारे उपयुक्त ठरत असल्याचे अनेकवेळा उघड झाले आहे. मात्र, ज्यावर्षी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद तसेच लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता लागू असेल; त्यावर्षी निवडणुकांच्या काळात प्रशासन गुंतल्यानंतर वनराई बंधारे बांधण्याचा विसर पडत असल्याने उन्हाळ्यात पाणीटंचाईची तीव्रता वाढत असल्याचा अनुभव तालुक्याला घ्यावा लागला आहे.

पोलादपूर तालुक्यात पंचायत समितीने आतापर्यंत १७ ग्रामपंचायतींच्या मार्फत २१ बंधारे बांधल्याची माहिती गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांच्यावतीने कृषी विस्तारअधिकारी मंगेश साळी तसेच अरूण धीवरे यांनी दिली. यामध्ये तुर्भे खुर्द, धामणदिवी, तुर्भे बुद्रुक, काटेतळी, तुर्भे खोंडा, कोतवाल खुर्द, देवपूर, धारवली, आडावळे बुद्रुक, देवळे, कुडपण बुद्रुक, परसुले आणि गोवेले या ग्रामपंचायतींनी प्रत्येकी १ तर सडवली, दिविल, वाकण आणि बोरघर या ग्रामपंचायतींनी प्रत्येकी २ याप्रमाणे २१ वनराई बंधारे बांधले आहेत. दरम्यान, पोलादपूर तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली १० कृषी सहायकांच्या माध्यमातून प्रत्येकी ५ वनराई बंधारे बांधण्याचा संकल्प केला असून तालुक्यात लोकसहभागातून ५० बंधारे उभारण्यात येतील असे प्रयत्न सुरू झाले आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे ठेकेदार आणि तहसिल कार्यालयातील कर्मचारी अधिकारी यांच्या समन्वयातून पोलादपूर तालुक्यातील विविध विकास कामांसाठी वापरण्यात आलेली सिमेंटची रिकामी पोती गोळा करण्यात येऊन या वनराई बंधाऱ्यांची उभारणी मोठ्या प्रमाणात करण्यात येत असून, काही ठिकाणी खताच्या रिकाम्या पिशव्यांचाही वापर केला जाऊन वनराई बंधारे बांधण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील दैनंदिन गरजेच्या पिण्याव्यतिरिक्त पाण्याची सोय वनराई बंधाऱ्यांमुळे होत असताना पाणी अडवा पाणी जिरवाही संकल्पना साध्य झाल्याने उन्हाळयात बंधाऱ्याच्या परिसरातील विहिरी तसेच बोअरवेलच्या पाणीपातळीमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

सडवली येथे महिला बचत गटाच्या माध्यमातून महिला सरपंच तसेच माजी सरपंच बापू जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महिला बचतगट सदस्यांनी बंधारा बांधला. ग्रामविकास अधिकारी त्रिशाला गंभीरे, पंचायत समितीचे अधिकारी मंगेश साळी आणि अरूण धीवरे यांनी या बंधाऱ्याची पाहणी केली.

# पीएनपी राष्ट्रीय सेवा योजनेचे निवासी शिबीर संपन्न

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग आणि राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस. एस.) विभाग यांच्या संयुक्त विद्यमानेखैरवाडी, रामराज जिल्हा परिषद मराठी शाळा येथे सात दिवसीय विशेष निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर सोमवार २५ नोव्हेंबर ते १ डिसेंबर कालावधीत यशस्वीरित्या पार पडले.



या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, संस्थेचे प्रशासकीय सल्लागार गाबाजी गीते, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य रवींद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. संपूर्ण शिबिराचे अध्यक्षस्थान संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांनी भूषविले. शिबिराच्या पहिल्या दिवशी स्वयंसेवकांनी शिबिराच्या ठिकाणी आजूबाजूचा परिसर स्वच्छ करून मुक्कामाची व्यवस्था केली. रोज सकाळी योगाभ्यासाने दिवसाची सुरुवात केली जात होती. कार्यक्रमाच्या दिवशी कार्यक्रम अधिकारी दिनेश पाटील यांनी संविधानाचे वाचन केले, तसेच २६/११ च्या भ्याड हल्ल्याबाबत शहिदांना श्रद्धांजली वाहण्यासाठी रॅली काढण्यात आली. या उपक्रमांतून गाव स्वच्छता, कंपोस्ट खड्डा तयार करणे, ओला व सुका कचरा वर्गीकरण, पाणी आडवा पाणी जिरवा या मोहिमेंतर्गत बंधारा बांधणी यांसारखी उपयुक्त कामे विद्यार्थ्यांनी अत्यंत मनापासून केली. युवा नेतृत्वावर मार्गदर्शनासाठी महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे, मानसिक आरोग्य व तणाव व्यवस्थापनासाठी डॉ. मेघा साजू व डॉ. धनश्री काडू जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग यांनी मार्गदर्शन केले, तसेच शेतीविषयक माहिती व शासकीय योजनांबाबत मार्गदर्शनासाठी तालुका कृषी अधिकारी तन्मय भगत यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. साप ओळख आणि बचाव या विषयावरील विशेष प्रात्यक्षिक वन्यजीव रक्षक अथर्व सैयार व वन्यजीव संवर्धक कपिल जोशी यांनी दिले, तसेच जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय माने एचआयव्ही एड्स जनजागृतीबाबत आणि स्वच्छता व पाणीपुरवठा मिशन कक्ष, जिल्हा परिषद रायगड यांच्यावतीने जयवंत गायकवाड आणि सुरेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले व स्वच्छतेची शपथ दिली.

नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणून चित्रकला स्पर्धा, नाटिका, गायन स्पर्धा, वादविवाद स्पर्धा तसेच विशेष म्हणजे गाव-ातील महिलांसाठी मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले. या खेळांमध्ये सहभागी झालेल्या महिलांना विविध बक्षिसे देण्यात आली.

शिबिराला जिल्हा एन.एस.एस. समन्वयक विजय कोंडिलकर व सार्वजनिक विद्यामंदिर, पेण कॉलेजचे एन.एस.एस. अधिकारी संदेश मोरे यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.

१ डिसेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय विशेष निवासी शिबिराची सांगता करण्यात आली. सेवाभाव, शिस्त, नेतृत्वगुण आणि सामाजिक जाणीव वाढवणारे हे शिबीर अत्यंत यशस्वी ठरले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी माजी पंचायत समिती सदस्य जयेश ढेबे, धर्मेश गडकळ, भाग्या काष्टी, लक्ष्मी काष्टी व विभागातील सर्व सामाजिक कार्यकर्ते ग्रामस्थ यांचे सहकार्य लाभले. शिबिराचे नियोजन कार्यक्रम अधिकारी दिनेश पाटील, कपिल जोशी आणि श्वेतल जिंजे यांनी केले, तर कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच तेजस म्हात्रे आणि निशिकांत कोळसे यांनी शिबीर यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली.

# महाड एमआयडीसी पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या कार्यकौशल्यामुळे हरवलेली महिला व तिची दोन मुले अखेर सुखरूप सापडली. याबाबत २४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता महिला बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली होती.



या प्रकरणाचा तपास सपोनि श्री. माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा मोहिते यांनी केला. तर, तांत्रिक तपास पोकॉ. बल्लाळ यांनी पार पाडला. उपलब्ध माहिती, तांत्रिक साधनांचा वापर, कॉल लोकेशन, सिसीटीव्ही फ ूटेज तसेच विविध ठिकाणांवरील तपासणीच्या आधारे पथकाने पुणे शहरात शोधमोहीम राबवली.

या मोहिमेदरम्यान मिसिंग महिला श्रुती अमोल राऊत (२५) आणि तिची दोन लहान मुले आयुष व विर यांचा शोध यशस्वीरित्या लावण्यात पोलिसांना यश आले. पुणे येथे त्यांचा मागोवा लागताच पोलिसांनी तातडीने त्या ठिकाणी पोहोचून तिघांना सुरक्षित ताब्यात घेतले.सोमवार, दि. ०८ डिसेंबर रोजी महाड एमआयडीसी पोलीस पथकाने श्रुती राऊत व तिची मुले यांना तिच्या नातेवाईक तसेच पती अमोल राऊत यांच्या ताब्यात सुखरूप सुपूर्द केले. महाड एमआयडीसी पोलिसांनी दाखवलेली तत्परता, तांत्रिक तपासाचे कौशल्य आणि वेळीच केलेला हस्तक्षेप यामुळे एक कुटुंब पुन्हा एकत्र आले असून, नागरिकांनी पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक केले आहे.

# अलिबाग येथे डाक अदालतीचे आयोजन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अधीक्षक डाकघर रायगड विभाग अलिबाग यांच्या कार्यालयाद्वारे दि.२२ डिसेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे. या डाक अदालतीमध्ये नवी मुंबई रिजन विभागातील डाक सेवेसंबंधीत तक्रार/समस्या ज्यांचे निवारण सहा आठवडा कालावधीत झालेले नाही, अशा टपाल, स्पीडपोस्ट, काऊटर सेवा, बचत बँक, मनीऑर्डर संबंधित तक्रारी विचारात घेतल्या जातील.

तक्रारीत सविस्तर माहिती जसे दिनांक, ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार दाखल केली त्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा इ. असणे आवश्यक आहे. इछुक ग्राहकांनी आपली तक्रार २ प्रतीत अधिक्षक डाकघर रायगड विभाग अलिबाग ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडे दि.१८ डिसेंबर २०२५ पर्यंत पोहोचेल अशारितीने पाठवावी.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक मधुकर बबन राऊत वै यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ४० | ७ | १-२६-४० पैकी खरेदी करणेचे क्षेत्र ०-६०-०० | १५-४७ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५(पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १०/१२/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे मार्केवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक कमलेश चंदनमल ओसवाल यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे मार्केवाडी, ता . कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३० | १० | ०-०७-३० | ०-८० |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा ) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १०/१२/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस हया नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. शंकर गणपतराव चौगुले यांचेकडून कायमस्वरुपी विकसित करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ०७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून दयावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर बिनशेती जमिन मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार-(रु.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड | ९०/१/५ | ३-३२-०० | ३३.२० |

अलिबाग,
दि. ०९/१२/२०२५

सही/-
**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
M.M. Legal and Associates
MAH/5773/2006
Rituraj Plaza, Flat No.1,
Ground Floor, Shivaji Chouk
Near Gawade Optics.
Alibag Raigad.

## पान १ वरून

### तीनपदरी पुलावरुन एकेरी वाहतूक

मुंबई आणि गोव्याकडे जाणाऱ्या दोन्ही तीन पदरी ओव्हरब्रिजवर पांढरे पट्टे रंगविण्याच्या कामामुळे दोन्ही ओव्हरब्रिजवर एकाच मार्गिकेवरून वाहतूक तीन पदरांवरील वाहने अरूंद मार्गिकेवर जाण्यासाठी झुंबड उडाल्यासारखी परिस्थिती अपघाताला निमंत्रण देणारी ठरण्याची शक्यता आहे. या ओव्हरब्रिजवर अनेक दुचाकीस्वारांचे अपघात झाले असून, अनेकांना जीवदेखील गमवावे लागले आहेत.

चारही ओव्हरब्रिजवरील कॉंक्रिटच्या रस्त्यांना एक ते दोन इंच रूंदीचे सुमारे दोन ते चार मीटर लांबीचे तडे गेले असल्याकडे दुर्लक्ष करून पांढरे पट्टे रंगविण्याच्या कामाला प्राधान्य दिले जात असल्याने स्थानिक नागरिकांना पांढरे पट्टे रंगविल्यानंतर कॉंक्रीटच्या रस्त्याचे तडे गेलेल्या भागातील कप्पे काढून नव्याने कॉंक्रिटीकरण करून पुन्हा पांढरे पट्टे रंगविण्याचा दुबार खर्च संबंधित महामार्ग बांधकाम विभागाकडून केला जाईल, अशी उपहासात्मक चर्चा होत आहे.

### उरणमध्ये हनीट्रॅपचा सुळसुळाट

उकळण्यात आले आहेत. तिच्या वागणुकीची भीती दाखवण्यासाठी ती आपले नातेवाईक वकील असल्याचे सांगत, कायदेशीर कारवाईची धमकी देत तरुणांना कोपऱ्यात पकडत असल्याची तक्रार आहे. तक्रारदारांनी या संपूर्ण प्रकरणाचा स्टिंग ऑपरेशन करून ऑडिओ-व्हिडिओसह महत्त्वाचे पुरावे गोळा केले असून, हे सर्व पुरावे उलवे पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले आहेत. या प्रकरणात आणखी काही तरुण बळी पडले असण्याची प्रबळ शक्यता असून, या हनीट्रॅप टोळीमुळे अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले आहे.

तक्रारदारांनी आवाहन केले आहे की, एखाद्याला अशाच प्रकारच्या फसवणुकीचा अनुभव आला असेल किंवा कोणी या हनीट्रॅपच्या जाळ्यात सापडत असेल, तर न घाबरता पोलिसांकडे तक्रार करा. या संपूर्ण प्रकरणाचा लवकरच मोठ्या पर्दाफाश होणार असून, महिलेचे सर्व कारनामे आणि उपलब्ध पुरावे जनतेसमोर आणले जाणार असल्याचे तक्रारदारांनी स्पष्ट केले.

### आकाशात हेलिकॉप्टरच्या घिरट्या

काही महिन्यातील हेलिकॉप्टर फेऱ्या विशेष चर्चेत होत्या. पण, कर्जत तालुक्यातील खासगी हेलिपॅडवर उतरणाऱ्या हेलिकॉप्टर यांची संख्या मागील काही महिन्यात वाढली आहे.

तालुक्यात सरकारी हेलिपॅड कुठेही नाही आणि त्यामुळे निवडणुकीच्या काळात किंवा शासकीय कार्यक्रमांच्या सोहळ्यासाठी येणारी नेतेमंडळी टाटा कंपनीच्या हेलिपॅडवर उतरतात.तर, दुसरीकडे कर्जत तालुका हद्दीला लागून असलेल्या वावरले येथील सॉल्ट हॉटेल येथील हेलिपॅडवर येणाऱ्या व्हीव्हीआयपींची संख्य वाढली आहे. मात्र, हे दोन्ही हेलिपॅड खासगी असल्याने प्रशासनाचे नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे. फक्त मंत्री आणि नेतेमंडळी यांच्या कर्जत तालुका दौरा यावेळी तालुका प्रशासन सक्रीय असल्याचे दिसून येत असते. मात्र, सध्या कर्जत तालुक्यात काही खासगी हेलिपॅड उभारण्याचे प्रकार वाढले आहेत. त्या हेलिपॅडवर उतरणारे व्हीव्हीआयपी किंवा उद्योगपती यांच्याबद्दल कोणतीही नोंद प्रशासन यांच्याकडे नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांदेखील आकाशात घिरट्या घेणारे हेलिकॉप्टर दररोज बघण्याशिवाय काही हाती उरले नाही. कारण, त्या हेलिकॉप्टरमधून प्रवास करणारे कोण? याची कोणतीही माहिती प्रशासनाकडे नाही. त्यामुळे ही माहिती सर्वसामान्य लोकांना असण्याचे कोणतेही कारण नाही.

**सरकारी हेलिपॅड कधी होणार?**

कर्जत तालुक्यात सरकारी हेलिपॅड असावा यासाठी असलेले शासनाच्या धोरणानुसार हेलिपॅड उभारले जाणार आहे. कर्जत तालुक्याच्या मध्यभागी असलेल्या कडाव येथे हेलिपॅड बांधण्यात यावे यासाठी कडाव ग्रामपंचायतने अडीच एकर जमीन शासनाला दिली आहे. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाने गेल्या तीन वर्षात तेथे कोणत्याही प्रकारचे काम केले नाही. शासनाचे हेलिपॅड असते, तर त्या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची माहिती सरकारकडे, कर्जत तालुका प्रशासनाकडे राहिली असती.

### ...अन् बिबट्या पळाला

दरम्यान, वनविभागाच्या कर्मचाऱ्यांवरही त्यांनी हल्ला केला. जवळपास सहा नागरिकांवर त्याने हल्ला करुन त्यांना जखमी केले आहे. सुरक्षेसाठी पोलिसांनी अलिबाग-रेवदंडा मार्ग बंद केला होता. मात्र, रात्री उशिरापर्यंत त्याचा शोध घेण्यात वनविभाग तसेच पोलिसांना यश आले नाही.

वर्तक वाडी परिसरात बिबट्या सकाळपासूनच मुक्तपणे संचार करीत होता. तब्बल पंधरा तासांनंतर बिबट्याला पकडण्यात यश येईल, असे वाटत असताना सायंकाळी बिबट्याने सुरक्षा भिंतीवरुन जोरदार बाहेर उसळी मारली अन् तो रस्त्यावर आला. अनेक ठिकाणी मोकळ्या जागेत जाळी लावण्यात आली होती. मात्र, वनविभागाला गुंगारा देत बिबट्याने पलायन केले.

**सात तासांनंतर रेस्क्यू टीम**

भरवस्तीत बिबट्या शिरल्याचे लक्षात आल्यानंतर ग्रामस्थांनी तात्काळ वनविभाग आणि पोलीस प्रशासनाला याची खबर दिली. परंतु, बिबट्याला पकडणे वनविभागाच्या आवाक्याबाहेरचे असल्याचे लक्षात येताच त्यांनीच पुण्याहून रेस्क्यू टीमला पाचारण केले. परंतु, रेस्क्यू टीमला नागावमध्ये पोहोचण्यास दुपारचे चार वाजले. त्यानंतर त्यांनी बिबट्याला पकडण्याचे काहीसे प्रयत्न केले, परंतु बिबट्या सगळ्यांना गुंगारा देऊन पसार झाला.

### केंद्र सरकारचा इंडिगोला दणका

मोडवर येत इंडिगोच्या विमान वेळापत्रकात आणि एकूण उड्डाणांमध्ये १० टक्के कपात करण्याचे आदेश दिले आहेत. केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी मंगळवारी (९ डिसेंबर) हे आदेश दिल्याची माहिती एक्सवर (ट्विटर) पोस्ट शेअर करत दिली. इंडिगोचे सीईओ पीटर एल्बर्स आणि उच्च अधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आल्याचं मंत्री राम मोहन नायडू यांनी सांगितलं.

# चांढवे हायस्कूलमध्ये रोटरी चेरी ब्लॉसम प्रोजेक्ट यशस्वी

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

रोटरी क्लब ऑफ महाड यांच्या चेरी ब्लॉसम प्रोजेक्ट अंतर्गत चांढवे हायस्कूल, चांढवे येथे भव्य हिमोग्लोबिन तपासणी शिबीर यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिरात एकूण १६० विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली.

या उपक्रमास रोटरी प्रेसिडेंट नॉमिनी रोटेरियन राजीव वनरसे, माजी अध्यक्ष व प्रकल्प प्रमुख रोटेरियन डॉ. राहुल सुकाळे, तसेच सुकाळे नर्सिंग होमची वैद्यकीय टीम यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. शिबिराच्या आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक वन्नेरे, शिक्षकवृंद आणि शाळा प्रशासन यांनी सक्रिय सहकार्य केले.

शिबिरादरम्यान रोटेरियन डॉ. राहुल सुकाळे यांनी विद्यार्थ्यांना हिमोग्लोबिनचे महत्त्व, संतुलित आहार, स्वच्छतेची गरज, ऍनिमिया प्रतिबंधाचे उपाय आणि नियमित आरोग्य तपासणी याबाबत सोप्या व प्रभावी पध्दतीने मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यजागरूकता वाढली आणि सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला.

## स्थावर मिळकत जप्ती आदेश

**(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७ (१०) प्रमाणे)**

वाचले,
१) वसुली दाखला क्रमांक ३४/२०१८ मधील दिनांक १३/१२/२०१८ रोजीचा वसुली दाखला २) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ (१०) व (११) ३) वसुली व विक्री अधिकारी यांची मागणी नोटीस जा.क्र. रिकव्हरी/१५६/३४६/२०२५ दि.२२/०७/२०२५

जा.क्र./एस,आर.ओ./७६८/सन २०२५
वसुली अधिकारी, यांचे कार्यालय,
रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघ मर्या.
अलिबाग, कृष्णमंदिर सोसा, मारुती नाका अलिबाग
जि.रायगड फोन नं. ९१५६७६६०७७
दिनांक:- ०९/१२/२०२५

**जप्तीची नोटीस**

ज्याअर्थी दत्ता पाटील अर्बन को ऑप क्रेडीट सोसायटी लि. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड यांनी वसुली दाखला क्रमांक ३४/२०१८ मधील दिनांक १३/१२/२०१८ रोजीच्या वसुली दाखल्यात नमुद केलेप्रमाणे श्री. पाटील केशव बाळाराम मयत वारस श्रीमती. मनीषा चंद्रकांत पाटील यांनी दत्ता पाटील अर्बन को ऑप क्रेडीट सोसायटी लि.अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड या पतसंस्थेतून कर्ज घेतले असून, सदरचे कर्ज थकीत झाल्यामुळे व दावा रक्कम रुपये ८,११,९७६/- व्याज व इतर खर्च न भल्यामुळे श्री. पाटील केशव बाळाराम मयत वारस श्रीमती. मनीषा चंद्रकांत पाटील यांची खालील वर्णनाची मालमत्ता आज दिनांक ०१/१२/२०२५ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ (१०) व (११) अन्वये जप्त करण्यात आली आहे. या आदेशानुसार त्या मालमत्तेचे हस्तांतरण अगर विक्री अथवा त्यातील हितसंबंधाचे कोणतेही खाजगी हस्तांतर किंवा मालकी हक्कातील बदल अथवा त्या मालमत्तेवर निर्माण केलेला कोणताही बोजा निर्णीत अर्जदार धनकोविरुद्ध रद्द व निरर्थक होईल.

**मालमत्तेचे वर्णन**

| निवाडयाची किंवा आदेशाचा क्र व दिनांक | निवाडा किंवा आदेश ज्या इसमाविरुद्ध दिला आहे त्यांची नावे व पत्ते | मालमत्तेचे वर्णन व पत्ता | शेरा इतर बोजे |
|---|---|---|---|
| ३४/१८<br>१३/१२/१८ | १. श्री. पाटील केशव बाळाराम मयत वारस श्रीमती. मनीषा चंद्रकांत पाटील<br>मु.चाळ नं. २/१ शिवशक्ती चाळ कोळशेवाडी पोलीस स्टेशन समोर कल्याण पुर्व ४१२३०६<br>२. श्री. पाटील निकेश राजेंद्र मु.उसर ता.अलिबाग जि. रायगड<br>३. श्री. कर्णेकर संजय मधुकर मु. मुळ खानाव उसर ता.अलिबाग जि. रायगड<br>४. श्री. वाडेकर संदेश दत्तात्रेय मु. विठ्ठल रखमाई मंदिराजवळ उसर ता. अलिबाग जि.रायगड | श्री. पाटील केशव बाळाराम यांची तुकडी व जिल्हा रायगड पोट तुकडी व तालुका अलिबाग रायगड जिल्हा परिषदेच्या व पंचायत समिती अलिबाग हद्दीतील गांव चिंचोटी हददीतील जमिन मिळकत मौजे चिंचोटी ता.अलिबाग जि. रायगड<br>गट क्र व उपविभाग ७/१/अ<br>वरकस ०-१३-९०<br>पो.ख. ०-०१-८०<br>एकूण ०-१५-७०<br>हि जमिन मिळकत | |

येणे रक्कम, त्यावरील होणारे व्याज व कायदेशीर खर्च जप्ती आदेशाचे तारखेपासून पंधरा दिवसांचे आत भरणा न केल्यास वर नमूद केलेली मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल.

**सिल**

**श्री. विवेक वि.पाटील**
**वसुली अधिकारी**
**रायगड-अलिबाग**

## पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१०२०६**

कार्यालय :- २७४५८०४०/४१/४२ ई मेल : panvelcorporation@gmail.com
फॅक्स नं. ०२२-२७४५२२३३

**निविदा पत्रक :**

पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांना स्वावलंबी व सशक्त बनवण्यासाठी, त्यांची व्यावसायिक व सामाजिक कौशल्ये वाढवण्याच्या उद्देशाने विविध प्रशिक्षणाची जाणीव व जागृती कार्यक्रम आयोजित करणे कामी जाहिर ई निविदाद्वारे वार्षिक दर मंजूर करणेबाबत सदर निविदेचा तपशिल www.mahatender.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

इच्छुक निविदाकारांनी आपल्या निविदा निर्धारित कालावधीत ऑनलाईन सादर कराव्यात. यासोबत निविदा शुल्क, EMD (Earnest Money Deposit) आणि सर्व पात्रता कागदपत्रे निर्धारित स्वरूपात अपलोड करणे आवश्यक आहे. कामाच्या व्याप्ती, शुल्क, अटी व शर्ती, नोंदणी प्रक्रिया आणि पात्रता निकष यासंबंधीची सर्व माहिती ऑनलाईन निविदा दस्तऐवजात उपलब्ध आहे.

जा.क्र. पमपा/मबावि/१४६/प्र.क्र.१/२०२५
दिनांक : ०९/१२/२०२५

सही/-
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

# शेतकऱ्यांना जमीन मोबदल्याची प्रतीक्षा

## ।। वीस वर्षापासून सा.बां. विभागाची टाळाटाळ ।। शेतकरी आंदोलनाच्या पवित्र्यात!

। महाड । प्रतिनिधी ।

**सन २००५ च्या. नैसर्गिक आपत्तीमध्ये मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गा वरील कशेडी घाट पूर्णपणे बंद झाल्याने कशेडी घाटाला पर्यायी मार्ग म्हणून नातू नगर तुळशी खिंड विन्हेरे महाड असा पर्यायी मार्ग करण्यात आला. त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनीदेखील संपादित झाल्या मात्र तब्बल वीस वर्षानंतर देखील शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला देण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाकडून टाळाटाळ होत असल्याने आक्रमक झालेल्या शेतकऱ्यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे**



विन्हेरे तुळशी खिंड नातू नगर मधील रस्त्याच्या कामासाठी फाळकेवाडी ताम्हणे व विन्हेरे गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी २००५ च्या नैसर्गिक आपत्ती कशेडी घाटाला पर्यायी मार्ग म्हणून विन्हेरे, ताम्हणे, फाळकेवाडी या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीतून सन २००५ च्या नैसर्गिक आपत्तीमध्ये पूर्वीचा व आत्ताचा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक अतिवृष्टीमुळे पूर्णपणे खचल्यामुळे या महामार्गाला पर्यायी मार्ग म्हणून हा रस्ता करण्यात आला.त्यासाठी या गावातील किमान १३५ शेतकऱ्यांच्या जमिनी रस्त्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने ताब्यात घेऊन त्यावरती रस्ता तयार केला

महाड -विन्हेरे -तुळशीखंड- नातू नगर या मार्गाकरता विन्हेरे, ताम्हणे, फाळकेवाडी या गावातील १३५ शेतकऱ्यांच्या जमिनी ग्रामीण मार्गानुसार शासन निर्णय होऊन या रस्त्याच्या संपादित शेत जमिनीसाठी शेतकऱ्यांच्या भूसंपादित जमिनीसाठी त्यावेळी २७०० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली. मात्र आजपर्यंत शेतकऱ्यांच्या जमिनीची संयुक्त मोजणी झालेली नाही

महाड विन्हेरे तुळशी खिंड नातू नगर या रस्त्याच्या कामासाठी विन्हेरे, ताम्हणे, फाळकेवाडी या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करून सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २००५ पासून आज २० वर्षाचा कालावधी लोटला. ना शेतकऱ्यांना वीस वर्षापासून संपादित केलेल्या जमिनीचे भुईभाडे ना त्यावरील नष्ट केलेल्या आंबा, काजू, जांभूळ यासारख्या झाडांचा मोबदला व शेतकऱ्यांचे जनावरांचे गोठे व घर याचा देखील मोबदला मिळालेला नाही केवळ शेतकऱ्यांना दरवर्षी राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सार्वजनिक बांधकाम विभाग महाड हे आश्वासनाचे गाजर देण्याचे काम करीत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

महाड-विन्हेरे-तुळशी खिंड-नातू नगर या रस्त्याच्या कामासाठी संपादित झालेल्या विन्हेरे, ताम्हणे, फाळकेवाडी या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित झाल्या आहेत. त्यांना बाजार भावाप्रमाणे भाव देणे अपेक्षित असताना केवळ सोपस्कार पार पाडायचे म्हणून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळून शेतकऱ्यांना विश्वासात न घेता सार्वजनिक बांधकाम विभागाने संपादित जमिनीसाठी मनमानी पद्धतीने प्रस्ताव शासनाकडे सादर केला

> ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या रस्त्याच्या कामासाठी संपादित झाल्या आहेत त्या जमिनी बहुमूल्य किमतीच्या असल्याने शेतकऱ्यांना बाजारभावाप्रमाणे भाव मिळणे अपेक्षित आहे मात्र दरवर्षी शेतकऱ्यांची फसवणूक करीत आज वीस वर्षाचा कालावधी उलटून गेला मात्र शेतकऱ्यांना वाटाण्याच्या अक्षता दाखवण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांनी केले आहे

आज झालेल्या महाड येथील पत्रकार परिषदेमध्ये येथील शेतकऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भोंगळ कारभाराविरोधात तीव्र नापसंती व्यक्त करून तातडीने आमच्या जमिनीचे संयुक्त मोजणी व बाजारभावाप्रमाणे जमिनीच्या मोबदला देण्याची मागणी यावेळी घेतलेल्या पत्रकार परिषदेत माजी सभापती सिताराम कदम विन्हेरे गावचे उपसरपंच चंद्रकांत मोरे, जितेंद्र माने यांच्यासह तिन्ही गावातील शेतकरी उपस्थित होते

सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांच्याकडे वारंवार विनंती करीत असताना केवळ या बजेटमध्ये काम होईल. पुढच्या बजेटमध्ये काम होईल. सार्वजनिक बांधकाम विभागाने केली आहे. आम्ही सर्व शेतकरी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भूलथापांना आता थकलो असून आम्हाला बाजारभावाप्रमाणे न्याय मिळत नसेल तर आम्ही शेतकरी आता आंदोलनाच्या पवित्र्यात आहोत. येत्या आठ दिवसात आम्हाला आमच्या जमिनीचा मोबदल्याची सुरुवात बाजारभावाप्रमाणे तसेच संपादित केलेल्या जमिनीचे भुईभाडे व त्यावर असणाऱ्या वृक्षसंपदेची नोंद करून त्याचेदेखील मूल्य आम्हाला या संपादित जमीन क्षेत्रांमध्ये समाविष्ट करावे. तसे न केल्यास महाड विन्हेरे तुळशी खिंड मार्ग जाणारा राज्य मार्ग आम्ही बंद करणार, असा इशारा सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांना दिला आहे.

---

## निवडक



### वाहतूक कोंडीने प्रवासी हैराण

**रसायनी** : दळणवळण, वाहतूक व्यवसाय करताना सोयी, सुविधा, सुरक्षेची सर्वस्वी हमी देणाऱ्या विविध अटी, शर्ती धोरणांना कोन ते रसायनी रस्त्यावरील कंटेनर फ्रट स्टेशनच्या बेकायदेशीर रस्त्यावरील वाहतूक कोंडीमुळे दररोज हजारो प्रवासी वर्ग व स्थानिक ग्रामस्थ अनेक वर्षांपासून त्रस्त झालेले पाहायला मिळत आहेत. रस्त्यालगतचे लॉजिस्टिकमधील सर्व यार्डमध्ये जाणाऱ्या शेकडो ट्रेलर ट्रक ने मुख्य रस्त्यालाच पार्किंग बनवून ठिया मांडला असल्याने हजारो प्रवाशी नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहतूक कोंडीसाठी कारणीभूत असणाऱ्या बेजबाबदार नवकार लॉजिस्टिकसारख्या यार्डमुळे दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीने प्रवासी व स्थानिक ग्रामस्थ त्रस्त झाल्याने जनतेचा आक्रोश दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. दरम्यान खाकितील योद्धे व स्वतः प्रवासी, पत्रकार या वाहतूकीच्या संकटात अडाणी, अशिक्षित, बेजबाबदार ट्रेलर ट्रकवाल्यांना विनवण्या करत मार्ग मोकळा करून वाहतूक नियंत्रण करताना दिसत असतात. यावर अंकुश म्हणून वाहतूक पोलीस नियंत्रण व नियंत्रण विभागाने लॉजीस्टिक नियमानुसार यार्डचे पार्किंग मर्यादा तपासून त्यांना व्यावसायिक परवानगी द्यायला हवी. त्या ठिकाणी पार्किंग व शौचालय, सांडपाणी नियोजन सारख्या सोयीसुविधा नसल्यास यार्डचे उद्योग परवाने कायमस्वरूपी रद्द करावे अशी मागणी प्रामुख्याने होताना दिसत आहे.

### महामार्गावरील पथदिवे फक्त दिखावा



**कोलाड** : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील असंख्य ठिकाणी सात ते आठ महिन्यांपूर्वी पथदिवे बसविण्यात आले आहेत. परंतु त्याचा उजेड काही पडेना मग महामार्गावर बसविण्यात आलेले पथदिवे फक्त दिखाव्यासाठी त्याचा प्रकाश केव्हा पडणार अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवासी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील सुकेळी खिंडीत रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडे झूडपे असल्यामुळे अंधार असल्यामुळे रात्रीच्या सुमारास येथे प्रचंड अंधार असतो. शिवाय येथील रस्त्याला चढ उतार असल्यामुळे रात्री वाहने दिसत नाहीत. या मार्गावर बनविण्यात आलेले उड्डाण पुलही खालीवर असल्यामुळे ये-जा करणारी वाहने रात्रीच्या अंधारात दिसत नाही.अंधाराला पर्याय म्हणून पथदिवे लावण्यात आले आहेत.परंतु याला आठ महिने झाले तरी त्याचा उजेड महामार्गांवर पडेना? मग बसविण्यात आलेले पथदिवे फक्त ठेकेदाराच्या फायद्यासाठी काय? अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत आहे.

### महापरिनिर्वाण दिन साजरा



**माणगाव** : माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग.तटकरे महाविद्यालय आयटी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विश्वरत्न, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन संपन्न झाला. सर्वप्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून पुष्पहार अर्पण केले.भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि समाजसुधारक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ.आंबेडकरांनी दलित आणि वंचित समुदायांच्या हक्कांसाठी आपले जीवन समर्पित केले. कार्यक्रमासाठी उपस्थित महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.राजेंद्र आचार्य यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीमध्ये असणारा वाटा,त्यांचा जीवन प्रवास, दलितांसाठी केलेले कार्य, बौद्ध धर्माची वाटचाल, त्यांची शैक्षणिक वाटचाल, सोशल मीडियाचे कोणतंही साधन नसताना आपल्या कर्तृत्वाने जगभरात मिळवलेली प्रसिद्धी यावरती आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ.बी.एम.खामकर उपस्थित होते. त्याचबरोबर आयक्यूएसी व राष्ट्रीय सेवा योजना विभाग समिती सदस्य डॉ.जे.आर. पांडेय,आयटी विभाग प्रमुख प्रा.भानुप्रसाद विश्वकर्मा,राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा.नेहा तुराई व प्रा.स्वप्नील सपकाळ, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथपाल व विद्यार्थी उपस्थित होते.

### वासांबे ग्रामपंचायतीकडून थकीत घरपट्टीवर ५० टक्के सुट

**रसायनी** : रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या असणाऱ्या ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा या ग्रामपंचायतीने सरपंच,उपसरपंच व सदस्यांनी ठराव घेवून थकित घरपट्टी व पाणीपट्टीवर ग्रामस्थांना ५० टक्के सुट देण्याचा ठराव मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामसभेत संमत केला. उपरोक्त पार्श्वभमीवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ आणि त्याखालील नियम या अन्वये प्राप्त ग्रामपंचायतींमधील ज्या निवासी मालमत्ताधरकांनी मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती कर इत्यादी करांच्या चालू वर्षाच्या पूर्ण रकमेसह, दिनांक १ एप्रिल २०२५ पूर्वीच्या एकूण थकबाकीच्या ५०% रक्कम मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंमलबाजवणीच्या कालावधीत एक रकमी ग्रामपंचायतीकडे जमा केल्यास एकूण मूळ थकबाकीच्या रकमेस ५०% सवलत राहील. सवलत केवळ निवासी मालमत्ताधारकांसाठी असून औद्योगिक, वाणिज्यिक व इतर मालमत्तांसाठी नाही. सदर सवलत उक्त नमूद अभियान कालावधीसाठी लागू राहील.ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील निवासी मालमत्ता धारकांना, निवासी मालमत्ता धारकांना, निवासी मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती कर इत्यादी करांच्या थकबाकीत सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला. व प्रत्येक ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील थकबाकीचे प्रमाण आणि संबंधित ग्रामपंचायतीची आर्थिक गरज लक्षात घेवून निवासी मालमत्ताधारकांना दिनांक १ एप्रिल २०२५ पूर्वीच्या एकूण निवासी मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती कर इत्यादी करांच्या थकबाकीमध्ये ५० टक्के सुट ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत असणार आहे.

---

### बुडालेल्या इसमाला काढण्यात यश

**पाली/बेणसे** : सुधागड तालुक्यातील उन्हेरे गावाजवळील आंबा नदी पात्रात म्हशी आणण्यासाठी गेलेला झिमा तुकाराम बावधाने हे पाण्यात बुडाल्याची माहिती पाली पोलिसांना मिळाली. रेस्क्यू टीमने पाण्यात बुडालेल्या इसमाला काढण्याचा प्रयत्न केला, मात्र अंधारामुळे शोध मोहिमेत अडथळे निर्माण झाले होते. सकाळी रेस्क्यू टीमच्या साहाय्याने शोध घेतला असता पाण्यात तळाशी बुडालेल्या इसमाचा मृतदेह शोधण्यात यश आले आहे. रेस्क्यू टीमचे प्रमुख सागर दहिंबेकर आणि सर्व टीम सदस्य यांनी स्वखर्चाने सामाजिक बांधिलकीची जपणूक करून तत्काळ मदतीचा हात पुढे ठेवून निस्वार्थ सेवाभावी वृत्ती दाखवून दिली. रेस्क्यू टीमच्या मानवतावादी प्रेरक कार्याचे सर्व स्थरातून कौतुक केले जात आहे.

### अनुदय संगीत महोत्सव पनवेलमध्ये दिमाखात




। पनवेल । प्रतिनिधी ।

सी.के.टी. महाविद्यालय, खांदा कॉलनी पनवेल येथे तालगंधर्व तबला-पखवाज अकादमी तर्फे आयोजित अनुदय हा भव्य संगीत कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात अकादमीच्या विद्यार्थ्यांच्या तबला आणि पखवाज वादनाने झाली. गुरु रेवनाथ भाग्यवंत यांनी विद्यार्थ्यांना दिलेली प्रशिक्षणाची परंपरा त्यांच्या सुरेल वादनातून ठळकपणे जाणवली.

यानंतर नाशिकचे युवा गायक अथर्व वैरागकर यांनी सुमारे दीड तास सुरांची अविस्मरणीय मैफल रंगवली. राग बिहाग मधील विलंबित ख्याल, दोन आकर्षक बंदिशी, विविध आलापी-ताना आणि बोल-ताने यामुळे सभागृहातील रसिक मंत्रमुग्ध झाले.

कार्यक्रमात तबल्यावर कौस्तुभ भाग्यवंत यांनी रंगत वाढवली. हार्मोनियमवर अंकित कुंभार आणि पखवाजवर गौरव म्हात्रे यांनी तोलामोलाची, सुरेल साथ देत कार्यक्रम अधिक सुंदर केला.

### राजिप उच्च प्राथमिक वडगाव शाळेत दप्तरांचे ऑडिट

#### मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी घेतली झाडाझडती

। रसायनी । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वडगाव येथे वद्यार्थ्यांच्या दप्तरांचे मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी ऑडिट केले. मागील काही दिवसांपासून मुलांच्या दप्तरांचे ओझे व आकार वाढलेले निदर्शनास आल्यामुळे, कोणतीही पूर्व सूचना न देता सुभाष राठोड यांनी दुपारी अचानक विद्यार्थ्यांच्या दप्तरांची झाडाझडती सुरू केली.

पुस्तके, वह्या, सोबत कंपास, पाणी बॉटल, काही पुरक वाचनाची पुस्तके असे नियमित शालेय साहित्य आढळले. पण सखोल तपासणीनंतर काही विद्यार्थ्यांच्या बॅगेत जादाचा ड्रेस होता का तर शाळेतूनच खेळासाठी रवाना होण्यासाठी काही मुलांच्या दप्तरात चोरून खाण्यासाठी आणलेल्या खाण्याच्या पुड्या, खाऊचे भरपूर रॅपर, खराब झालेली फळे, गोट्या, काही दगड असा खूप कचरा होता.काही मुलांचे दप्तर स्वच्छ व निटनेटकी होती.

बऱ्याच मुलांच्या दप्तरात कचरा होता. त्याची सफाई करून घेण्याचा सूचना देऊन महत्त्व पटवून सांगण्यात आले.अलीकडे जत्रा सुरु झाल्या आहेत. मुलांकडे जत्रेतून आणलेल्या वस्तू मोठ्या प्रमाणात आढळून आल्या.



> **विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करणे,त्यांना आरोग्यदायी सवयी लावणे, अभ्यास आटोपशीर करणे असे अनेक उपक्रम सुभाष राठोड राबवत आहेत. ही शाळेसाठी व आमच्या पाल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.**
> **- जयश्री जांभुळकर, अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती वडगाव**

> **मुलांचे दप्तर हे त्यांचे अभ्यासाचे महत्त्वाचे घटक आहे.ते स्वच्छ व नीटनेटके असावे तसेच आरोग्यात सुद्धा दप्तर मोलाची भूमिका निभावत असतो.म्हणून यापुढे दर आठवड्याला दप्तर ऑडिट शाळेत राबविले जाणार आहे. आज खुप मोठ्या प्रमाणात अनावश्यक वस्तू सापडल्या. ज्यात व्हाईटनर, वेफर्स,खट्टामिठा, जेम्सच्या बनावट गोळ्या इत्यादी जे आरोग्यास घातक आहेत.**
> **- सुभाष राठोड, मुख्याध्यापक शाळा वडगाव**

---

### ग्रामीण भागात पेटू लागल्या शेकोट्या

। माणगाव । प्रतिनिधी ।

पावसाळा संपता संपता वेध लागतात ते हिवाळ्याचे आणि गुलाबी थंडीचे. यावर्षी पाऊस लांबल्याने थंडीचा मौसम सुरू होण्यास उशीर झाला होता. गेल्या काही दिवसांपासून संध्याकाळ गारवा वाढू लागला आहे.

हिवाळ्याच्या दिवसात सकाळी सकाळी पडणारे दाढ धुके आणि बोचणारी थंडी सर्वांना हवीहवीशी वाटते. या थंडी बरोबरच उबदार कपडे आणि चौकातून, घराबाहेर, घरांच्या कोपऱ्यांवर उब देण्यासाठी केलेल्या शेकोट्या आणि त्यांच्या भोवती गोलाकार बसून शेकोटीचा आनंद घेणारे नागरिक गेल्या काही दिवसांपासून सर्वत्र दिसू लागले आहेत.

गारवा वाढत जाईल तसे शेकोट्याभोवती गर्दी वाढत जाणार आहे. या शेकोट्यांमुळे गप्पांचा फड रंगू लागला असून मनोरंजन होते आहे. अडगळीतील लाकडे, पाला पाचोळा, टाकाऊ कागद, पुठ्ठे इत्यादींचा वापर करून या शेकोट्या केल्या जातात. अनेक ठिकाणी हिवाळ्यासाठी खास मोठे लाकूड, ओंडके शेकोटी करिता ठेवले जाते. दररोज ते पेटवून शेकोटी केली जाते.लहान मुले, स्त्री-पुरुष, वृद्ध, तरुण सर्वजण या शेकोट्यांचा आनंद घेतात.

सार्वजनिक ठिकाणी, चौक या ठिकाणी तर आवर्जून शेकोट्या केल्या जातात. सकाळी साधारणता साडेसात,आठ वाजेपर्यंत अगदी सूर्याची किरणे जाणवेपर्यंत शेकोटीचा आनंद घेतला जातो. तसेच रात्रीही जेवणानंतर अनेक ठिकाणी शेकोट्यांभोवती उबदारपणा घेतला जाऊ लागला आहे. हिवाळा आणि शेकोटीचा हा कार्यक्रम सर्वांच्या जीवनातील आनंदाचा भाग असून गाणी, गप्पा, विनोद आणि मनोरंजनाची वेगळी अशी पर्वणी या निमित्ताने सर्वांना मिळते आहे.

ठराविक गावाचे नाव घेऊन त्या गावचा म्हातारा शेकोटीला आला असे गीत हमखास या शेकोटी मधून ऐकायला मिळते. शेकोटीची ही संकल्पना प्राचीन असून शेकोटी आणि हिवाळा हे नाते अधिक घट्ट होत आहे.



> **हिवाळा आणि शेकोटी यामधून अनेक आठवणी आहेत. थंडीच्या दिवसांत शेकोटी करण्याची मजा काही औरच असते. आजकाल व्यस्त जीवनामुळे शेकोटीचा कार्यक्रम दुर्मिळ होत असला तरी थंडीच्या दिवसात शेकोटी भोवती बसणे हा आनंदाचाच भाग असतो.**
> **- राजेश भावे, शेकोटी प्रेमी.**

> **थंडीच्या दिवसांत उबदारपणासाठी पेटविल्या जाणाऱ्या शेकोट्या ही बाब नित्याची असून यामुळे मित्र मंडळ परिवार एकत्र येऊन गप्पांचा मनमुराद आनंद घेतात. यामुळे मैत्रभाव वाढीस लागतो, मनोरंजन होते.व्यस्त राहण्याच्या या काळात शेकोटीमुळे माणसे एकत्र येतात ही बाब समाज हितासाठी चांगली आहे.**
> **- काशिनाथ गाणेकर. शेकोटीप्रेमी.**

### ब्लॅक ॲण्ड विच कंपनीच्यावतीने ब्लँकेट वाटप कार्यक्रम संपन्न




। खांब । प्रतिनिधी ।

ब्लॅक ॲण्ड विच कंपनीच्या सीएसआर फंड व दुर्गवीर प्रतिष्ठान यांच्या वतीने ब्लँकेट वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

कंपनीच्या सीएसआर अंतर्गत घेरासुरगड येथे वृक्षारोपण,रायगड जिल्ह्यातील शाळा आणि कॉलेजमध्ये डिजिटल बोर्ड वितरण असे उपक्रम घेण्यात आले आहेत या उपक्रमांनंतर खांब पंचक्रोशीतील नडवली आदिवासी पाडा येथील ८० गरजू कुटुंबियांना सीएसआर सहकार्यातून ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी रामचंद्र चितळकर, मनोज शिर्के, प्रकाश थिटे, सुरेखा पारठे, रंजना टवले, मनिषा चितळकर, मनोज सावरकर, जितेंद्र पारठे ,योगेश टवले, कोलाडचे सहायक पोलीस अधिकारी नरेश पाटील, चंद्रकांत जाधव, सदानंद जाधव, प्रशांत वाघरे, किशोर सावरकर, कृष्णाराम धनवी, महेंद्र पार्टे, सृष्टी पारठे, किरण गायकर आदी उपस्थित होते.

---

**जनतेमध्ये नाराजीचा सूर | ओएनजीसी प्रशासन व ग्रामपंचायत दोघेही बेजबाबदार!**

### उरण पिरवाडी रस्ता खड्ड्यात

। उरण । प्रतिनिधी ।

**उरणमधील प्रमुख आणि अग्रणी औद्योगिक संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ओएनजीसी कंपनीच्या पायथ्याशीच उरण चारफाटा ते पिरवाडी हा महत्त्वाचा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत दुरवस्थेत असून नागरिक संतप्त झाले आहेत. पिरवाडी समुद्र किनारी पर्यटकांची मोठी गर्दी असते, नागाव आणि म्हातवली ग्रामपंचायत हद्दीतून हजारो नागरिक दररोज या रस्त्यावरून प्रवास करतात. मात्र या सर्वांची जीवनरेषाच ठरलेल्या या मार्गाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे.**

या रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य असून, अनेक ठिकाणी खड्ड्यांत रस्ता गेला की रस्त्यात खड्डे हेच ओळखू न येण्याजोगी स्थिती निर्माण झाली आहे. पावसाळ्यात तर परिस्थिती पूर्णपणे हाताबाहेर गेली होती. पर्यटक आणि स्थानिक नागरिक यांच्यात नाराजीचा सूर चढत आहे.

याहूनही गंभीर समस्या म्हणजे या मार्गावर रात्री स्ट्रीट लाईटचा पूर्ण अभाव आहे. अंधारात प्रवास करणे अत्यंत धोकादायक बनले असून विशेषतः महिलांना एकटं-दुकटं जाण्याची भीती वाटत आहे. स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी, निवेदने आणि मागण्या करूनही ओएनजीसी प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेतली जात नाही, असे ग्रामस्थ सांगतात.



पत्रकारितेच्या माध्यमातून वारंवार बातम्या प्रसिद्ध करूनही ओएनजीसी प्रशासन आणि संबंधित ग्रामपंचायत प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. ग्राम पंचायतही या समस्येकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे ग्रामस्थामध्ये तीव्र नाराजी आहे. याशिवाय ओएनजीसी कंपनीकडून उरण तालुक्यासाठी सीआरएस निधी योग्य प्रमाणात दिला जात नाही, असा गंभीर आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. काही अडगळीच्या ठिकाणी फक्त नावापुरता निधी देऊन त्यावर पाचपट खर्च दाखवला जातो, अशीही चर्चा रंगत आहे.

ओएनजीसीमध्ये कार्यरत दोन प्रमुख कामगार संघटना दरवर्षी रक्तदान शिबिरांचे आयोजन करतात. मात्र जनतेसमोरील मूलभूत प्रश्नरस्ता आणि प्रकाशव्यवस्था याकडे या संघटनांचेही पूर्ण दुर्लक्ष असल्याचे नागरिकांचे मत आहे. रक्तदान शिबिरांचे ढोल पिटले जातात, पण जनतेच्या रक्ताचा उकळा होईल अशा समस्यांकडे मात्र कोणी लक्ष देत नाही, असा टोला नागरिकांनी लगावला आहे.

सामाजिक कार्यकर्ते जयवंत कोळी यांनी ओएनजीसी प्रशासनाला ठाम मागणी केली आहे की,उरण चारफाटा ते पिरवाडी हा रस्ता तातडीने नव्याने तयार करून संपूर्ण मार्गावर स्ट्रीट लाईटची सुविधा करण्यात यावी. जनतेच्या सुरक्षिततेचा प्रश्न दुर्लक्षित करणे अमान्य आहे.

दरम्यान, ओएनजीसी मेन गेट, द्रोणागिरी भवन येथे उद्या बुधवार, १० डिसेंबर रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत एका कामगार संघटनेचे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. मात्र रस्त्याच्या दुरवस्थेकडे दोन्ही कामगार संघटनांनी एकत्रितरीत्या लक्ष देण्याची आणि ठोस पावले उचलण्याची गरज नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# आधारवड कोसळला

रस्त्यावर उतरून पोलिसांच्या लाठ्या झेलणारे कार्यकर्ते, चळवळींना दिशा देणारे नेते, नवनवी आंदोलने उभी करणारे प्रतिभाशाली संघटक, सत्यशोधक चळवळीच्या इतिहासाचे अभ्यासक, समाजवादाची भारतीय संदर्भात मांडणी करणारे विश्लेषक, परिवर्तनवादी कार्यकर्त्यांचे आधारस्तंभ अशा असंख्य रुपांमध्ये गेली ७० वर्षे एक सत्यशोधक महाराष्ट्रात वावरत होता. पण आता ही धडपड थांबली आहे. या बहुपैलू व्यक्तिमत्वाने अखेरचा श्वास घेतला आहे. डॉ. बाबा आढाव यांच्या निधनाने महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळींचा एक आधारवड कोसळला आहे. सत्यशोधक चळवळ आणि समतेचा समाजवादी विचार या दोहोंशी त्यांची बांधिलकी होती. महात्मा फुले यांचे वैशिष्ट्य हे की, ब्राह्मणी व्यवस्थेला हलवून टाकणारे बंडखोर विचार नुसते मांडून ते थांबले नाहीत. त्यानुसार त्यांनी सतत कृतीही केली. विचारांच्या जोडीने सतत कृती करीत राहण्याचा वारसा बाबा आढाव यांनी शेवटच्या क्षणापर्यंत चालवला. किंबहुना, महात्मा फुले यांचे खरेखुरे वारसदार म्हणून बाबांचेच नाव घ्यावे लागेल.हमाल, अंगमेहनतीची काम करणारे मजूर, कागद, काचा वेचणारे, मैला साफ करणारे सफाई कामगार, मोलकरणी, धरणग्रस्त, अस्पृश्यता झेलणारे दलित अशांसाठी बाबांनी आपल्या आंदोलनातून एक बुलंद आधारफळी निर्माण केली. पण हे करताना वैचारिक क्षेत्रातही वेळोवेळी योग्य तो हस्तेप केला. बाबा हे महात्मा फुल्यांप्रमाणेच पुण्याच्या पूर्वेकडच्या भागात राहिले, वाढले व कार्य करते झाले. त्यांचा जन्म नाना पेठेत झाला. आयुर्वेदाची पदविका घेऊन त्यांनी १९५० च्या दशकात डॉक्टरकीला प्रारंभ केला. पुण्याच्या व्यापारी पेठांमधील हमाल, गाडीवाले व कष्टकरी हे त्यांचे मुख्य रुग्ण. त्यांच्याच मुळे ते हमालांच्या प्रश्नांकडे वळले. १९४३ ते ५० या काळात ते राष्ट्रसेवा दलाचे संघटक होते. राममनोहर लोहियांच्या समाजवादी विचारांचा मोठा प्रभाव त्यांच्यावर होता. १९५६ मध्ये त्यांनी हमाल पंचायतीची स्थापना केली. तोवर मंडई किंवा पुण्याच्या व्यापाऱ्यांकडील हमाल हे बेवारस होते. त्यांना कसलेही आर्थिक संरक्षण नव्हते. हमालीचे दर अनिश्चित होते. काम थांबले की, उत्पन्नही बंद असा प्रकार होता. पाठ व मानेची दुखणी, व्यसनांचा आधार आणि तरुण वयात मृत्यू हे अनेकांचे विधिलिखित असल्यासारखे होते.

## धरणग्रस्तांसाठी कायदा झाला

तेव्हा कारखाने, बँका इत्यादी क्षेत्रातील कामगारांच्या संघटना होत्या. पण या संघटना आणि त्यांचे कम्युनिस्ट वा समाजवादी पक्ष यांना या असंघटित कष्टकऱ्यांकडे लक्ष पुरवावे असे वाटले नव्हते. बाबांनी हमालांना एकत्रित केले व त्यांना सरकारनेच संरक्षण द्यायला हवे अशी मागणी पुढे आणली. राज्यभरचे हमाल, मापाडी, माथाडी त्यांच्या नेतृत्वाखाली संघटित झाले. त्यातूनच १९६९ मध्ये राज्य सरकारला या वर्गाला संरक्षण देणारा कायदा करावा लागला. त्यांना निश्चित दराने वेतन, ग्रॅच्युइटी, भविष्य निर्वाह निधी, वैद्यकीय मदत इत्यादी मिळू लागले. हमालांची दुसरी पिढी शिकू लागली. व्यसने कमी झाली. पुणे शहराच्या राजकारणात ब्राह्मणांचे, सदाशिव इत्यादी पेठांचे कायमच वर्चस्व राहिले आहे. त्याला बाबांनी जबरदस्त छेद दिला. आपल्या भागातून नगरसेवक म्हणून ते निवडून गेले. पुणे महापालिका ब्राह्मणी पेठा व कष्टकऱ्यांच्या वस्त्या यांना पाणीपुरवठा करताना कसा भेदभाव करते हे त्यांनी दाखवून दिले व नगरसेवकपदाचा राजीनामा दिला. नंतर लोकसभेची निवडणूक लढवली. पण तिच्यात अपयश आल्यावर त्यांनी संसदीय राजकारण सोडून पर्यायी चळवळींचे राजकारण उभे करण्याकडे लक्ष केंद्रीत केले. विधानसभा व परिषद यांच्याप्रमाणेच या चळवळी म्हणजे लोकांचे सभागृह आहे व मी तिचा तहहयात अध्यक्ष आहे असे ते म्हणत. ते शब्दशः खरे होते.१९६२ पासून त्यांनी धरणग्रस्त, प्रकल्पग्रस्त इत्यादींच्या प्रश्नात लक्ष घातले. १९६८ मध्ये पुणे जिल्ह्यात कुकडी धरणाच्या भूमिपूजनाला आलेले केंद्रीय मंत्री यशवंतराव चव्हाण यांचा ताफा त्यांनी अडवला. त्यावेळी झालेल्या मारहाणीत त्यांचा डावा डोळा निकामी झाला. पण त्यातूनच १९७६ मध्ये महाराष्ट्रात आधी पुनर्वसन, मग धरण हे धोरण मान्य करणारा कायदा आला. पुढे काळानुसार त्यात अधिकाधिक चांगले बदलही होत गेले. धरणग्रस्तांनापर्यायी जमिनी, नोकऱ्या मिळणे सुलभ झाले. विशेष म्हणजे या प्रश्नासाठी ते अगदी अलिकडपर्यंत लढत राहिले. २०११ मध्ये या प्रश्नावर त्यांनी एकलाँगमार्च काढला होता.

## संघर्ष आणि 'कष्टाची भाकर'ही

१९७३ मध्ये सत्यशोधक समाजाच्या शताब्दीचे निमित्त साधून महाराष्ट्रात व्यापक परिवर्तनाची चळवळ हाती घ्यायला हवी असे त्यांच्या मनाने घेतले. ते ज्या समाजवादी पक्षात होते तेथील नेत्यांनी याकडे उपेक्षेने पाहिले. पण बाबांनी हार मानली नाही. महात्मा फुले समता प्रतिष्ठानची स्थापना केली. १९७२ मध्ये त्यांची एक गाव एक पाणवठा ही सर्वाधिक गाजलेली चळवळ सुरू झाली. त्यावेळच्या भीषण दुष्काळामुळे गावागावातील पाण्यासाठी मारामाऱ्या होत होत्या. त्यातून सवर्णांच्या विहिरी इत्यादींवर दलितांना प्रवेश नसल्याचे समोर आले. याच काळात दलितांवरील अत्याचारांमध्ये मोठी वाढ झाली होती. बाबांनी महाराष्ट्रभर यात्रा सुरू केली. प्रत्येक तालुक्यात जाऊन तेथील जातीय विषमतेच्या नोंदी त्यांनी केल्या. या चळवळीने दलित चळवळीला प्रचंड बळ मिळाले. दलित पँथरच्या आक्रमक चळवळीला बाबांच्या शांततामय आंदोलनाची जोड मिळाली. त्यातून हजारो कार्यकर्ते उभे राहिले. बाबांची मते स्पष्ट असत. जातीयता, धर्मांधता यावर ते कडक प्रहार करीत. याच मुद्द्यावरून त्यांनी आपल्याच समाजवादी परिवाराशी वैर घेतले. आणीबाणीनंतर समाजवादी पक्ष जनसंघात म्हणजेच जनता पक्षात विलीन करायला त्यांनी तीव्र विरोध केला. आणीबाणीच्या काळात ते १९ महिने तुरुंगात होते. तिथे संघवाल्यांचे त्यांना जे अनुभव आले त्याबाबत त्यांनी संघाचे ढोंग नावाचे लेख लिहिले. संघ हा नोंदणीकृत संघटना का नाही, त्यांना पैसे कुठून येतात असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले होते. ते आज अधिकच समर्पक झाले आहेत. पण त्यावेळी एसेम जोशी व नानासाहेब गोरे यांच्यासारख्यांनाही बाबांची भूमिका एकारलेली वाटत होती. संघामध्ये बदल होऊ शकेल अशी भाबडी आशा त्यांना वाटत होती. आज बाबांचीच भूमिका योग्य होती हे काळाच्या कसोटीवर निर्विवाद सिध्द झाले आहे. संघर्षात्मक राजकारणासोबतच हमालांना स्वस्तात व स्वच्छ अशी कष्टाची भाकर उपलब्ध करून देण्याचे विधायक उपक्रमही त्यांनी उभे केले. महात्मा फुले व त्यांच्या सत्यशोधक चळवळीचा इतिहास सर्वांगांनी पुढे आणण्यासाठी य.दि. फडके यांच्यापासून हरी नरके यांच्यापर्यंत अनेकांना त्यांनी पाठबळ दिले. आंदोलने हा त्यांचा श्वास होता. अगदी अलिकडे व्होट चोरीविरुद्ध निषेधासाठी ते रस्त्यावर उतरले होते. प्रतिकूल परिस्थितीत ते कधीही निराश झाले नाहीत. शिवाय त्यांचा विशेष हा की, त्यांनी विरोधकांना शत्रू मानले नाही. त्यामुळे सतत हमालांसाठी संघर्ष करूनही त्यांच्या विरोधातील व्यापारी व मर्चंट्स चेंबरशी त्यांचे स्नेहाचे संबंध कायम राहिले. या खऱ्याखुऱ्या सत्यशोधक समाजवाद्याला कृषीवल परिवारातर्फे विनम्र श्रध्दांजली.

विचार

# अर्थविश्वात वाढतेय देशाची ताकद

**अनेक आव्हानांना सामोरे जात भारताच्या अर्थव्यवस्थेने अखेर मोठी झेप घेतलीच. मात्र त्याच वेळी भारताच्या जीडीपी डेटामध्ये गंभीर चुका असल्याचे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने दाखवून दिले. याच सुमारास डिजिटल बँकिंगसाठी रिझर्व्ह बँकेने महत्वाच्या मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. दुसरीकडे सोन्याच्या बाजारपेठेत सध्या भारताची वाढती ताकद पहायला मिळत आहे.**



महेश देशपांडे

गेल्या काही दिवसांमध्ये अनेक आव्हानांना सामोरे जात भारताच्या अर्थव्यवस्थेने मोठी झेप घेतल्याचे पहायला मिळणे, ही सरत्या आठवड्यातील महत्वाची नोंद म्हणावी लागेल. मात्र त्याच वेळी भारताच्या जीडीपी डेटामध्ये गंभीर चुका असल्याचे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने दाखवल्याची दखल घेणे आवश्यक आहे. याच सुमारास डिजिटल बँकिंगसाठी रिझर्व्ह बँकेने महत्वाच्या मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत तर अन्य दखलपात्र बातमी म्हणजे सोन्याच्या बाजारपेठेत सध्या भारताची वाढती ताकद पहायला मिळत आहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेने अलिकडेच अशी चिन्हे दाखवली, की जणू काही एका लांब शर्यतीत धावणाऱ्या घोड्याने अचानक वेग वाढवला आणि सर्वांना मागे टाकले. जुलै-सप्टेंबर तिमाहीमध्ये जीडीपी ८.२ टक्के झाला. जो सहा तिमाहींमधील सर्वाधिक आहे. मागील आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीमध्ये ही वाढ फक्त ५.६ टक्के होती. एप्रिल-जून तिमाहीत ती ७.८ टक्के होती. जीएसटी दर सुधारणांनंतर उलाढाल वाढली. कारखान्यांनी या अपेक्षेने उत्पादन वाढवले. परिणामी, उत्पादन क्षेत्र ९.१ टक्क्यांच्या वेगाने वाढले. ते एका वर्षापूर्वी फक्त २.२ टक्के होते. उत्पादन क्षेत्राचा जीडीपीमध्ये अंदाजे १४ टक्के वाटा आहे आणि त्याचा वेग संपूर्ण संरचनेला ऊर्जा देतो. अर्थात दुसरीकडे, एक अशी आकडेवारी समोर आली, जी आनंदी वातावरणाबद्दल काहीशी चिंता निर्माण करते. २०२५-२६ च्या पहिल्या सात महिन्यांमध्ये राजकोषीय तूट पूर्ण वर्षाच्या उद्दिष्टाच्या ५२.६ टक्क्यांपर्यंत पोहोचली. ती गेल्या वर्षी याच कालावधीत ४६.५ टक्के होती. ही तफावत सरकारी महसूल आणि खर्चातील वाढती तफावत दर्शवते. एप्रिल-ऑक्टोबर या कालावधीत केंद्राचे एकूण उत्पन्न अंदाजे १८ लाख कोटी रुपये होते. कर महसूल १२.७४ लाख कोटी रुपये, तर करेतर महसूल ४.८९ लाख कोटी रुपये होता. कर्जेतर भांडवली उत्पन्न ३७ हजार ९५ कोटी रुपये तर राज्यांना कर वाटा म्हणून ८.३४ लाख कोटी रुपये देण्यात आले. ते गेल्या वर्षीपेक्षा जास्त आहे. दरम्यान, सरकारचा एकूण खर्च २६ लाख २५ हजार कोटी रुपये होता, तर महसूल खर्च २० लाख कोटी रुपये आणि भांडवली खर्च ६.१७ लाख कोटी रुपये आहे. व्याजदेयके सहा लाख ७३ हजार कोटी रुपयांची आहेत. एका बाजूला वेगाने वाढणारा जीडीपी आणि दुसऱ्या बाजूला थोडासा जास्त आर्थिक भार यामुळे उच्च आणि निम्न सूर एकाच वेळी वाजत आहेत. दोन्हीचे संतुलन भविष्यातील सूर निश्चित करेल.

एका बाजुला ही घोडदौड पहायला मिळत असताना आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) भारतीय अर्थव्यवस्थेबाबत एक महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे. वार्षिक पुनरावलोकनात 'आयएफएम'ने भारताच्या राष्ट्रीय खात्यांच्या डेटामध्ये गंभीर कमतरता नमूद करत 'सी' ग्रेड रेटिंग दिले आहे. डेटा गुणवत्तेच्या बाबतीत हा दुसरा सर्वात वाईट स्तर मानले जातो. 'आयएफएम'ने उपलब्ध डेटामधील काही कमतरता निदर्शनास आणून दिल्या आहेत. 'आयएफएम' अनुच्छेद ४ (आर्थिक चौकटीचे मूल्यांकन) नुसार, भारताचा राष्ट्रीय खात्यांचा डेटा वेळेवर उपलब्ध आहे आणि पुरेशी माहिती प्रदान करतो. तथापि, ते संकलित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धतीतील त्रुटींमुळे भारतीय राष्ट्रीय लेखा डेटाला 'सी' श्रेणी देण्यात आली आहे. 'आयएफएम'ने भारतातील महागाई मोजण्यासाठी वापरला जाणारा सर्वात व्यापक निर्देशक, ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय) ला 'बी' श्रेणी दिली आहे. एकूणच 'आयएफएम'ने सर्व डेटा श्रेणींना 'बी' श्रेणी दिली आहे. 'ए' श्रेणी दर्शवते की देशाचा आर्थिक डेटा आंतरराष्ट्रीय मानकांनुसार अचूकपणे संकलित केला गेला आहे. याचा अर्थ प्रदान केलेला डेटा जागतिक आवश्यकता पूर्ण करतो. 'बी' श्रेणी दर्शवते, की डेटामध्ये काही कमतरता असल्या तरी एकूणच परिस्थितीचे निरीक्षण करण्यासाठी डेटा वापरला जाऊ शकतो. 'सी' श्रेणी दर्शवते, की डेटा तयार करण्याच्या पद्धतीमध्ये काही त्रुटी आहेत. त्यामुळे 'आयएफएम'च्या अचूक देखरेख करण्याच्या क्षमतेत अडथळा येतो. 'डी' श्रेणी सर्वात कमकुवत श्रेणीमध्ये येते. ती दर्शवते, की डेटा आंतरराष्ट्रीय मूलभूत मानकांची पूर्तता करत नाही. याचा अर्थ, डेटावर विश्वास ठेवता येत नाही.

दरम्यान, रिझर्व्ह बँकेने देशात डिजिटल बँकिंगसाठी महत्वपूर्ण पुढाकार घेतला आहे. रिझर्व्ह बँकेने व्यावसायिक बँका आणि लघु वित्त बँकांसह इतर वित्तीय संस्थांसाठी डिजिटल बँकिंगशी संबंधित सात नवीन 'मास्टर डायरेक्शन्स' जारी केले आहेत. यामुळे बँका आणि संस्थांवरील अनावश्यक कागदपत्रांचे ओझे कमी होईल आणि काम करणे सोपे होईल. रिझर्व्ह बँकेने व्यावसायिक बँका आणि लघु वित्त बँकांसह इतर वित्तीय संस्थांसाठी डिजिटल बँकिंगशी संबंधित सात नवीन 'मास्टर डायरेक्शन्स' (सूचना) जारी केल्या. हे पाऊल रिझर्व्ह बँकेच्या व्यापक मोहिमेचा एक भाग आहे. त्याचा उद्देश नियम स्पष्ट आणि सुलभ करणे आहे. यामुळे बँका आणि संस्थांवरील अनावश्यक कागदपत्रांचे ओझे कमी होईल आणि काम करणे सोपे होईल. रिझर्व्ह बँकेने एकूण २४४ मुख्य निर्देश जारी केले आहेत. यामध्ये फक्त जुन्या विखुरलेल्या सूचनांची व्यवस्था करून एका ठिकाणी आणली गेली आहे.

विविध प्रकारच्या ११ संस्थांसाठी या सूचना देण्यात आल्या आहेत. यापैकी सात नवीन मास्टर डायरेक्शन खास डिजिटल बँकिंगसाठी आहेत. ती या सात संस्थांना लागू होतील. यामध्ये व्यावसायिक बँका, लघु वित्त बँका, पेमेंट बँका, स्थानिक क्षेत्रीय बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, शहरी सहकारी बँका आणि ग्रामीण सहकारी बँका यांचा समावेश आहे. डिजिटल बँकिंगचे हे नवीन नियम एक जानेवारी २०२६ पासून लागू होणार आहेत. नियमांनुसार, सर्व बँकांना डिजिटल बँकिंगसाठी ठोस धोरणे बनवावी लागतील. यामध्ये त्यांना कायदेशीर आवश्यकता तसेच पैशांची उपलब्धता (लिक्विडिटी) आणि डिजिटल कामकाजातील जोखीम यांची काळजी घ्यावी लागेल. डिजिटल बँकिंग म्हणजे इंटरनेट बँकिंग, मोबाइल बँकिंग किंवा ग्राहकांच्या इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक उपकरणाद्वारे बँका ज्या सेवा देतात, जिथे कामाचा एक मोठा भाग मशीन किंवा ऑटोमेशनद्वारे केला जातो. रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे, की गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेल्या नियमांमध्ये समेट घडवून आणण्याची मोठी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या मोहिमेअंतर्गत अशी पाच हजार ६७३ जुनी कालबाह्य परिपत्रके रद्द करण्यात आली आहेत.

याच सुमारास सोन्याच्या बाजारपेठेत भारताची वाढती ताकद पहायला मिळत आहे. पुढील दशकात भारत देशांतर्गत खाणकामाद्वारे सुमारे वीस टक्के सोन्याची मागणी पूर्ण करू शकतो. त्यामुळे तो जागतिक बाजारपेठेत 'किंमत-निर्माता' बनण्याच्या दिशेने वाटचाल करू शकतो. 'वर्ल्ड गोल्ड कौन्सिल' (डब्ल्यूजीसी) च्या भारत प्रदेशाचे सीईओ सचिन जैन यांनी सांगितले, की पुरेसे देशांतर्गत खाणकाम आणि सोन्यासाठी मजबूत बँकिंग प्रणाली नसल्यामुळे भारत जागतिक किमतींचा 'किंमत-निर्माता' राहिला आहे. रिझर्व्ह बँकेच्या पुढाकाराने आणि बँकिंग प्रणालीच्या विकासामुळे भारत सोन्याच्या जागतिक किमतींवर मजबूत पकड मिळवेल आणि 'किंमत-निर्माता' बनण्याच्या दिशेने वाटचाल करेल. भारताला परदेशी बाजारपेठेत ठरवलेल्या किमती स्वीकाराव्या लागतात. तथापि, देशांतर्गत वाढत्या सोन्याच्या खाणींमुळे भारत किंमतींवर प्रभाव पाडण्याची किंवा किंमत ठरवण्याची क्षमता प्राप्त करेल आणि किंमत ठरवणारा देश बनेल. आदित्य बिर्ला समूहाच्या 'नोव्हेल ज्वेल्स'चे सीईओ संदीप कोहली यांच्या मते भारतीय ग्राहकांकडे अंदाजे २५ हजार टन सोने आहे, तर सरकारकडे फक्त ८०० टन आहे. भारताचा सोन्याचा वापर मोठा असूनही ग्राहकांच्या किमतींवर भारतीय बाजारपेठेचा प्रभाव मर्यादित आहे. अन्य एक तज्ज्ञ समित गुहा यांनी पारदर्शक, नैतिक आणि संघर्षमुक्त सोन्याच्या पुरवठ्याचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले, की जागतिक स्पर्धात्मकतेसाठी 'ओईसीडी' आणि 'एलबीएमए'सारख्या मानकांचा अवलंब करणे आवश्यक आहे. गुहा यांनी २४ कॅरेट सोन्याच्या बार आणि बारच्या निर्यातीवरील बंदी उठवण्याची गरजही व्यक्त केली.

# वाऱ्यावरचा 'विकास' जोरदार !



राकेश लोहार

अलिबाग-रोहा, अलिबाग-मुरुड रस्त्याच्या विकासकामाची अवस्था जणू वाऱ्यावरची वरात-गोंगाट मोठा, सजावट भव्य, धामधूम प्रचंड...पण, जे येथील जनतेला अपेक्षित आहे, ते कुठेच पाहायला मिळत नाही. बहुतांशी ठिकाणी रस्त्याच्या कामाचे चित्र असेच आहे. प्रत्येक गावाच्या नाक्या-नाक्यावर उंच होर्डिंग, ज्यावर नेत्यांचा मोठा फोटो आणि त्याखाली महत्त्वाकांशी विकास योजना ठळकपणे लिहिलेली पाहायला मिळत आहे. पण, या होर्डिंगच्या शेजारीच असते-खड्ड्यांचा रस्ता.

रस्ते करताना, विकासकामे करताना बेंबीच्या देठापासून ओरडून नेते आणि त्यांचे बगलबच्चे घोषणाबाजी खूप ताकदीने करताना दिसतात. त्यांच्या या भूलथापांना साधीभोळी जनता भारावून जाते. पण, जेव्हा कामाच्या जागी प्रत्यक्षात भेट दिली जाते, तेव्हा जे वास्तव दिसून येते, तेव्हा सामान्य माणसांच्याही पायाखालची वाळू सरकतेच. काम प्रगतीपथावर- कधी होणार, कसे होणार? याबाबत काहीच कोणालाही माहिती नसते. माहिती होऊसुद्धा दिले जात नाही. एवढी चलाखी सध्या सर्वत्र दिसून येते. हाच खरा विकास म्हणावा का? प्रगती म्हणजे काय? फलक तिथे आहे, हेच या योजनेचे सर्वात मोठे यश म्हणावे, अशीच काम सध्या तालुक्यात रस्त्यांची सुरू आहेत. अलिबाग-मुरुड रस्त्यासाठी सध्या गटारांची कामे जोरदार सुरू आहेत. त्यासाठी मोठ्या प्रमाणात खोदाई करण्यात येत आहे. अलिबागच्या टोकापासून चौलपर्यंत जागोजागी रस्ते खोदून ठेवण्यात आलेत. सध्या तर गटारांचेच काम सुरू आहे. रस्त्याच्या कामास ज्यावेळी सुरुवात होईल, तेव्हा मोठी अडचण सामान्यांची होणार एवढे मात्र नक्की.

परंतु, सरकारला त्याचे काहीच देणे-घेणे आहे, असे वाटत नाही. केंद्र आणि राज्य सरकारकडून रुंदीकरणाचे काम सुरू असल्याने ते कोणी नाकार शकत नाही, अशी दंडेलशाही सध्या सुरू आहे. या रुंदीकरणामध्ये शेकडो वर्षे रस्त्याच्या दुतर्फा येथील जनतेला, बाहेरुन येणाऱ्या पर्यटकांना सावली देणारी, आकर्षित करणारी अनेक झाडे जमीनदोस्त होणार आहेत. परंतु, त्यावर कोणीच बोलायला तयार नाही. झाडांच्या मुळावर उठून खरंच विकास कोणाला हवाय का? तर नकोच! कोकणाचे खरं सौंदर्य झाडा-पानात, शेती-वाड्यांत, बाग-बगीच्यांमध्ये आहे. त्यावरच जर विकासाचा बुलडोझर चालवला जात असेल, तर आनंदीआनंदच! आपण सरकारी जागेत एक इंच जरी अतिक्रमण केले, तरी सरकारी बाबू लगेच आपल्याला नोटीस देतात. पण, आज आपल्याच जागेत, आपलीच घरे रस्त्यासाठी धोक्यात आली आहेत. हे कुठेतरी थांबायलाच हवेय.

सर्व विकास काय रस्त्यांवरच होणार आहे की काय? हजारो कोटींचा खर्च करायचा, टक्केवारीतून कोट्यवधी रुपये लाटायचे, असेच काम सध्या सर्वत्र सुरू आहे. आज लोकांना आरोग्याच्या चांगल्या सुविधा तुम्ही देऊ शकत नाहीत. जिल्हा रुग्णालयाची अवस्था काय आहे? तिथे तज्ज्ञ डॉक्टरांची गेली कित्येक वर्षे वानवा आहे. रुग्णांना पुढील उपचारार्थ मुंबई गाठावी लागतेय. सर्वसामान्यांना मुंबई आणि तेथील खर्च आवाक्याबाहेर ठरत असल्याने अनेकजण उपचारच अर्धवट सोडून देत आहेत. अशी भयावह परिस्थिती आहे. त्यामुळे आरोग्याला प्रथम प्राधान्य देणे गरजेचे आहे. लोकांसाठी करत असलेला विकास पाहायला लोक जिवंत राहणार नसतील, तर त्या रस्त्यावरच्या विकासाचा फायदा काय? कोणाला हवाय असला विकास? जिल्हा रुग्णालय सुधारणार कधी? छोट्या-छोट्या गोष्टींसाठी रुग्णाला बाहेर न्यावे लागत आहे. याची जाणीव सरकारला करुन देणे गरजेचे आहे. चांगल्या शिक्षणासाठी मुलांना पुणे, मुंबईची वाट धरावी लागत आहे. त्यावर चकार शब्द काढायचा नाही. फक्त ज्या ठिकाणी टक्केवारी मिळणार, त्याला प्राधान्य देत विकासाच्या गप्पा मारायच्या, हे कुठेतरी थांबायला हवेय. सर्वसामान्य जनतेने आतातरी जागे होणे गरजेचे आहे. नाहीतर टक्केवारीच्या राजकारणात सामान्य माणूस कुठेल्या कुठे जाईल, हे कळणारसुद्धा नाही. म्हणूनच, सर्वांनीच लक्षात घ्यायला हवेय की, रस्ते करणे म्हणजे विकास नाही. आहेत तेच रस्ते कित्येक वर्षे तसेच असताना, महामार्गाची स्वप्नं सामान्यांना कशासाठी दाखवायची? सामान्य जनतेला पायाभूत सुविधा वेळच्या वेळी मिळणे अपेक्षित असते. परंतु, त्यासाठीसुद्धा त्यांना तारेवरची कसरत करावी लागत असले, तर रस्त्यासाठी होणारा वाऱ्यावरचा विकास काय कामाचा? सामान्य जनतेला एकच सांगणे आहे, सर्वांनी वेळीच सावध व्हा!

लोकसंसद

## बेपर्वा आणि बेफिकीर वाहनचालकांना कोट्यवधींचा दंड



१९ जुलै २०२४ पासून कार्यरत केलेल्या मुंबई-पुणे महामार्गावरील 'बुद्धिमान वाहतूक व्यवस्थापन प्रणाली'ने (इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम-आयटीएमएस) गेल्या दीड वर्षात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांना सुमारे ६०० कोटी रुपयांचे ३६ लाख ई-चलन जारी केले आहेत. यापैकी आतापर्यंत ५ लाख ३८ हजार ई-चलनाच्या माध्यमातून एकूण ९० कोटी रुपयांच्या दंडाची वसुली करण्यात आली आहे. ही वसुली केवळ १५ टक्के इतकी आहे. १७ प्रकारच्या वाहतूक उल्लंघनांसाठी ई-चलन जारी करण्याची तरतूद असली तरी आतापर्यंत देण्यात आलेले ई-चलन हे प्रामुख्याने वेगात गाडी चालवणे, सीटबेल्ट न लावता गाडी चालवणे, लेन कट करणे, चुकीच्या बाजूने प्रवेश करणे आणि गाडी चालवताना मोबाईल फोन वापरणे यासारख्या वाहतूक उल्लंघनांसाठी आहेत. वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांमध्ये कार चालकांचा वाटा सर्वाधिक असून त्यांना १८ लाखांहून अधिक ई-चलन जारी केले गेले. दुसरी गोष्ट म्हणजे अनेकदा एआयचलित कॅमेरा सिस्टीममधील तांत्रिक बिघाडामुळे योग्य लेनमधून जाणारी वाहनेदेखील चुकीच्या दिशेने जात असल्याची नोंद होते आणि त्यासाठी ई-चलन जारी केल्यामुळे चालकांना नाहक दंड भरावा लागतो. असे काही अपवाद असले तरी वाहतूक नियमांचे उल्लंघन करून काही बेपर्वा आणि बेफिकीर वाहनचालक निष्काळजीपणे वाहन चालवतात आणि अपघातास कारणीभूत ठरतात. त्यांच्यावर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे**

दिनविशेष

# मानवी हक्क दिन

मानवी हक्क दिन हा १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहीरनामा स्वीकारला होता. जगभरात मानवी हक्क दिन दरवर्षी १० डिसेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस महत्त्वाचा आहे कारण या दिवशी १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा स्वीकारली. ही घोषणा मानवी हक्कांचा एक आधारशिला आहे आणि सर्व लोकांना समान हक्क आणि सन्मान प्रदान करण्याबद्दल आहे.

वंश, जात, राष्ट्रीयत्व, धर्म, लिंग इत्यादींच्या आधारावर मानवाला वंचित ठेवता येत नाही. मानवी हक्क हा प्रत्येकाच्या मूलभूत हक्क आहे. लोकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे हा यामागचा उद्देश आहे. आरोग्य, आर्थिक, सामाजिक आणि शिक्षण यांचा मानवी हक्कांमध्ये समावेश होतो. मानवी हक्क हे मानवाला जन्मापासूनच उपलब्ध आहेत. जात, लिंग, धर्म, भाषा, रंग आणि राष्ट्रीयत्व त्यांना मिळण्याच्या मार्गात येत नाही. मानवाधिकार दिनाची औपचारिक सुरुवात १९५० पासून झाली, जेव्हा असेंब्लीने ठराव ४२३ संमत करून सर्व राज्ये आणि इच्छुक संस्थांना प्रत्येक वर्षी १० डिसेंबर हा मानवाधिकार दिन म्हणून स्वीकारण्याचे आमंत्रण दिले. जेव्हा सर्वसाधारण सभेने घोषणा स्वीकारली, ४८ राज्यांच्या बाजूने आणि आठ गैरहजर राहिल्या, तेव्हा ते मसर्व लोकांसाठी आणि सर्व राष्ट्रांसाठी एक सामान्य मानक उप-लब्धीफ म्हणून घोषित केले गेले. ज्याच्या दिशेने व्यक्ती आणि समाजांनी मप्रगतीशील उपायांनी प्रयत्न केले पाहिजेत, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय , त्यांची सार्वत्रिक आणि प्रभावी ओळख आणि पालन सुरक्षित करण्यासाठी. वकिल आणि समीक्षक दोघांनीही हे उपाय ङ्गङ्घकायद्यांपेक्षा अधिक घोषणात्मक, बंधनकारक करण्यापेक्षा अधिक सूचकफ म्हणून प्राप्त केले. आपल्या देशात २८ सप्टेंबर १९९३ पासून मानवी हक्क कायदा लागू झाला आणि सरकारने १२ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना केली. दुसऱ्या महायुद्धात झालेल्या अत्याचारांनी जगाला मानवी हक्कांचे महत्त्व समजण्यास भाग पाडले. युद्धानंतर संयुक्त राष्ट्रांची स्थापना करण्यात आली आणि मानवी हक्क सुरक्षित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय फ्रेमवर्क तयार करण्याचा प्रयत्न केला गेला. ही घोषणा सर्व लोकांसाठी समान हक्क घोषित करते, जसे की जगण्याचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, मत व्यक्त करण्याचा अधिकार आणि भेदभावापासून मुक्त होण्याचा अधिकार.

मानवाधिकार दिन आपल्याला याची आठवण करून देतो की सर्व मानव समान आहेत आणि सर्वांना समान अधिकार आ-हेत. हा दिवस आपल्याला अशा लोकांसाठी विचार करण्याची आणि काम करण्याची संधी देतो ज्यांना त्यांचे हक्क मिळत नाहीत. हा दिवस आपण आपल्या हक्कांसाठी लढले पाहिजे आणि इतरांच्या हक्कांचा आदर केला पाहिजे.

१.जागरुकता वाढवणे- हा दिवस मानवाधिकारांबद्दल लोकांना जागरुक करण्याची एक महत्त्वाची संधी आहे. हे लोकांना त्यांच्या अधिकारांबद्दल सांगते आणि ते या अधिकारांचा वापर कसा करू शकतात हे समजण्यास मदत करते.

२. समाजात बदल घडवून आणणे- मानवाधिकार दिन ही देखील समाजात बदल घडवून आणण्याची एक संधी आहे. हा दिवस लोकांना एकत्र येण्याची आणि मानवी हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या मुद्द्यांवर आवाज उठवण्याची संधी देतो.

३.आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्सा-हन देणे- मानवाधिकार दिन आंतरराष्ट्रीय सहकार्याला चालना देण्यासाठी मदत करतो. हा दिवस देशांना एकत्र येण्याची आणि मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी काम करण्याची संधी देतो.

४. शांतता आणि स्थिरतेला प्रोत्साहन देणे - शांतता आणि स्थिरतेसाठी मानवी हक्कांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. जेव्हा लोकांच्या हक्कांचा आदर केला जातो तेव्हा त्यांना अधिक सुरक्षित आणि समृद्ध वाटते.

भारतात मानवाधिकार दिनभारतातही मानवी हक्क दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. भारत सरकार आणि विविध स्वयंसेवी संस्था या दिवशी अनेक कार्यक्रम आयोजित करतात. या कार्यक्रमांमध्ये परिसंवाद, कार्यशाळा, प्रदर्शने इ. मानवाधिकारांबद्दल लोकांना जागरुक करून त्यांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी प्रवृत्त करणे हा या कार्यक्रमांचा उद्देश आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१० डिसेंबर**

१) श्री.हरिश्चंद्र बालकृष्ण पाटील
अलिबाग,१०-१२-१९४०
२)श्री.विठोबा धर्मा गावंड
मु.मानी, अलिबाग
१०-१२-१९४६
३)श्री.रविंद्र शंकर पंडित
चेंढरे-अलिबाग, १०-१२-१९५५
४)श्री.प्रकाश रामदास भगत
अलिबाग १०-१२-१९५२

## सतीशचंद्र मोरे यांचे निधन

**मुंबई, :** विद्रोही कवी पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या कवितांना प्रभावीपणे संगीतबद्ध करण्याची विलक्षण क्षमता असलेले, तसेच वैशाली सामंत, अवधूत गुप्ते, साधना सरगम, सुरेश वाडकर, कैलाश खेर, शान, शंकर महादेवन, स्वरूप खान,



आनंदी जोशी आणि नेहा कक्कर व इतर अनेक दिग्गज गायकांसोबत काम केलेले जेष्ठ आणि हरहुन्नरी संगीतकार सतीशचंद्र दत्तात्रय मोरे यांचे प्रदीर्घ आजाराने २ डिसेंबर २०२५ च्या मध्यरात्री माउंट मेरी चर्चजवळील शांती आवेदना येथे निधन झाल्याचे त्यांच्या स्नेही तृप्ती करलकर यांनी कळविले. सतीशचंद्र हे ५६ वर्षांचे होते. निस्वार्थी, दिलखुलास आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्व म्हणून ते संगीतक्षेत्रात ओळखले जात. त्यांच्या निधनाने संगीतविश्वात हळहळ व्यक्त केली जात आहे. यांचे दशक्रिया विधी सोमवार (दि .१५) डिसेंबर रोजी पळस येथील श्री शंकर मंदिराजवळ तर उत्तरकार्य गुरुवार (दि. १८) डिसेंबर रोजी शिर्के यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती शिर्के कुटुंबियांकडून देण्यात आली आहे.

# आग नियंत्रणासाठी उपाय योजना

## • अत्याधुनिक एरियल लॅडरची खरेदी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार पनवेल महानगरपालिकेने ५५ मीटर व २८ मीटर उंचीपर्यंत कार्यक्षम अशा अत्याधुनिक एरियल लॅडर प्लॅटफॉर्म वाहनांची खरेदी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पनवेल शहरात गेल्या काही वर्षांत वेगाने वाढ होत असून, लोकसंख्या वाढी बरोबरच गृहनिर्माण प्रकल्प, व्यापारी संकुले, मॉल्स, रुग्णालये, हॉटेल्स तसेच उद्योग-क्षेत्र यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. यासोबतच उंच इमारती, हाई-राईज रेसिडेन्शियल टॉवर्स, कार्यालयीन संकुले मोठ्या प्रमाणावर उभी राहत आहेत. या पार्श्वभूमीवर आगीच्या घटना व इतर आपत्कालीन परिस्थितीत त्वरित आणि प्रभावी प्रतिसाद देणे आवश्यक आहे. ही गरज लक्षात घेऊन हा निर्णय घेतला आहे.



महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडे उपलब्ध असलेली साधनसामग्री मर्यादित असून, विशेषतः उंच इमारतींमध्ये आग लागल्यास किंवा अडकलेल्या व्यक्तींना वाचवायचे असल्यास आवश्यक त्या उंचीपर्यंत पोहोचण्याकरिता आधुनिक एरियल लॅडर प्लॅटफॉर्मची आवश्यकता होती. ५५ मीटर एरियल लॅडर प्लॅटफॉर्म हे उंच इमारतींमध्ये १५ ते २० मजले व त्यापेक्षा जास्त उंचीवर पोहोचण्यासाठी उपयोगी ठरेल, तर २८ मीटर एरियल लॅडर प्लॅटफॉर्म मध्यम उंचीच्या इमारती, गृहनिर्माण संकुले, रुग्णालये, शाळा, हॉटेल्स आदी ठिकाणी बचावकार्यासाठी उपयुक्त ठरेल.

सुरक्षिततेसाठी तांत्रिक निकषांनुसार पात्र कंपन्यांकडून प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यानुसार आवश्यक तांत्रिक वैशिष्ट्ये, सुरक्षितता मानके, कार्यक्षमता व दीर्घकालीन देखभाल खर्च यांची सखोल तपासणी करून योग्य तो प्रस्ताव निवडण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रकल्पावर सुमारे २२ कोटींहून अधिक खर्च येणार असून, ही गुंतवणूक शहरवासीयांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

महानगरपालिकेचा अग्निशमन विभाग अधिक सक्षम, आधुनिक आणि सुसज्ज होणार आहे. महानगरपालिकेच्या या निर्णयामुळे नागरिकांना अधिक सुरक्षित वातावरण मिळेल, तसेच भविष्यातील वाढत्या लोकसंख्या व उंच इमारतींशी संबंधित आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रशासन सज्ज राहील.

आपत्ती प्रसंगी सत्वर प्रतिसाद दोन आधुनिक लॅडर प्लॅटफॉर्ममुळे आपत्ती प्रसंगी सत्वर प्रतिसाद पुढील महत्त्वाची कामे अधिक प्रभावीपणे

> नागरिकांचे प्राण व मालमत्तेचे संरक्षण हीच महापालिकेची सर्वोच्च जबाबदारी असून, त्या दृष्टीने पनवेल महानगरपालिका सातत्याने आधुनिक सुविधा उभारण्याचा प्रयत्न करत आहे. ५५ मीटर व २८ मीटर एरियल लॅडर प्लॅटफॉर्मची खरेदी हा त्याचाच एक महत्त्वाचा भाग आहे.
> -मंगेश चितळे,
> आयुक्त तथा प्रशासक,
> पनवेल महानगरपालिका.

पार पाडणे शक्य होणार आहे. उंच इमारतींमध्ये लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवणे.

अडकलेल्या नागरिकांचे सुरक्षितपणे रेस्क्यू करणे, औद्योगिक व रहिवास क्षेत्रातील दुर्घटनांमध्येबचावकार्य करणे, नैसर्गिक आपत्ती व आपत्कालीन परिस्थितीत जलद प्रतिसाद देणे ही कामे तत्काळ करणे शक्य होणार आहे.

## नेरळमध्ये तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा



**। नेरळ । प्रतिनिधी।**

नेरळ येथील विद्या विकास मंदिर येथे गीताजयंतीनिमित्त तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. या तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत नेरळ विद्या मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळवला.

कार्यक्रमाला गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे, तालुका गट सामनावयक प्रदीप सुर्वे अरुण धारप,कार्यवाह अमित जोगळेकर तसेच मंडळाचे सभासद व माजी कार्यवाह दिलीप कवाडकर तसेच शाळेच्या चारही विभागीय मुख्याध्यापिका उपस्थित होत्या.

स्पर्धेसाठी कर्जत तालुक्यातील अनेक शाळांमधून एकूण ४२ विद्यार्थी सहभागी झाले होते.

तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून संघपाल वाठोरे, उत्तरा चितळे, नीता बांदल, संदीप गोसावी यांनी काम पाहिले. स्पर्धा आठवी ते दहावी आणि पाचवी ते सातवी अशा दोन गटात स्पर्धा झाल्या होत्या. त्यातील मोठ्या गट नेरळ विद्या मंदिर शाळेची अक्षरा राजेंद्र शिंदे आणि लहान गटात नेरळ विद्या मंदिर शाळेची आर्या गजानन फुलावरे हिने प्रथम क्रमांक पटकावला. स्पर्धेचे सूत्रसंचालन शाळेच्या सहशिक्षिका यशस्विनी सहस्रबुद्धे बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी सायली गंध्रे यांनी केले तर वासुदेव निरगुडा यांनी आभार मानले.





## राजिप गायमुख शाळेचे विज्ञान प्रदर्शनात यश

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन अ. ल. लोखंडे विद्यामंदिर पिटसई हायस्कूल येथे २, ३ डिसेंबर मध्ये पार पडले. यामध्ये दरवर्षीप्रमाणे राजिप शाळा गायमुख यांनी सहभाग घेऊन मानसी प्रकाश दुरे हिने तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात जलविद्युत निर्मिती या प्रतिकृतीचे द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

यशा बद्दल मुख्याध्यापक कृष्णा कांबळे राहुल उगलमुगले, चेतन जगताप, अमिष भौड व शाळा व्यवस्थापन समितीतर्फे अभिनंदन करण्यात आले.

## वाहतूक सुरक्षा मार्गदर्शन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

डॉ.पारनेरकर महाराज विद्यालय वाशिवली येथे मंगळवार (दि. ९) अलिबाग वाहतूक सुरक्षा विभाग व रसायनी वाहतूक सुरक्षा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना वाहतूक सुरक्षा, पालकांना हेल्मेट सक्ती, दररोज होणारे सायबर गुन्हे व व्यसनाधीनता बाबत माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले. अलिबाग वाहतूक विभागाच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र आरोळे यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या वाहतूक गुन्ह्यांबद्दल बाबत, हेल्मेटच्या वापराबाबत तसेच सायबर गुन्हे व सजगता या विषयावर सखोल माहिती दिली.

यावेळी रसायनी वाहतूक पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक नामदेव डोके व वाहतूक पोलीस अधिकारी निलेश गडाख व शिक्षक- शिक्षीका उपस्थित होते. या सर्व अधिकारींचे आभार डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. आर. पाटील यांनी केले.

## प्रभाकर भगत यांचे निधन

**भाकरवड :** अलिबाग तालुक्यातील सुभाषनगर आंबेपूर गावचे रहिवासी प्रभाकर भगत यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी शनिवार (दि. ६) डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांनी प्राथमिक शिक्षक म्हणून ४० वर्ष सेवा केली होती. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सुन प्रगती, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य दहावा मंगळवार (दि.१६) डिसेंबर रोजी ओंकारेश्वर मंदिर पेझारी येथे तर तेरावे शुक्रवार (दि १९) डिसेंबर रोजी राहत्या घरी सुभाषनगर पेझारी येथे होणार आहेत.

## काशिदमध्ये विज्ञान प्रदर्शनाचा शुभारंभ

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुका पंचायत समिती शिक्षण विभाग व जंजिरा विद्या मंडळ संचलित माध्यमिक विद्यालय, काशिद आणि विज्ञान, गणित अध्यापक संघ मुरुड यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय तालुका विज्ञान प्रदर्शनाचा शुभारंभ नायब तहसीलदार संजय तवर यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक शाळांच्या ४८ तर माध्यमिक शाळांनी १८ प्रतिकृती सादर केल्या. शिक्षकांचे शैक्षणिक साहित्य, प्रयोगशाळा परिचरांचे साहित्य हे यावेळच्या स्पर्धेच्या



आकर्षणाचा विषय आहे.

यावेळी पंचायत समिती मुरुडचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, ग्रामविस्तार अधिकारी प्रसाद माळी, शिक्षण विस्तार अधिकारी महेश कवळे, सुनील पाटील, दिनेश म्हात्रे, विजय शिंदे, संतोष राणे, नंदकुमार काते, सुभाष खेडेकर, आर डी नाईक, निलेश वारगे, जितेंद्र मकू, किशोर गंभे, सरोज राणे आदी मान्यवर तसेच बालवैज्ञानिक, तालुक्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, केंद्रप्रमुख साधनव्यक्ती, विशेष शिक्षक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गणपत शिर्के यांना देवाज्ञा

**नागोठणे :** नागोठण्याजवळील पळस गावातील सामाजिक कार्यकर्ते गणपत लक्ष्मण शिर्के यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक विवाहित मुलगा, तीन विवाहित मुली यांच्यासह मोठा परिवार आहे. शिर्के यांच्या पार्थिवावर पळस येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नागोठणे परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, शिर्के यांचे नातेवाईक, सगेसोयरे आणि पळस ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भात मळणीसाठी मजुरांची चणचण

**। पालघर । प्रतिनिधी ।**

पालघर तालुक्यातील मलवाडा, आलोंडे, साखरा, पाचमाड, तलवाडा परिसरात भात झोडणी अंतिम टप्यात आली आहे. भात झोडणीसाठी व मळणीसाठी मजुरांची चणचण भासत आहे. त्यामुळे तालुक्यातील बळीराजा त्रस्त झाला आहे. तालुक्यात दिवाळीमध्ये अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या भात पिकाची नासाडी झाल्यामुळे तसेच भात पिकाची कामे वेळेवर होऊ शकली नाहीत व पावसाने सतत उघडीप दिल्याने रखडलेली भात झोडणी



कामे अंतिम टप्यात आली आहेत.

मात्र, ही कामे एकाचवेळी सुरू झाल्याने तालुक्यात मजूर मिळणे कठीण झाले आहे. तसेच भात कापणीसाठी वाढीव मजुरी देऊन कशीबशी शेतकऱ्याने भातकापणी केली. परंतु झोडणीसाठी मजुरांचा तुटवडा भासत आहे.

विक्रमगड तालुक्यात खेडो -पाडी सध्या स्थितीत शेतात खळा तयार करून भल्या पहाटे बळीराजा थंडीत अंधूक प्रकाशात कामाला सुरुवात करतो. दोनशे ते पाचशे भाताच्या भाऱ्यांची गोलाकार उडवी रचून त्यातील भारे सकाळी १० वाजेपर्यंत झोडण्याचा त्याचा प्रयत्न असतो. यावेळी झोडणीसाठी भारे जास्त असतील आणि मनुष्यबळ कमी असेल तर दुपारच्या भोजनानंतर ३.३० वाजता पुन्हा झोडणीला सुरुवात होते.

उन्हात झोडणी केली तर पेंढ्यामुळे अंगाला खाज सुटण्याचा धोका असतो. दरवर्षी शेतमजुरांची भरमसाठ वाढलेली मजुरी, शेतमजुरांची कमतरता, बियाणांसह खतांचे वाढलेले दर आणि शेवटी

> सद्या स्थितीत विक्रमगड तालुक्यात भात झोडणी अंतिम टप्प्यामध्ये आली आहे. काही भागात भात झोडणी झाली आहे. मजुरांची कमतरता, वाढती मजुरी, भात बियाणे, खते, औषधे याचे वाढते भाव, निसर्गाचा लहरीपणामुळे होणारे शेतकऱ्यांचे नुकसान त्या मानाने भाताला अत्यल्प हमी भाव या मुले शेतकरी अडचणीत सापडला आहे.
> -कमळाकर भोईर, शेतकरी

शेतीमालाला मिळणारा अल्पस्वल्प हमी भाव या कारणांमुळे शेती नाइलाजास्तव करायला लागत असल्याची भावना शेतकरी बोलून दाखवितात.

**ढगाळ वातावरणामुळे बागायतदार चिंतेत | अवकाळीमध्ये उत्पादनात घट होण्याची शक्यता**

# यंदाचा हापूस हंगाम आव्हानात्मक

**। गुहागर । प्रतिनिधी ।**

कोकणातील हापूस आंबा बागायतदारांसाठी हंगामी उत्पन्नाचा सर्वात महत्वाचा टप्पा म्हणजे डिसेंबर-जानेवारी महिन्यात येणारा मोहोर होय. या काळात सलग कमी तापमान राहिल्यास मोहोर योग्य प्रमाणात येतो व टिकून राहतो. याच पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेली थंडी अचानक ओसरल्याने आंबा बागायतदारांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. वातावरणातील तापमान वाढल्याने मोहोरावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

कृषीतज्ज्ञांच्या मते हापूस आंब्याच्या गुणवत्तापूर्ण मोहोरासाठी आणि भरघोस उत्पादनासाठी किमान १४ अंश सेल्सिअसपेक्षा कमी तापमान सलग २१ दिवस



आवश्यक असतात. या थंड हवेमुळे झाडाची वाढ नियंत्रित राहते आणि फुलोर्यातील स्थिरता टिकते. मात्र रत्नागिरी परिसरात मागील पाच-सहा दिवसांपासून सकाळ-संध्याकाळची थंडी पूर्णपणे गायब झाली आहे. दिवसाचे कमाल आणि किमान तापमान दोन्ही वाढल्यामुळे मोहोर कुजण्याची, किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची तसेच मोहोर पूर्णपणे गळून पडण्याची भीती बागायतदार व्यक्त करीत आहेत. याबाबत शेतकर्यांसाठी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले आहे. बागांमध्ये नियमित स्वच्छता ठेवणे, गळून पडलेले मोहोर त्वरित काढून नष्ट करणे, किडींची वाढ रोखण्यासाठी औषधफवारणी करणे, हवामान अंदाजावर सतत लक्ष ठेवणे, स्थानिक हवामान केंद्रांच्या प्राथमिक आकडेवारीनुसार, तापमानात झालेली वाढ काही अंशांनी जरी दिसत असली तरी त्याचा आंबा उत्पादनावर मोठा प्रभाव पडू शकतो.

वातावरणातील आर्द्रता आणि उष्णतेचा तीव्र बदल हे किडींसाठी पोषक वातावरण ठरू शकते. काही बागायतदारांनी मोहोर लवकर यावा म्हणून कल्टार वापरले होते. यामुळे त्यांच्या बागांत काही प्रमाणात मोहोर दिसू लागला आहे. परंतु ज्यांनी नैसर्गिकरीत्या मोहोर फुटण्याची वाट बघितली, त्यांच्यासाठी थंडीचा ओसरलेला परिणाम अधिक धोकादायक ठरू शकतो. नैसर्गिक मोहोर फुटणे थंडीवर अवलंबून असल्याने आता तो लांबणीवर जाण्याची किंवा कमी प्रमाणात येण्याची शक्यता वाढली आहे. अवकाळी पावसामुळे ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये आंबा उत्पादनास मोठा फटका बसला. नुकतीच सुरू झालेली गुलाबी थंडी बागायतदारांसाठी आशेचा किरण ठरणार होती. परंतु, थंडी पुन्हा ओसरल्याने संपूर्ण क्षेत्रात निराशा पसरली आहे. हवामानाचा लपंडाव सुरूच राहिल्यास यंदाचा हापूस हंगाम आव्हानात्मक ठरू शकतो. बागायतदार, कृषीतज्ज्ञ व प्रशासन यांच्यात समन्वय वाढवण्याची गरज प्रकर्षाने जाणवत आहे. ढील काही दिवसांचे वातावरण हाच आगामी मोसमाचा निर्णायक क्षण ठरणार आहे. गुलाबी थंडी आणखी पंधरा दिवस राहिली असती तर उत्तम आणि निरोगी मोहोर टिकला असता. पण आता हवामान बदलामुळे मोहोर गळून पडण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे बागायतदार चिंतेत पडला आहे.

**निवडक**

## लायन्स क्लबतर्फे आरोग्य शिबीर

**रसायनी :** लायन्स क्लब खालापूर व श्री बापूजी वारकरी संप्रदाय ग्रामस्थ मंडळ तुकसई यांच्या संयुक्त विद्यमाने व मेडिकव्हर हॉस्पिटल खारघर यांच्या सहकार्यातून तुकसई- खालापूर रायगड येथे अखंड हरीनाम साप्ताहमध्ये महाआरोग्य शिबीर राबविण्यात आले. सदर शिबिरात मधुमेहाचे १०० रुग्णांनी लाभ घेतला. ब्लड प्रेशरचे १०० रुग्ण, ईसीजी तपासणी, डोळे तपासणी रुग्ण, मोफत चष्मे वाटप करण्यात आले. यालेळी लायन्स क्लब खालापूर अध्यक्ष किशोर पाटील, अध्यक्षा शिवानी जंगम, लायन लहू भोईर, रामदास पाटील, ज्ञानेश्वर पाटील, रामदास उतेकर, अजित पांगारें व ग्रामस्थ उपस्थित होते.



## इनरव्हील क्लबतर्फे मार्गदर्शनपर व्याख्यान



**कर्जत :** कर्जत तालुक्यातील अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स आणि युनायटेड वे मुंबईच्या संपूर्ण स्टाफसाठी असंभव चित्रपटाचा शो आयोजित करून इनर व्हील क्लब ऑफ कर्जतच्या सदस्यांनी एक आगळीवेगळी कल्पना मांडली. या उपक्रमामध्ये इनरव्हील क्लब ऑफ कर्जतच्या अध्यक्षा शिल्पा दगडे, मोनिका बडेकर, सरस्वती चौधरी, कश्यपी ठक्कर, वैशाली मुसळे, संजीवनी घुमरे, उज्वला पाटील, उत्तरा वैद्य, वनिता सोनी, रूपा खणाल उपस्थित होत्या. सचित पाटील-अभिनेता, दिग्दर्शक, निर्माते आणि या चित्रपटाचा जीव - ज्यांनी झूम मिटिंगद्वारे महिलांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी प्रत्येकाला घरगुती हिंसाचारावरील प्रभावी मार्गदर्शनपर व्याख्यान इनर व्हील क्लब ऑफ पनवेलच्या सदस्या ॲड. सुजाता चव्हाण यांनी केले.

## वेदक विद्यामंदिर तळा शाळेचा सहभाग



**तळे :** शिक्षण विभाग, पंचायत समिती तालुका तळा, अशोक ल. लोखंडे विद्यामंदिर पिटसई व गणित-विज्ञान अध्यापक मंडळ तळा, जि. रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने तळा तालुका विज्ञान प्रदर्शन सन २०२५-२६ श्री. अशोक ल लोखंडे विद्यामंदिर पिटसई येथे आयोजित करण्यात आले होते. यामध्ये श्री. गोपीनाथ म. वेदक विद्यामंदिर तळा या शाळेने एकूण तीन गटामध्ये विविध प्रकारच्या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. ई. १ ली ते ५ वी या गटामध्ये श्लोक शिर्के ( इ. ५ वी ) याने प्रतिकृती स्पर्धेत प्रथम, इ ६ वी ते ८ वी या गटामध्ये कुमार हर्षवर्धन धनंजय पवार ( इ. ८ वी ) याने वक्तृत्व व निबंध स्पर्धेत द्वितीय तर इ. ९ वी ते १२ वी या गटामध्ये स्वरा गायकवाड (इ. १० वी) हिने प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रथम तर वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावून आपल्या शाळेचे नाव उंचावले आहे. माध्यमिक शिक्षक प्रतिकृतीमध्ये प्रथम क्रमांक भुरे प्राप्त झाला. पारितोषिक विजेत्यांचे विज्ञान शिक्षक महाडकर, मचे, कजबजे, भुरे, मुख्याध्यापक यांचे संस्था अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व पदाधिकारी यांचेवतीने अभिनंदन करण्यात आले.




## डॅफोडिल्स शाळेत मार्केट कार्निव्हल उत्साहात

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील डिकसळ येथील डॅफोडिल्स इंग्लिश मीडियम स्कूल येथे मार्केट कार्निव्हल मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण करण्याच्या उद्देशाने हे उपक्रम आयोजित करण्यात आले होते. मुलांना नफा-तोटा यांची प्रत्यक्ष शिकवण मिळावी हा मुख्य हेतू या उपक्रमाचा होता. कार्यक्रमाचे उद्घाटन गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती कर्जत अनंत खैरे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रदीप सुर्वे एम. प्रसाद, उपाध्यक्ष एस. के. सिंग, डी. एफ निंबाळकर तसेच शाळेच्या प्राचार्या आरती सावंत उपस्थितीत होते. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध वस्तू, खाद्यपदार्थ, हस्तकला साहित्य, खेळणी आणि आकर्षक स्टॉल्समुळे शाळेच्या संपूर्ण परिसरात रंगतदार बाजारपेठेचे वातावरण अनुभवायला मिळाले. प्रत्येक स्टॉलवर विद्यार्थी विक्रेते बनून व्यवहार करीत होते. पैशांचे नियोजन, किंमत धोरण, ग्राहकांशी संवाद, नोंदी ठेवणे याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाल्याने विद्यार्थ्यांचे आर्थिक व सामाजिक कौशल्य अधिक विकसित झाले.

## वाकण नाक्यावर अवैध पार्किंग

**सुकेळी :** मुंबई-गोवा महामार्गावरील तसेच वाकण-पाली -खोपोली मार्गाकडे येण्या-जाण्यासाठी महत्वाचा नाका आहे. याच नाक्यावर अनेक हॉटेल्स आहेत. त्यामुळे महामार्गावरून तसेच वाकण-पाली-खोपोलीकडे येणाऱ्या-जाणाऱ्या गाड्या चहा-नाष्टा करण्यासाठी नाक्यावरील हॉटेलच्या समोर उभ्या करतात. परिणामी त्याचा त्रास स्थानिक वाहनचालकांसह पादचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात होत आहे. अनेकदा वाहनचालकांमध्ये शुल्लक कारणांवरुन वाद होण्याच्या घटना घडत आहेत.



# निवडक

## पनवेल मेल मोटर डेपोमध्ये रक्तदान

**पनवेल :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून, पनवेल येथील मेल मोटर डेपो (डाक विभाग) येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी मेल मोटर सेवा, मुंबईचे वरिष्ठ व्यवस्थापक हेमंतकुमार सिंग उपस्थित होते. या शिबिरात एकूण ४० स्वयंसेवकांनी उत्साहाने रक्तदान केले. रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी आणि रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी डाक विभागातील कर्मचाऱ्यांनी दाखवलेली ही सामाजिक बांधिलकी कौतुकास्पद ठरली.




## घरफोडीत लाखोंचा ऐवज लंपास

**पनवेल :** करंजाडे वसाहतीमध्ये एका घरातून चोरांनी तब्बल दीड लाखांचे सोन्याचे दागिने लंपास केले. ही मध्यरात्रीच्या सुमारास घडली. करंजाडे येथील आर पॉकेट १ येथील शाम नाईक यांच्या इमारतीमधील एका सदनिकेत ही घरफोडीची घटना घडली. रात्री नऊ वाजल्यापासून पहाटेदरम्यान ही चोरी झाली. चोरांनी रिंगा, चार बांगड्या आणि अंगठी असे दागिने चोरले. याबाबत पनवेल शहर पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत.

## कृष्णा केणी यांचे निधन

**चिरनेर :** उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथील निवृत्त ग्राम विकास अधिकारी कृष्णा सोमा केणी यांचे मंगळवार (दि.९) वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धपकाळाने चिरनेर कातळपाडा येथील राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तिधाम स्मशानभूमीत नातेवाईकांसह ग्रामस्थ व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थिती अंत्यसंस्कार करण्यात आले. शेतकरी कामगार पक्षाचे ते निष्ठावंत कार्यकर्ते असल्यामुळे अखेरपर्यंत त्यांनी लालबावटा खांद्यावर घेतला होता. अंगात अंगभूत नाट्यगुण असल्यामुळे, एकेकाळी त्यांनी ऐतिहासिक व सामाजिक नाटकातून अनेक छोट्या मोठ्या भूमिका साकारून, ग्रामीण रंगभूमी गाजवून सोडली. त्यांच्या पश्चात पत्नी, पुत्र, विवाहित कन्या, सुना, जावई, नातवंडे, पंतवंडे असा आप्त परिवार आहे.



## करंजाडेतून तरुण बेपत्ता



**पनवेल :** करंजाडे येथील राहत्या घरातून एक तरुण कोणास काही एक न सांगता निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. प्रणित प्रदिप शिंदे (वय- २५ वर्षे, रा. अनंत सोसायटी, सेक्टर- आर ४, करंजाडे) असून त्याची उंची ८ इंच अंदाजे, बांधा मध्यम, रंग- २४८ सावळा, चेहरा-गोल, केस-काळे जाड वाढलेले नाक मोठे बसके, अंगात नेसुन गुलाबी रंगाचा टी शर्ट, मिलीटरी रंगाची पॅन्ट, सोबत मोबाईल नेलेला नाही तसेच भाषा मराठी, हिंदी भाषा बोलता येथे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई संपर्क क्र.८६५५३५४१११ वर किंवा तपासी अमंलदार एस.आर. जाधव मोबा नं. ८०९७१७८०६६ किंवा प्रदिप शिंदे, मोबा नं. ८६६८४८१६६८ वर संपर्क साधवा असे आवाहन करण्यात आला आहे.

## कुष्ठरोग शोध मोहिमेत रुग्णाचा शोध

**नवीन पनवेल :** पनवेल तालुक्यामध्ये १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत कुष्ठरोग शोध मोहीम अभियान राबविण्यात आले. पनवेल तालुक्यामध्ये ग्रामीण भागातून ७२ हजार ९७४ घरांना भेटी देऊन त्यामधील ३ लाख ७५ हजार ६६० लोकांची तपासणी करण्यात आली. यासाठी एकूण २६० पथके व ५१ पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. या मोहिमे दरम्यान १४ दिवसांमध्ये २ हजार ९५२ संशयित रुग्णांची तपासणी केली. त्यापैकी एकूण २३ रुग्णांना कुष्ठरोगाची लागण झाल्याची आढळून आले. या रुग्णांवर उपचार सुरू करण्यात आले. जानेवारी २०२५ पासून डिसेंबर महिन्यात ८६ कुष्ठ रुग्णांवरती उपचार चालू आहेत.ही मोहीम तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अपर्णा सागर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये संशयित कुष्ठरुग्ण तपासणीचे काम प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सायली मानकर, डॉ. अस्मिता बोंबटकर, डॉ. प्रभाकर पाटील, डॉ. आकाश वावेकर, डॉ. प्रणव उरणकर व तालुका पर्यवेक्षक राजेंद्र वानखडे, शरद बडे व डॉ. संदिप तोडकरांनी केले.

## पनवेल बस आगारात प्रवाशांची लूट

**पनवेल :** राज्य परिवहन महामंडळाच्या पनवेल बस आगारात प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. प्रवाशांच्या तुडुंब गर्दीचा फायदा घेत एका अज्ञात चोरट्याने ज्येष्ठ नागरिकाच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हातोहात लांबवले. या घटनेमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून बस आगार प्रशासनाने पोलिसांच्या मदतीने तात्काळ सुरक्षा वाढवण्याची मागणी होत आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, सुमारे १ लाख ४० हजार रुपये किमतीची सोनसाखळी आणि पेंडट चोरीला गेल्याचे तक्रारीत नमूद केले आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- ऑफिसमध्ये कामाला मुलगी पाहिजे पात्रता- Bsc/Bcom, व Computer ची माहिती वेळ - सकाळी ९-सायं-६:३० ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार-१०,०००महिना, रविवार-सुट्टी. Contact- 9823585321
- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजे शिक्षणाची अट नाही ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार-१२,००० महिना, रविवार-सुट्टी. संपर्क - ९८२३५८५३२१
- Job opportunity - Office staff required for office in Alibag. Fresh graduate and post graduate candidates can call 9923750549 For interview
- अलिबाग येथे घरकामासाठी बाई, मुलगी पाहिजेत वेळ ९ ते ६. फोन ८१४९८६५६२५.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# राज्यमहामार्गासाठी अधिकाऱ्यांना अल्टिमेटम

**|| मनसेचा एमएसआरडीसी कार्यालयात दणका || मार्गाच्या दुरावस्थेमुळे वारंवार अपघात**

| पाली /बेणसे | प्रतिनिधी |

**पाली खोपोली राज्य महामार्गावर मोठाले खड्डे पडले आहेत. मात्र एमएसआरडीसी प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी, निषेध व जाब विचारण्यासाठी करण्यासाठी मनसे सुधागड तालुकाध्यक्ष सुनील साठे यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी नुकतेच थेट मुंबई येथे एमएसआरडीसी कार्यालयात जाऊन दणका दिला. याबरोबरच येथील कार्यकारी अभियंता यांना यासंदर्भात जाब विचारून अक्षरशः धारेवर धरले. रस्ता व्यवस्थित केला नाही तर मनसे स्टाईलने खळखट्याक आंदोलन केले जाईल असा इशारा देखील यावेळी देण्यात आला.**

अवघ्या दोन तीन वर्षांपूर्वी रुंदीकरण पूर्ण झालेल्या वाकण पाली खोपोली राज्य महामार्गावर जीवघेणे खड्डे पडले आहेत. अतिशय महत्त्वाच्या असणाऱ्या या मार्गाच्या दुरावस्थेमुळे अपघात होत आहेत. त्याचबरोबर अनेकांचे जीव देखील गेले आहेत. यासंदर्भात मनसेने या आधी खड्ड्यांमध्ये होड्या सोडून आंदोलन केले होते. तसेच वारंवार संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क करत आहेत. त्याचबरोबर पालीतील संघर्ष ग्रुपने देखील आंदोलन केले होते. अखेर या सर्व आंदोलनानंतर एमएसआरडीसीने येथील खड्डे तात्पुरत्या स्वरूपात बुजवले. मात्र पुन्हा खड्ड्यांनी डोके वर काढले आहे. या मार्गावरील खड्ड्यात आदळून अनेक अपघात होत आहेत. वाहनांचेही मोठे नुकसान होत आहे. काही जणांचा जीव देखील गेला आहे. त्यामुळे प्रवासी व नागरिकांचा संताप आता अनावर होत आहे.

### केलेला खर्च वाया

वाकण पाली खोपोली हा राज्य महामार्ग क्र. ५४८ (अ) एकूण ३९ किलोमीटर लांबीचा आहे. सदर रस्त्याचे काम २०१६ पासून शासनाच्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून सुरु करण्यात आले आणि दोन ते तीन वर्षांपूर्वी पूर्ण झाले. मात्र इतके वर्षे काम सुरु असलेल्या या मार्गाच्या कामाच्या दर्जाच्या बाबत अनेकांनी प्रश्न निर्माण केला आहे. शासनाकडून सुमारे २०० कोटी रुपये खर्चून तयार करण्यात आलेल्या या मार्गाच्या दुरावस्थेमुळे प्रवासी व नागरिक संतप्त आहेत.

### इथे आहेत खड्डे

पाली मिनिडोअर स्थानक, देवन्हावे, मिरकुटवाडी, इमॅजिका, उंबरे, गोंदाव फाटा, दुधाने वाडी, वऱ्हाड, जांभुळपाडा प्रवेशद्वार, रासळ, पाली, जंगली पीर, वझरोली, बलाप व राबगाव या गावांजवळ खड्डे पडले आहेत. तसेच इतर ठिकाणी देखील कमी अधिक प्रमाणात खड्डे आहेत. यामुळे येथे वारंवार अपघात होतात.

> “एमएसआरडीसी प्रशासन अजून किती अपघातांची वाट बघणार आहे. रस्त्याची दुरवस्था व खड्ड्यांमुळे अनेक अपघात होत आहेत. अनेकांचा मृत्यू झाला अनेक जण गंभीर जखमी होत आहेत. मात्र, एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांना हे खड्डे दिसत नाहीत. वारंवार विधायक पद्धतीने आंदोलन करून देखील सुद्धा या ठिकाणी कोणतीच ठोस उपाययोजना केली गेली नाही. परिणामी एमएसआरडीसी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी व निषेध म्हणून सुधागड मनसेने थेट एमएसआरडीसीचे कार्यालय गाठले.
> - सुनील साठे, अध्यक्ष, मनसे, सुधागड तालुका”



## सार्वजनिक आरोग्य सचिवांची प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट



| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली येथे शुक्रवार (दि. ५) डिसेंबर रोजी रोजी इ. रविंद्रन, सार्वजनिक आरोग्य सचिव, महाराष्ट्र राज्य, डॉ. अशोक नांदापूरकर, उपसंचालक संचालक, परिमंडळ ठाणे विभाग, डॉ. आनंद गोसावी, जिल्हा आरोग्य अधिकारी, अलिबाग रायगड डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुणालय अलिबाग रायगड, यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली येथे भेट देऊन प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली येथील इमारतीची पाहणी केली.बाह्य रुग्ण विभागात उपस्थित रुग्णांची सुसंवाद साधून त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात मिळणाऱ्या आरोग्य सुविधांबद्दल, विचारणा केली. डॉ. अपर्णा खेडेकर, तालुका आरोग्य अधिकारी, डॉ. सायली मानकर, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली व प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली येथील स्टाफ उपस्थित होता.

## रेल्वेमध्ये एका खातेदाराला नोकरीची मागणी




| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत येथे मध्य रेल्वेकडून नवीन कारशेड बनविले जात आहे. त्यासाठी नऊ किलोमीटर परिसरात उभारण्यात येणाऱ्या कारशेडसाठी तीन एकर जमीन रेल्वेकडून खरेदी करण्यात आली आहे. मात्र त्या जमिनीचा मोबदला अत्यंत कमी दिला असून शेतकऱ्यांच्या एका खातेदाराला प्रकल्पग्रस्त म्हणून नोकरीमध्ये संधी द्यावी अशी मागणी मनसेने केली आहे. दरम्यान या मागणीसाठी येत्या काही दिवसात आंदोलन करण्यात येईल आणि त्यावेळी कारशेडचे काम मनसे आणि शेतकरी बंद पाडतील असे जाहीर आव्हान रेल्वेला दिले आहे.

मध्य रेल्वेच्या मुंबई पुणे या मेन लाईनवरील भिवपुरी रोड ते कर्जत या मार्गावर मध्य रेल्वेकडून कारशेड उभारले जात आहेत. त्या कारशेड साठी सध्याच्या रेल्व मार्गाच्या बाजूला १०० ते १५० मीटर एवढी जमीन रेल्वेकडून घेतली जात आहे. सध्या ज्या जमिनीवर कारशेड उभे राहणार आहे त्या जमिनीवर किरवली, उमरोली, चिंचवली या तीन ग्रामपंचायतीमधील शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत. त्या जमिनीवर १०० टक्के प्रमाणात भाताची शेती केली जाते. हिवाळ्यात या भागातील जमिनीवर कडधान्य शेती केली जाते. त्यामुळे पूर्णपणे शेतीसाठी वापरात असलेल्या जमिनीवर कारशेड उभारले जात असून त्या जमिनीवर नांगर फिरवण्यास रेल्वेकडून सुरु झाला आहे. हि जमीन मिळावी यासाठी रेल्वेकडून शेतकऱ्यांना आर्थिक आमिषे दाखवून खरेदी केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती किरकोळ रक्कम पडणार असल्याने शेतकऱ्यांनी जितेंद्र पाटील यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची मागणी केली आहे. याबाबत शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाच्या प्रकल्प उभारण्यासाठी घेतली जात असल्याने सर्व शेतकरी प्रकल्पग्रस्त बनतात. कारशेडसाठी जमिनी घेणाऱ्या रेल्वेकडून सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना रेल्वेमध्ये एका खातेदाराला नोकरी द्यावी अशी मागणी केली आहे. येत्या आठ दिवसात मनसेकडून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या नोकरी देण्याच्या प्रश्नी सकारातमक निर्णय घेतला नाही तर मनसेकडून आंदोलन उभे केले जाईल इशारा जितेंद्र पाटील यांनी दिला आहे.

## निवासी शिबिराचे उद्‌घाटन

**तळा :** जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित हिवाळी सात दिवसीय निवासी शिबिराचा उद्‌घाटन सोहळा चरई बुद्रुक येथे उत्साहात पार पडला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून तळा सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश गवई, गटविकास अधिकारी महादेव शिंदे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य पुरुषोत्तम मुळे होते. शिबिराचा विषय विकसित भारतासाठी युवकांचे योगदान असा ठरविण्यात आला असून, या माध्यमातून स्वच्छ भारत, सुंदर भारत, स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण संरक्षण आदी विषयांवर विविध उपक्रम घेण्यात येणार आहेत.

## ‘आधुनिक हिंदी मूल्य चिंतन’परिषदेचे आयोजन

| माणगाव | प्रतिनिधी |

द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगावयेथे आधुनिक हिंदी साहित्याच्या प्रवाहातील मूल्यपरंपरा, सामाजिक परिवर्तन आणि नव्या आव्हानांचा वेध घेणारी राष्ट्रीय परिषद (दि.१३) डिसेंबर रोजी भरणार आहे. प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई आणि माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद होत असून, हिंदी साहित्य क्षेत्रातील अभ्यासकांसाठी हा एक महत्त्वपूर्ण बौद्धिक मेळावा ठरणार आहे.

परिषदेच्या उद्‌घाटन सत्राला डॉ. शीतला प्रसाद दुबे, डॉ. अनिल सिंह, प्रो. डॉ. संतोष मोटवानी यांसारखे राष्ट्रीय ख्यातीचे विद्वान उपस्थित राहणार आहेत. तसेच माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, कृष्णा भाई गांधी, प्रा. बाळासाहेब कोकाटे, प्रा. अनिल काळे, प्रा. सुभाष जाधव, प्रा. मोहसिन खान, प्रा. विद्या शिंदे, प्रा. सुभाष पवार, प्रा. ईश्वर पवार, प्रा. युवराज मुळे, डॉ. देवीदास बामणे, डॉ. के. के. शर्मा, डॉ. वंदन जाधव, प्रा. आर. गोपाळकृष्णन, डॉ. एस. ए. मंजुनाथ उपस्थित रहणार आहेत.

## विमानतळामुळे परिसरातील वाहतुकीत बदल

| पनवेल | प्रतिनिधी |

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरातील वाहतूक आणि दळणवळण व्यवस्था पूर्णपणे बदलणारे महत्त्वाकांक्षी प्रकल्प वेगाने पूर्णत्वाकडे जात आहेत. यात विमानतळाच्या पूर्व प्रवेशद्वारासाठी तयार होणारा मईस्टर्न एंट्री इंटरचेंजफप्रकल्प अंतिम टप्प्यात पोहोचला असून, येत्या सहा महिन्यांत हा मार्ग वाहतुकीसाठी सुरू होण्याची शक्यता आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या ८०० कोटी रुपयांच्या निधीतून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ या प्रकल्पाचे काम करत आहे. क्लोव्हर लीप इंटरचेंजमुळे पनवेल शहर, खांदेश्वर रेल्वे स्थानक परिसर आणि जेएनपीटी बंदरातून येणाऱ्या कंटेनर वाहतुकीला मोठा दिलासा मिळणार आहे. या प्रकल्पामध्ये फुलपाखराच्या आकाराचा विना-सिग्नल उड्डाणपूल आणि जोडरस्त्यांचे मोठे जाळे तयार केले जात आहे. या उड्डाणपुलामुळे गाढी नदीवरील खाडीमार्ग ओलांडून कंटेनर थेट विमानतळाच्या कार्गो प्रवेशद्वारापर्यंत विना-अडथळा पोहोचू शकतील, अशी या मार्गाची रचना करण्यात आली आहे.

ईस्टर्न इंटरचेंजच्या धर्तीवर विमानतळाच्या उलवा बाजूस वेस्टर्न एंट्री इंटरचेंज या प्रकल्पाचे कामही सुरू आहे. या इंटरचेंजमुळे अटल सेतूवरून मुंबईच्या दिशेने आलेल्या वाहनांना थेट विमानतळ गाठणे शक्य होणार आहे. उड्डाणपूल, गोलाकार चौक आणि उंच मार्गांच्या जाळ्यामुळे नवी मुंबई आणि पनवेलचा विमानतळाशी अखंडित संपर्क साधला जाणार आहे. ही पायाभूत सुविधा पनवेल शहराच्या विकासाला मोठी गती देणारी ठरणार आहे. या प्रकल्पामुळे पनवेल शहरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. सायन-पनवेल महामार्ग, मुंबई-गोवा महामार्ग आणि अटल सेतू-पामबीच मार्गावरून येणाऱ्या प्रवाशांना विमानतळापर्यंत थेट पोहचता येणार आहे.

## सुकापूरात रोजगार मेळाव्याला मोठा प्रतिसाद

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

किड्स गार्डन शाळा सुकापुर या ठिकाणी रविवारी ( दि.७) भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होत. या रोजगार मेळाव्याचे उद्घाटन माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये अतुल म्हात्रे आर्किटेक्ट आणि राजेश गणेश केणी तसेच विविध कंपन्यांचे एचआर यांच्या माध्यमातून करण्यात आले.

टाटा स्ट्राईव्ह, एलअँडटी. एलआयसी, एचडीएफसी, आयसीआयसीआय बँक, कोटक बँक रिलायन्स यासारख्या एकूण २२ कंपन्यांनी या रोजगार रोजगार मेळाव्यामध्ये उपस्थिती दर्शवून हा मेळावा यशस्वी करण्यामध्ये हातभार लावला. यावेळी राजेश केणी यांनी आपल्या मनोगतात भविष्यात जाणीव उंच भरारी घेऊन अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवणार असल्याचे सांगितले.

४०० पेक्षा जास्त तरुण-तरुणींनी या रोजगार मेळाव्याला भेट दिली शेकडो विद्यार्थ्यांच्या इंटरव्यू झालेले आहेत आणि अनेकांना या माध्यमातून नोकरी मिळणार आहे. या कार्यक्रमाला जाणीव सामाजिक संस्थेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी अतुल म्हात्रे, रोशन पाटील, सिताराम मस्कर, किशोर पाटील, प्रभाकर केणी, स्वप्नील भुजंग, संदीप म्हसकर, संजय केणी, वामन शेळके, बाळाराम फडके, एम.सी.पाटील, संदीप यादव, संतोष यादव, केशव चिलगर, दिनकर गुंजाळ, आळवे, सागर जगताप, आकाशजी ढसाळ, आठवणकर, राजश्री पाटील, रिया पाटील, रेखा बागुल, मोहन शिंदे, अमरचंद शिवकर, प्रज्ञा उबाळे, प्रसाद पिंगळे, प्रकाश पोपटा, दीपक किरवडकर, अमित गायकर, विकास भोकरे, गुर्जर आदि मंडळी उपस्थित होते.

**गावठीवालासह पुणेरी वाल्याच्या शेंगांना मागणी | कोकणातील पार्टीला अनेक वर्षाची परंपरा**

## उरणमध्ये सुटलाय पोपटीचा घमघमाट

| उरण | प्रतिनिधी |

गुलाबी थंडीत शरीराचे चोचले पुरविण्यासाठी खवय्ये निरनिराळे फंडे शोधत असतो. रायगडात थंडीची चाहूल लागताच ठिकठिकाणी पोपटीचा चविष्ट घमघमाट सुटू लागल्याने खवय्ये कमालीच खूष झालेले आहेत. या पोपटीमुळे वालासह पुणेरी वर्ण्याच्या शेंगांना मागणी वाढू लागली आहे.

हिवाळ्याचा काळ म्हणजे डिसेंबर ते फेब्रुवारी जेव्हा थंडी असते तेव्हा भाज्याही पिकतात, तेव्हा कोकणातील गावी शेतात मोकळ्या जागेत ही पोपटी शिजवली जाते. यामधील मुख्य घटक म्हणजे वालाच्या शेंगा, बटाटे, वांगी, मिरची, सुरण, अंडी, चिकन मसाले. या सर्व भाज्या आणि मसाले एकत्र करून एका मोठ्या भांड्यात ज्याला पोपटी म्हणतात भरले जातात आणि ते भांडे



मातीमध्ये किंवा शेकोटीत गाडले जाते. त्यामुळे त्याला एक खास चव येते. मित्रांसोबत किंवा कुटुंबासोबत निसर्गाच्या सानिध्यात एकत्र येऊन थंडीचा आस्वाद घेतला जातो.

कोकणातील अनेक वर्षाची परंपरा आहे. रात्री शेताची राखण करण्यासाठी जमलेले शेतकरी थंडीपासून वाचवण्यासाठी आणि जागे राहण्यासाठी विरंगुळा म्हणून ही पार्टी करत असत, पार्टीचे वैशिष्ट्य म्हणजे शेतात पिकणाऱ्या हंगामी भाज्यांचा वापर करून वापर करून मेजवानी केली जाते. भाज्या शेंगा भांबुर्डीचा पाला याचा वापर करून शेतकरी पोपटी करत असत. शेतात किंवा मोकळ्या जागेवर छान शेकोटी पेटवून धमाल गप्पा जुन्या आठवणी गाण्यांच्या मैफिली रंगून ही पार्टी साजरी करतात.

पोपटी शाकाहारी तसेच मांसाहारी हे दोन्ही प्रकारात केली जाते. दरम्यान गप्पा रंगतात गाण्याच्या मैफिली रंगवल्या जातात, थंडीच्या दिवसातच पोपटी पार्टी होत असल्याने कुटुंबातील लहान थोर पोपटीच्या शेकोटीजवळ शेक घेत बसतात. अर्धा ते पाऊण तासाने पोपटी करणारे जाणकार मडक्यावर थोडे पाणी शिंपतात चरर असा आवाज झाला की पोपटी शिजली असे समजते. भांबुर्डेचा पाला व ओव्याचा भाजका असा खरपूस गंध पोपटीला असल्यामुळे आणि तेल व पाणी न वापरता केलेला पदार्थ असल्यामुळे पोपटी पचायला हलकी असते.त्यानंतर पोपटी शिजल्यानंतर मडके बाजूला काढून पोपटी मोठ्या परातीत काढून त्याच्यावर प्रत्येक जण ताव मारतो.

आधुनिक भाषेत बोलायला गेलो तर ही एक कॅम्प पद्धत आहे. थंडीच्या हंगामात कोकणात अनेक वर्षापासून चालत आली आहे. अंधारात निसर्गाच्या सानिध्यात अप्रतिम चवीच्या या गरमागरम पदार्थाचा आस्वाद घेण्याची मजा काही औरच असते. उरण तालुक्यात आता थंडी मोठया प्रमाणात असून पोपटीची पार्टी सर्वत्र होताना दिसून येत आहे.

# माथेरानमध्ये भंडारा उत्साहात

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरानचे ग्रामदैवत असलेल्या श्री पिसारनाथ महाराज यांचा भंडारा सोहळा वर्षाच्या डिसेंबर महिन्यातील दुसऱ्या मंगळवारी साजरा झाला.या निमित्ताने माथेरानमध्ये चार पाच हजार भाविक वार्षिक भंडारा कार्यक्रमाला हजर होते.

माथेरान येथे शारलॉट लेक तलावाच्या बाजूला श्री पिसारनाथ महाराज यांचे मंदिर आहे. भगवान शंकराचा अवतार समजल्या जाणाऱ्या श्री पिसारनाथ महाराज यांचा मंगळवार हा पूजाअर्चा यांचा वार असतो. या मंदिरात असलेले श्री पिसारनाथ महाराज हे माथेरानकरांचे ग्रामदैवत म्हणून ओळखले जातात. याच मंदिरात श्रावण महिन्यात गावकीचे वतीने अभिषेक घालण्यात येत असतो. माथेरानमधील लग्न होऊन गेलेल्या मुली आणि बाहेर राहण्यास गेलेले ग्रामस्थ हे भंडाराचे निमित्ताने माथेरानमध्ये येत असतात. या सोहळ्याला आज सकाळपासून सुरुवात झाली आणि शेकडो संख्येने भाविक सकाळ पासून मंदिराच्या सजावटी पासून भंडारा महाप्रसाद बनविण्यात व्यस्त होते.किमान चार ते पाच हजार भाविकांनी महाप्रसाद घेतला असून यावर्षी



नेहमीपेक्षा अधिक गर्दी भंडारा सोहळ्याला उपस्थित होती.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-ममदापूर ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून विकसनासाठी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं/ हिस्सा नंबर | क्षेत्र चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| जयवंत रामदास सांळुके व इतर | १५२/१६ | २७८ चौ.मी. | २७.८० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील जमिन मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे विकसनाचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

## पनवेल महानगरपालिका

**सार्वत्रिक निवडणूक - २०२५**

**प्रारूप मतदार यादी प्रसिद्धीची सुधारित सूचना**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५ करिता मा. राज्य निवडणूक आयोगाने उपरोक्त विषयावरील संदर्भाधिन पत्रान्वये २९ महानगरपालिकांच्या सार्वजनिक निवडणुकांकरिता मतदार यादीचा सुधारित कार्यक्रम खालीलप्रमाणे घोषीत केलेला आहे.

| अ. क्र. | निवडणूकीचा टप्पा | दि. २६/११/२०२५ च्या पत्रानुसार निर्धारित केलेले दिनांक | सुधारित दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रारूप मतदार यादीवर दाखल हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करून प्रसिद्ध करणे | १०/१२/२०२५ | १५/१२/२०२५ |
| २ | मतदान केंद्राच्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध करणे | १५/१२/२०२५ | २०/१२/२०२५ |
| ३ | मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करणे | २२/१२/२०२५ | २७/१२/२०२५ |

स्वाक्षरी /-
**(मंगेश चितळे)**
**आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

## वाहतूक पोलिसांकडून विद्यार्थ्यांना धडे

**उरण :** उरण वाहतुक शाखेकडून वेश्वी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मंगळवारी (दि.९) रस्ते सुरक्षा व वाहतूक शिस्त याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. रस्ता ओलांडताना डावीकडे-उजवीकडे पाहण्याचे महत्त्व, झेब्रो क्रॉसिंगचा वापर, शाळेच्या बसमध्ये चढताना-उतरताना सुरक्षितता, सायकल चालविताना डाव्या बाजूने चालणे, हेल्मेटचे महत्त्व, रस्त्यावर धावत-पळत न जाणे, मोठ्या वाहनांपासून अंतर ठेवणे, मोबाईल/हेडफोन वापरून रस्ता न ओलांडणे याबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच रस्त्यावर अपघात दिसल्यास लगेच शिक्षकांना सांगणे, १०० किंवा ११२ वर कळवणे याबाबतही प्रबोधन करण्यात आले.यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना पोलीस उपनिरीक्षक उध्दव सोळंके यांनी मार्गदर्शन केले.

## यु.ई.एस.कॉलेजतर्फे जनजागृती

**उरण :** यु. ई. एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीच्या राष्ट्रीय सेवा योजना तसेच रेड रिबन क्लब आणि इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण हॉस्पिटल, उरण यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिन व पंधरवडानिमित्त एड्स विषयी जन जागृती शिबिराचे आयोजन केले गेले.कार्यक्रमाला इंदिरा गांधी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाबासो काळेल, समुपदेशक महादेव पवार, लॅब टेक्निशियन तृप्ती परजणे, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख, शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरणचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाबासो काळेल यांनी विदयार्थ्यांना एचआयव्हीचा इतिहास, एचआयव्ही होण्याची कारणे, गैरसमज याविषयी माहिती दिली.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## बाळगंगा नदी धरण प्रकल्प, ता. पेण

**कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र. २ कोकण भवन, नवी मुंबई.**

**जाहीर नोटीस**

क्रमांक :- उविअ/भूसं./कात १/बा.न.ध.प्र./निधवली, गागोदे खुर्द/नोटीस/२०२५,
दिनांक :-०१/१२/२०२५

ज्याअर्थी बाळगंगा नदी धरण प्रकल्पासाठी (पुनर्वसन) मौजे निधवली, गागोदे खुर्द, ता. पेण, जि. रायगड येथील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी करणेबाबत शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण-०३/२०१५ प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ बाळगंगा नदी धरण प्रकल्पासाठी (पुनर्वसन) मधील तरतुदी अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र. २ कोकण भवन, नवी मुंबई यांचेद्वारे व यांचे नाव घेणेबाबत प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

आणि त्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी रायगड यांचे आदेश क्र. भूसंपादन/टे-६/६९९५०/मौजे निधवली, वरसई, गागोदे खुर्द/२०२३ दिनांक २०/०२/२०२३ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तद्बुषंगिक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एल. क्यू. एन. ०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ व शासन शुद्धीपत्रक दिनांक २७ नोव्हेंबर २०१७ अन्वये कार्यवाही करणेची आहे. त्याअर्थी आता,

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी श्री. प्रविण पवार, उपविभागीय अधिकारी पेण या द्वारे,

अ. अनुसूची एक मध्ये नमुद खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र.२ कोकण भवन, नवी मुंबई यांच्याद्वारे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

ब. प्रकल्पासाठी जमिन थेट खरेदी करताना जिल्हास्तरीय समिती मार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या शेड्यूल-१ च्या तरतुदीनुसार संपादित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५% रक्कम वाढीव देवून, मोबदला निश्चित करण्यात येईल.

क. संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणांप्रमाणे खाजगी वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र. २ कोकण भवन, नवी मुंबई यांचे द्वारे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतचे संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

२. संबंधित भूधारकांनी हि जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी पेण यांचेकडे दाखल करावीत.

३. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी पेण यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी पेण यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**मिळकतीचे वर्णन तालुका :- पेण जिल्हा : रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे. आर. | खरेदी करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | गागोदे खुर्द | १६ | ० | ०.०९.०० | ०.०९.०० |
| २ | गागोदे खुर्द | २१५ | १ | ०.२४.४० | ०.२४.४० |
| ३ | गागोदे खुर्द | २८९ | ० | ०.०८.६० | ०.०८.६० |
| ४ | गागोदे खुर्द | २९० | ० | ०.१२.६० | ०.१२.६० |
| ५ | गागोदे खुर्द | ३३८ पै. | ० | ०.३३.८० | ०.११.४० |
| ६ | गागोदे खुर्द | ३४३ | ० | ०.२३.८० | ०.२३.८० |
| ७ | गागोदे खुर्द | ३४४ | ० | ०.०२.०० | ०.०२,०० |
| ८ | गागोदे खुर्द | ३४५ | ० | ०.३६.४० | ०.३६.४० |
| ९ | गागोदे खुर्द | ३४८ | ० | ०.३१.४० | ०.३१.४० |
| १० | गागोदे खुर्द | ३७५ | ० | ०.२०.२० | ०.२०.२० |
| ११ | गागोदे खुर्द | ३९६ | ० | ०.४३.५० | ०.४३.५० |
| १२ | गागोदे खुर्द | ३९७ | ० | ०.०७.०० | ०.०७.०० |
| १३ | गागोदे खुर्द | ४०५ | ० | ०.३२.९० | ०.३२.९० |
| १४ | गागोदे खुर्द | ४१० | ० | ०.५६.८० | ०.५६.८० |
| १५ | गागोदे खुर्द | ४११ | ० | ०.११.६० | ०.११.६० |
| १६ | गागोदे खुर्द | ४१४ | ० | २.००.६० | २.००.६० |
| १७ | गागोदे खुर्द | ४१५ | ० | ०.०८.८० | ०.०८.८० |
| १८ | गागोदे खुर्द | ४१२ | अ | २.५०.१० | २.५०.१० |
| १९ | निधवली | २० | ० | ०.११.६० | ०.११.६० |
| २० | निधवली | ३० | १ | ०.०२.३० | ०.०२.३० |
| २१ | निधवली | ३० | २ | ०.३८.२० | ०.३८.२० |
| २२ | निधवली | ३३ | ० | ०.०४.०० | ०.०४.०० |
| २३ | निधवली | ३५ | ० | ०.४८.५० | ०.४८.५० |
| २४ | निधवली | ३७ | ० | ०.१६.७० | ०.१६.७० |
| २५ | निधवली | ३८ | ० | ०.०२.०० | ०.०२.०० |
| २६ | निधवली | ४० | ० | ०.०४.०० | ०.०४.०० |
| २७ | निधवली | ४१ | ० | ०.०८.६० | ०.०८.६० |
| २८ | निधवली | ४२ | ० | ०.११.०० | ०.११.०० |
| २९ | निधवली | ४३ | ० | ०.०३.०० | ०.०३.०० |
| ३० | निधवली | ४५ | ० | ०.०५.०० | ०.०५.०० |

दिनांक :- ०१/१२/२०२५
ठिकाण : पेण

**सही/-**
**(प्रविण ज्ञानु पवार)**
**उपविभागीय अधिकारी पेण**
**उपविभाग पेण**



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन



१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स

**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## हरकत नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील श्री. सुरेश जगन्नाथ घरत, मु. बामणोली ता. अलिबाग यांच्या ताबेकब्जा वहिवाटीची खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत असून सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे -

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| १) बामणोली ता.अलिबाग | १७७ | बिनशेती ५-०६-०० | ५०.६० |

सदर वर वर्णनांकीत मिळकत आमचे अशिल श्री.सुरेश जगन्नाथ घरत यांनी वर नमुद मिळकतीचे पुर्वगामी मालक श्री. अजय बाळकृष्ण सावंत यांचेकडून दि. २५-१०-२००१ रोजीच्या पावती करारान्वये मोबदला रक्कम देऊन खरेदी केलेली आहे. व तेव्हापासून सदर मिळकत आमचे आशिलांचे अखंड ताबे-कब्जा वहिवाटी खाली आहे. व सदर मिळकतीचा उपभोग आमचे अशिल घेत आहेत. सदर मिळकतीचे विद्यमान मालक आमच्या अशिलांचा वहिवाट हक्क डावलून परस्पर त्रयस्थ इसमांना विक्री करणार असल्याचे व त्याबाबतचा विक्रीचा करारनामा आमच्या अशिलांनी विश्वासात न घेता करण्यात आला असल्याचे आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे. सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही कसल्याही प्रकारचा व्यवहार करु नये. त्यास आमचे अशिलांची सक्त कायदेशीर हरकत राहील. या उपरही सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचे खरेदीखत, बक्षिसपत्र, साठेकरार, वचनचिठ्ठी, सामंजस्य करार केल्यास त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत असून असा कोणताही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :-०९-१२-२०२५

सही/-
**ॲड. विक्रांत वि. पाटील**
म्हात्रोळी, अलिबाग-रायगड
मो.नं. ८३२९४६१५४०
/९४०३६५१४३६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती सदर मिळकतींचे विद्यमान मालक श्री. वेडा शिमगा माळी यांचे कडुन खरेदी घेण्याचे निश्चीत केले आहे. सदर मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

**मौजे भोनंग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भुमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|
| ३६० | ०-६३-४० | ६.६९ |
| ३६५ | ०-१४-७० | ०.५९ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेची हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकती विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : १०/१२/२०२५

**ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे**
''अन्नपूर्णा'' मु. पो. धोकवडे,
ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळिवण्यांत येते की, मौजे बिरवाडी, ता. रोहा, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या नांवे असलेली खालील वर्णनाची भातशेती मिळकती माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र.व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) | विद्यमान मालक /कब्जेदार |
|---|---|---|---|---|
| १. बिरवाडी ता. रोहा | ५७ | ०-३९-०० पो.ख.०-०२-५० एकूण ०-४१-५० | ९.०० | श्री. राजेंद्र गजानन विचारे रा. चणेरा, ता. रोहा, जि. रायगड. |
| २. बिरवाडी ता. रोहा | ५६ | ०-५८-०० पो.ख.०-०१-०० एकूण ०-५९-०० | १३.३७ | १. श्री. विनायक उर्फ विनोद रा. नागे २.सौ. जयश्री जगदीश नागे, दोघे रा. विद्यानगर, ता. अलिबाग, जि. रायगड. |

सबब सदरहू भातशेती मिळकती निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू भातशेती मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/१२/२०२५

सही/ -
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, मौजे डोणे, ता- कर्जत, जि - रायगड येथील जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक गीतांजली राजेश डेरे रा - १७०२ अमेझेरा, कारेस रोड, रॅनेवॉल प्लाझा, वर्तक नगर ठाणे, वेस्ट ठाणे पिन ४००६०६ यांची खालील वर्णन केलेली जमीन मिळकततीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १७ | ४/ब | एकुण क्षेत्र-०.३०.०० हे.आर.पॉ. | ४.४२ |
| १७ | २ | एकुण क्षेत्र-०.५१.८० हे.आर.पॉ. पैकी विकत देत असलेले क्षेत्र ०.३०.०० हे.आर.पॉ. | ७.१२ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक गीतांजली राजेश डेरे यांनी सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने आमचे आशिलास विकत देण्याचे ठरवलेले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

दिनांक १०/१२/२०२५

**अॅंड भारत अंकुश सांवत**
(बी कॉम.एल.एल.बी)
पत्ता - मु पो मोठे वेणगाव
ता- कर्जत जि - रायगड
संपर्क क्रंमाक ९५५२२९६६२२

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे खोपणेखार, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्रीमती तुळसा सुरेश भगत, राहणार खोपणेखार, ता. अलिबाग, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलादरम्यान झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील **श्रीमती तुळसा सुरेश भगत**, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| खोपणेखार, ता. अलिबाग. | २३/२ | ०-३५-९० ०-०१-८० पो.ख. ०-३७-७० एकूण | ३-०० |

अलिबाग,
दिनांक : ०९/१२/२०२५.

सही/-
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे शिवनगर, ता. माणगाव, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| शिवनगर ता. माणगांव जि. रायगड | ६०/१ | वरकस ०-०४-०० पो.ख.०-०१-०० एकुण ०-०५-०० | ०.०३ |
| | ५९/१ | वरकस ०-४६-०० पो.ख. ०-४०-०० एकुण ०-८६-०० | ०.२२ |
| | ५९/२ | वरकस ०-६१-०० पो.ख. ०-४२-०० एकुण १-०३-०० पैकी ०-८९-३० | ०.२८ |
| | ४५/१ | जिरायत ०-१५-०० पो.ख. ०-०३-०० एकुण ०-१८-०० | ०.७६ |
| | ४५/२ | जिरायत ०-१८-४० पो.ख.०-०९-६० एकुण ०-२८-०० | ०.७६ |
| | ४५/३ | जिरायत ०-०४-६० पो.ख.०-००-०० एकुण ०-०४-६० | ०.३३ |
| | ६०/४ | वरकस ०-१३-०० पो.ख. ०-००-०० एकूण ०-१३-०० | ०.०६ |

वर नमुद जमिन मिळकती या नोटीसीचा विषय आहेत.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकती हया विद्यमान मालक श्री. अविनाश यशवंत खोपकर यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक - ०९/१२/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस लक्ष्मी नारायण,
पहिला मजला, गाळा नं.७ व
८, ब्राम्हण आळी, राम मंदिर
समोर, ता. अलिबाग, जि.
रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस/सर्व संबंधितांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-अलिबाग,ता.अलिबाग, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं.४२६, क्षेत्र-२७८.४३ चौ.मीटर), सत्ताप्रकार-सी, तसेच सिटी सर्व्हे नं.४२६/के, क्षेत्र-११३.७० (चौ.मीटर), सत्ताप्रकार-ए, या जमिन मिळकतींसह त्यामध्ये असलेले पडीक व मोडकळीस आलेले अलिबाग नगर परिषद घर मालमत्ता क्र. ३९५, संगणकीकृत मालमत्ता क्र. Z1MKT000473 क्षेत्र-१६९ (चौ.मीटर) अश्या मिळकती विद्यमान मालक-श्री. अरविंद शंकर राऊत, व इतर-९ यांच्या मालकीच्या आहेत.

आमचे अशिलांनी सदर मिळकती कायमस्वरुपी खरेदी घेण्याची बोलणी विद्यमान मालकांबरोबर केली असून, सदर मिळकती पूर्णतःनिर्वेध व बिनजोखमी असल्याबाबचा हवाला विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क-हितसंबंध, व्यवहार, कोणतेही दस्त, वाद-विवाद, जाण्यायेण्याचे मार्ग, वहिवाटीचे हक्क अगर कसलेही अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून चौदा (१४) दिवसांचे मुदतीत माझ्याकडे खालील नमूद पत्त्यावर लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल सदर मिळकतींचा व्यवहार विद्यमान मालकांबरोबर पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक :- १०-१२-२०२५

सही/-
**(ॲड.अनिकेत दत्तात्रेय खोत)**
पत्ता-लिगल असोसिएट्स, मेघ अपार्टमेंट शॉप नं.१
जिल्हाधिकारी रायगड-अलिबासमोर,
ता.अलिबाग, जि.रायगड मो.क्र.९७६७३७६४६३

# भारताचे मिशन विश्वचषक

## द. आफ्रिकेविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० मालिका आजपासून रंगणार



**। कटक । वृत्तसंस्था ।**

शुभमन गिल आणि हार्दिक पांड्या यांच्या पुनरागमनामुळे बलाढ्य बनलेला गत चॅम्पियन भारतीय संघ मंगळवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सुरू होत असलेल्या पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्याद्वारे पुढच्या वर्षी फेब्रुवारीत भारतात खेळल्या जाणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या तयारीला वेग देणार आहे.

विश्वचषकाआधी भारत दहा टी-२० सामने खेळणार आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सामने आटोपल्यानंतर न्यूझीलंडविरुद्ध पाच सामन्यांची मालिका खेळली जाईल. त्यानंतर विश्वचषकात भारताचा पहिला सामना वानखेडे स्टेडियमवर ७ फेब्रुवारी रोजी अमेरिकेविरुद्ध होईल. या दोन्ही मालिकांचा उद्देश स्पष्ट असेल. विश्वचषकाआधी खेळाडूंची भूमिका निश्चित करणे आणि उपयुक्त संयोजन तयार करण्यावर भर असेल.

मागच्या वर्षी विश्वचषक जिंकल्यापासून भारताने दमदार कामगिरी केली आहे. विश्वचषकात सलग आठ आणि एकूण २६ सामने जिंकले. यात आशिया चषकातील सलग सात विजयांचाही समावेश आहे. या काळात भारताने केवळ चार सामने गमावले. तथापि, एकही टी-२० मालिका गमावलेली नाही. भारताने टी-२० विश्वचषकाच्या फायनलमध्ये ज्या द. आफ्रिकेला नमविले, त्याच संघाविरुद्ध आणखी यशस्वी कामगिरी करण्याचे लक्ष्य आखले आहे. शुभमन गिल सज्जमानेच्या दुखापतीतून पूर्णपणे सावरल्यानंतर भारताचा टी-२० उपकर्णधार शुभमन गिल दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या आगामी टी-२० मालिकेत पुनरागमन करण्यासाठी सज्ज झाला आहे.

अष्टपैलू हार्दिक पांड्याच्या पुनरागमनामुळे आशिया चषक जिंकताना संघाने अवलंबलेली रणनीती आणि संतुलन पुन्हा प्रस्थापित होईल. त्याने सुरुवातीच्या षटकांत गोलंदाजी केल्याने संघाला अनेक पर्याय मिळतात, असे भारताचा टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव याने सांगितले. हार्दिक डाव्या अंगठ्याच्या दुखापतीमुळे एशिया चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात खेळू शकला नव्हता. यानंतर त्याने सय्यद मुश्ताक अली करंडक स्पर्धेत दमदार पुनरागमन केले.पुढील वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषकापूर्वी हार्दिकचे योग्य वेळी झालेले पुनरागमन संघासाठी दिलासादायक मानले जात आहे.

सूर्यकुमार म्हणाला की, मला वाटते तुम्ही आशिया चषकामध्येही पाहिले असेल की, जेव्हा हार्दिक नव्या चेंडूने गोलंदाजी करत होता, तेव्हा अंतिम संघासाठी आम्हाला अनेक पर्याय आणि नवे संयोजन आजमावण्याची संधी मिळत होती. तो संघाला पर्यायांसह संतुलनही देतो. मोठ्या सामन्यांत आणि आयसीसी स्पर्धांमध्ये त्याचे प्रदर्शन आणखी उत्कृष्ट होते. हा अनुभव खूप मोलाचा ठरतो. त्याच्यामुळे संघाला निश्चितपणे चांगले संतुलन मिळते.हार्दिक एक दिवस आधी कटक येथे पोहोचला होता आणि बाराबती स्टेडियमवर त्याने स्वतंत्र सरावही केला. त्याने ऐच्छिक सराव सत्रात भाग घेतला नसला तरी सूर्याने स्पष्ट केले की, हार्दिक आणि शुभमन गिल निवडीसाठी पूर्णपणे उपलब्ध आहेत. सध्या दोघेही पूर्णपणे तंदुरुस्त दिसत आहेत, असे सूर्यकुमार म्हणाला.

भारतासाठी हा सामना फेब्रुवारीत होणाऱ्या टी-२० विश्वचषकापूर्वीची सुरुवात आहे. पण, सूर्याच्या मते, या विश्वचषकाची तयारी खूप आधीच सुरू झाली होती.

---

## निवडक

### २१ डिसेंबरला महिला मॅरेथॉन

**पनवेल :** पनवेल महानगरपालिकेच्या साहाय्याने रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलने यावर्षीही रोटरी-महिला मॅरेथॉन २१ डिसेंबर रोजी वडाळे तलाव पनवेल येथे आयोजित केली आहे. दरवर्षी महिलांसंबंधीत अनेक विषय घेऊन होणाऱ्या या मॅरेथॉनला पनवेलमधील महिलांचा आतापर्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आला आहे. या वर्षीची मॅरेथॉन रन फोर वोट अशी आगळी वेगळी संकल्पना घेऊन येत आहे. पनवेल व परिसरातील लोकांमध्ये मतदानाविषयी जागरूकता आणि जागरूकता अभियानात महिलांचा सहभाग हेच या मॅरेथॉनचे उद्दिष्ट आहे. सहभागी महिलांना अनेक पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. पनवेलमधील डॉ .गिरीश गुणे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या या संस्थेने आजवर अनेक उत्तम प्रकल्प रोटरी घनदाट जंगल, वडाळे तलाव गणपती विसर्जन घाट हे पनवेलकर वासियांसाठी आणि सभोवतालच्या परिसरात राबविले आहेत. पनवेल परिसरातील महिलांना विनंती आहे की जास्तीत जास्त संख्येने या मॅरेथॉनमध्ये सहभागी व्हावे आणि शासनाच्या मतदान जागरूकता अभियानाला हातभार लावावा अशी विंनती प्रेसिडेंट रो. अनिल ठकेकर यांनी केली आहे.

### आशिया कपमध्ये सूर्यवंशी तळपणार

**नवी दिल्ली :** भारताचा स्फोटक फलंदाज वैभव सूर्यवंशी याला सैय्यद मुश्ताक अली ट्रॉफीतून अचानक मोकळं करण्यात आलं. तो बिहार संघात उपकर्णधार म्हणून खेळत होता. वैभवला अचानक या स्पर्धेतून मोकळं करण्यामागे १९ वर्षांखालील आशिया कप स्पर्धा असल्याचे बोलले जात आहे. आशिया कपची सुरुवात तीन दिवसांनी १२ डिसेंबर रोजी होत आहे. वैभव आयुष म्हात्रे याच्या नेतृत्वात टीम इंडिया मैदानात उतरेल. या टुर्नामेंटचा पहिला सामना भारत विरुद्ध युएई संघात होत आहे. अर्थात या आशिया कपमध्ये सर्वांचे लक्ष वैभव सूर्यवंशीच्या तडाखेबंद खेळीकडे लागलेले आहेत. वैभव सूर्यवंशीने यापूर्वी रायझिंग टुर्नामेंटमध्ये जलवा दाखवला आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये येत्या रविवारी, १४ डिसेंबर रोजी महासंग्राम होईल. अंडर-१९ आशिया कपसाठी दोन्ही संघ भिडतील. या सामन्यात वैभवची बॅट तळपण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. दुबईतील आयसीसी ॲकडमी ग्राऊंडवर हा सामना होणार आहे. या सामन्यात वैभव पाकिस्तानी गोलंदाजांचा फज्जा उडवणार असल्याचा दावा करण्यात येत आहे. त्याची फलंदाजी पाहण्यासाठी चाहते आसुसले आहेत.

### मिनी लिलावात ३५० खेळाडूंवरच बोली

**दुबई :** आयपीएल २०२६ मिनी लिलावासाठी दहाही फ्रेंचायझी सज्ज झाल्या आहेत. २०२५ मेगा लिलावात संघ बांधला होता. मात्र त्यातील उणीवा दूर करण्याची वेळ आता आली आहे. त्या दृष्टीने फ्रेंचायझींनी काही खेळाडूंना रिलीज केलं आहे. काही खेळाडूंना रिटेन केलं आहे. तर ट्रेड विंडोच्या माध्यमातून रिकामी जागाही भरून काढली आहे. आता उर्वरित संघाच्या बांधणीसाठी फ्रेंचायझी मिनी लिलावात बोली लावणार आहे. १६ डिसेंबर रोजी अबू धाबीत मिनी लिलाव प्रक्रिया पार पडणार आहे. या लिलावासाठी १३५५ खेळाडूंनी नाव नोंदवलं होतं. पण त्यापैकी आता फक्त ३५० खेळाडूंवरच बोली लागणार आहे. कारण बीसीसीआयने फ्रेंचायझींशी सल्लाम सलत करत त्यापैकी १००५ जणांना बाहेरचा रस्ता दाखवला आहे. आता मिनी लिलावासाठी ३५० खेळाडूंची अंतिम यादी तयार आहे. बीसीसीआयने ८ डिसेंबरच्या रात्री आयपीएल फ्रँचायझींना लिलावाची माहिती ईमेलद्वारे दिली. ३५० खेळाडूंसाठी १६ डिसेंबर रोजी दुपारी २.३० वाजता अबू धाबी येथे बोली लागेल. ३५० जणांच्या यादीत ३५ खेळाडू असे आहेत की त्यांनी शेवटच्या काही मिनिटांमध्ये या यादीत एन्ट्री घेतली आहे. म्हणजे त्या लिलाव प्रक्रियेचा भाव नव्हते. या नव्या खेळाडूंच्या यादीत दक्षिण अफ्रिकेचा विकेटकीपर क्विंटन डिकॉक याचंही नाव आहे. डीकॉकसह या ३५ खेळाडूंना फ्रँचायझींच्या शिफारशींवरून अंतिम लिलाव यादीत समाविष्ट केल्याचं बोललं जात आहे.

### आयपीएलची अर्थव्यवस्था कोसळली!

**चेन्नई :** २०२५हे आयपीएलच्या व्यावसायिक मूल्यासाठी हे वर्ष अत्यंत निराशाजनक ठरले आहे. एका वर्षात आयपीएलच्या संपूर्ण इकोसिस्टमच्या ब्रँड व्हॅल्यूमध्ये ६,६०० कोटी रुपयांची मोठी घसरण नोंदवली गेली आहे.ब्रँड फायनान्सच्या ताज्या आकडेवारीनुसार, आयपीएलची ब्रँड व्हॅल्यू मागील वर्षीच्या १२ अब्ज डॉलरवरून थेट २०% ने कमी होऊन ९.६ अब्ज डॉलर झाली आहे. भू-राजकीय तणाव आणि मेगा-लिलावामुळे निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे ही मोठी घसरण झाली आहे. डी अँड पी ॲडव्हायझरीच्या अहवालानुसार, लीगच्या व्हॅल्यूएशनमध्ये सलग दोन वर्षांची घट झाली आहे. २०२३ मध्ये आयपीएलची व्हॅल्यू ९२,५०० कोटी रुपये होती, जी २०२४ मध्ये ८२,७०० कोटी रुपये झाली, तर २०२५ मध्ये ती आणखी कमी होऊन ७६,१०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. मीडिया कंपन्यांचे एकत्रीकरण आणि रिअल मनी गेमिंग प्रायोजकांवर सरकारी निर्बंध आल्यामुळे आयपीएलच्या जलद वाढीला ब्रेक लागल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले आहे.

---

## एमसीए निमंत्रित स्पर्धेतील क्रिकेट सामन्यांना रायगड जिल्ह्यात शुभारंभ



**। पोयनाड । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकोणीस वर्षाखालील मुलांच्या आंतरजिल्हा दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेला काल रायगड जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण गव्हाण पनवेल येथे शुभारंभ करण्यात आला.

यावेळी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, परेश ठाकूर, उपाध्यक्ष राजेश पाटील छत्रपती शिवाजी महाराज नगर क्रिकेट अकॅडमीचे अध्यक्ष अमित कडू खजिनदार सुजित ठाकूर, सुमित झुंझारराव उपस्थित होते. बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशन विरुद्ध दक्षिण विभाग ह्या सामन्याचे आयोजन यावेळी करण्यात आले होते. दुसरा सामना रिलायन्स क्रिकेट मैदान नागोठणे येथे ट्रिनिटी क्रिकेट अकॅडमी विरुद्ध हिंगोली जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांमध्ये आयोजित करण्यात आला, तर तिसरा सामना,नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केटस रसायनी पाताळगंगा येथील मैदानावर सातारा जिल्हा क्रिकेट असोसिएशन विरुद्ध वायएमसीए क्रिकेट क्लब यांच्या मधील सामन्याला शुभारंभ करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यात गतवर्षी पासून सातत्याने एमसीएच्या आंतरजिल्हा इन्व्हिटेशन क्रिकेट स्पर्धा होत असल्याने युवा क्रिकेट खेळाडूंना आपला खेळ दाखवण्याची संधी आरडीसीएच्या वतीने देण्यात येत आहे.एमसीए इन्व्हिटेशन स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्यातील पंच व गुणलेखक काम पहात आहेत.

## स्मृती मानधना पुन्हा क्रिकेटच्या मैदानात

**मुंबई :** भारतीय महिला संघाची वर्ल्ड चॅम्पियन उप कर्णधार स्मृती मानधना पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानात उतरण्याच्या तयारीत आहे. गेल्या काही दिवसांपासून वैयक्तिक आयुष्यातील गोष्टींमुळे चर्चेत असल्यामुळे टीम इंडियाची क्वीन श्रीलंकेविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत खेळणार का? असा प्रश्न निर्माण झाला होता. जे काही झालं ते सर्व मागे टाकून स्मृती मानधना कणखर मानसिकतेसह पुन्हा एकदा मैदानात उतरण्यास तयार आहे. सोशल मीडियावर तिचा सरावादरम्यानचा एक फोटो व्हायरल होताना दिसत आहे. या फोटोमुळे २१ डिसेंबरपासून रंगणाऱ्या टी-२० मालिकेसाठी ती भारतीय संघातील निवडीसाठी उपलब्ध असल्याचे संकेत मिळत आहेत. आता स्मृती पुन्हा एकदा कणखर मानसिकतेसह मैदानात उतरण्यास सज्ज आहे.

## उरणच्या मयंकचा नवा विक्रम




**। उरण । प्रतिनिधी ।**

उरणचा १२ वर्षीय मयंक म्हात्रे याने भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी हे २४ किमी अंतर पोहुन पार करत नवा विक्रम स्थापित केला आहे. मयंक भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी पोहून पार करणारा पहिला जलतरणपटू ठरला आहे. याआधी त्याने धरमतर ते करंजा आणि घारापुरी ते करंजा हे प्रवाह पोहून पार केले आहेत. तर त्याने पोहून पार केलेले तिनही प्रवाह प्रथम पोहून पार करण्याचा नोंद मयंकच्या नावाने झाली आहे.

उरण सेंटमेरीज कॉन्व्हेन्ट स्कुलमध्ये इयत्ता सातवीमध्ये शिकणाऱ्या मयंक दिनेश म्हात्रे याने नवा विक्रम स्थापित केला आहे. भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी हे २४ किमी अंतर त्याने ७ तास २१ मिनिटे ६ सेकंद या वेळेत पार करून आपल्या विक्रमची नवी नोंद केली आहे. मयंक भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी पोहून पार करणारा पहिला जलतरणपटू ठरला आहे. महत्वाचे म्हणजे मयंकने याआधी धरमतर ते करंजा जेट्टी हे १८ किमी अंतर पोहून पार केले. हा प्रवाह पोहून पार करणारा तो पहिला जलतरणपटू होता. तर घारापुरी ते करंजा जेट्टी हे १८ कमी अंतर पोहून पार करणारा देखील तो पहिला जलतरणपटू ठरला. सलग तीन वर्षे मयंकने तीन समुद्रीय प्रवाह पोहून ओर केल्याने तो या तीनही प्रवाह पार करणारा पहिला जलतरणपटू ठरला आहे.

> बदलते हवामान आणि खडतर प्रवास यातून कुठेतरी मयंकाचा आजचा विक्रमी प्रवास मी थांबवण्याच्या पवित्र्यात होतो. मात्र मयंकची जिद्ध आणि इव्हेन्ट पूर्ण कारण्यासाठीची तळमळ पहाता त्याला त्याच्या प्रयत्नासाठी साथ दिली. त्याने केलेला विक्रम भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी पोहून पार करणारा तो पहिला जलतरणपटू ठरला आहे. तर याआधी केलेले धरतर ते करंजा आणि घारापुरी ते करंजा हे दोनही प्रवाह पोहून पार करणारा तो पहिला जलतरणपटू ठरला आहे. त्याला परदेशातील एक तरी चॅनल पोहताना पहायचं आहे.
> – दिनेश म्हात्रे, ( मयंकचे वडील )

सोमवारी पहाटे ३:५५ वाजता भाऊचा धक्का येथून मयंकने समुद्राच्या लाटांवर झेप घेत नव्या विक्रमाला सुरुवात केली. पहाटेचा काळोख, गार हवा, पान्याच्या लाटा त्यातच मोठमोठ्या बोटींचा येणारा अडथळा यातून मार्ग काढत त्याने निर्धारीत वेळेत विक्रम पूर्ण केला आहे.

---

### राज्यस्तरीय कराटे लीग स्पर्धा

## मास्टर भूपेंद्र मार्शल आर्ट्स अकॅडमीचे यश

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

विजन मार्शल आर्ट्स अँड स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने आयोजित 'महाराष्ट्र कराटे लीग २०२५' ही राज्यस्तरीय भव्य स्पर्धा उत्साहात पार पडली. या प्रतिष्ठित स्पर्धेमध्ये पुणे, रायगड, औरंगाबाद, दौंड, पिंपरी-चिंचवड अशा विविध जिल्ह्यांमधून १५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.यात भूपेंद्र मार्शल आर्ट्स अकॅडमीची भव्य पदक कमाई केली आहे.




विजेत्या मुलींमध्ये ऋत्विका नागळे, स्नेहल आडव यांना सुवर्ण, रुही उमेश जाधव , श्रेया राजपूत, स्वरा नानासाहेब पिसाळ यांना रौप्य, वैदेही बाणाईत, नंदिनी कारंडे, मृणाल वाढवळ, सृष्टी जाधव, श्रिया कोरे, अक्षया बनसोडे,सान्वी कदम,निशा सरदार आणि दीक्षा घाग यांनी कांस्य पदक पटकावले.

मुलांमध्ये प्रमोद परशुराम थोबरे सुवर्ण, संबुद्ध कांबळे, करन सत्रे, अनिमिष सुपेकर, सोहम मोहिते, प्रियांश कचरे, रुतुराज ठाकूर, अंश पागार, मल्हार कोकणे यांनी रौप्य पदक पटकावले. आदेश कोकणे, कृष्णल पिंगळे, आरव तांबे, देवांश दुबे, पवन सत्रे, सर्वेश चौधरी, दर्शन कोकणे, अर्णव घोरपडे, असद पठाण, सवर शेट्टी, सिद्धार्थ सुपनेकर, मयांक पालांडे, अनुराग शिखरे, अर्णव पाटील, मंथन रोटे, शौर्य शेट्टी, ईशांत डोंगरे यानी कांस्य पदक पटकावले.

स्पर्धेचे उद्घाटन नगराध्यक्षा आनंदी जगताप, माजी नगरसेवक गणेश जगताप, नगरसेविका स्मिता जगताप, दत्ता झुरंगे, अविनाश मोरे, कीर्ती पाटील, भूपेंद्र शिवाजी गायकवाड, प्रशिक्षक आदित्य खंडिझोड, अथर्व ढमाळ, आणि टीम समन्वयक नेहा ननावरे यांच्या उपस्थितीत झाले.

## माणगाव प्रीमियर लीगचा भव्य शुभारंभ



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव प्रीमियर लीगचे दिमाखदार उद्घाटन माणगाव तालुका क्रिकेट असोसिएशनचे संस्थापक ॲड.राजीव साबळे यांच्या हस्ते मोर्बा रोडवरील धनसे मैदानात संपन्न झाले. तेजस्वी प्रकाशझोत, फटाक्यांची आतिषबाजी संगीताच्या निनादात आणि उत्साहाच्या जल्लोषात झालेल्या या उद्घाटन सोहळ्यास संघमालक, संयोजक, ३२ संघांचे कर्णधार, खेळाडू, मान्यवर आणि हजारो क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेची खास वैशिष्ट्ये म्हणजे विशाल आणि सुंदर सजवलेले मैदान, प्रेक्षकांसाठी प्रशस्त गॅलरी, खेळाडूंसाठी वेगवेगळ्या सुविधा, उच्च दर्जाचे थेट प्रक्षेपण, शक्तिशाली प्रकाशयोजना, सुरक्षिततेची उत्तम व्यवस्था, खानपानाची सोय, नेटके आणि शिस्तबद्ध नियोजन या सर्व सुविधा पाहून प्रेक्षक दररोज मोठ्या संख्येने येथे गर्दी करत आहेत.

या भव्य कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन करण्यासाठी संयोजक, स्वयंसेवक आणि संपूर्ण व्यवस्थापन टीम दिवसरात्र मेहनत घेत आहेत. खेळाडू व प्रेक्षकांकडूनही याला मोठा प्रतिसाद मिळत आहे. माणगाव प्रीमियर लीगची ही साखळी जसजशी पुढे सरकत आहे, तसतसे सामन्यांमधील रोमहर्षक लढती, चमकदार खेळी आणि कर्णधारांचे धोरणात्मक निर्णय यामुळे क्रिकेटप्रेमींमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

#### लाखो रुपयांची बक्षिसे खेळाडूंची धमाकेदार स्पर्धा

या स्पर्धेत विजेत्यांसाठी लाखो रुपयांची रोख बक्षिसे, आकर्षक मोटरसायकल, सायकल, ट्रॉफ्या आणि इतर अनेक पारितोषिकांची रेलचेल आहे. यामुळे खेळाडू आपले संपूर्ण क्रिकेट कौशल्य,अनुभव आणि दमदार खेळ पणाला लावून प्रेक्षकांची मने जिंकत आहेत. अनेक सामन्यांमध्ये शेवटच्या षटकापर्यंत रंगलेली चुरस पाहायला मिळत असून, संपूर्ण गाव-तालुका क्रिकेटच्या रंगात न्हाऊन निघाला आहे.

#### सहा दिवसांचा क्रिकेट जल्लोष

माणगाव प्रीमियर लीग हा दक्षिण रायगडातील सर्वात मोठा क्रिकेट महोत्सव बनला असून, दरदिवशी होणाऱ्या रोमहर्षक आणि उच्च दर्जाच्या सामन्यांसाठी प्रेक्षकांची गर्दी अक्षरशः उसळत आहे. सतत वाढणारे प्रेक्षक,मैदानावरचे रोमांचक क्षण आणि भरघोस पुरस्कारामुळे वातावरणात खऱ्या आयपीएल सारखी रंगत निर्माण झाली आहे.

---

### दिव्यांग क्रीडा महोत्सव संपन्न | पॅराक्रीडा गाजवणाऱ्यांचा केला सन्मान

## दहिसरमध्ये 'दिव्यांग' खेळाडूंनी जिंकली मने

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

डिसेंबर हा जागतिक दिव्यांग दिन. याच पार्श्वभूमीवर, स्नेहज्योत दिव्यांग सेवा प्रतिष्ठानतर्फे ७ डिसेंबर २०२५ रोजी दहिसर स्पोर्ट्स फाउंडेशन, दहिसर (पूर्व) येथे दिव्यांग क्रीडा महोत्सव २०२५चे भव्य आयोजन करण्यात आले.



संपूर्ण मुंबईतून आलेल्या सुमारे १३० दिव्यांग स्पर्धकांनी विविध खेळांत दमदार कामगिरी करत क्रीडांगणाचा आनंद लुटला आणि अनेक पारितोषिके पटकावली. गेल्या चार वर्षांपासून स्नेहज्योततर्फे हा महोत्सव सातत्याने आयोजित केला जात असून, खेळ हा फक्त शारीरिकदृष्ट्या सक्षम व्यक्तींपुरता मर्यादित नाही, दिव्यांग बांधवांनीही त्यातून आनंद घ्यावा आणि पॅराक्रीडेत पुढे यावे हा संस्थेचा ध्यास या उपक्रमातून प्रभावीपणे जाणवतो.

या वर्षी पॅराक्रीडेत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दोन क्रीडापटूंना स्नेहज्योत शक्तिशाली व्यक्तिमत्व पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. पॅरा-फेन्सिंगमध्ये गोल्ड मेडलिस्ट नीतू मेहता आणि स्विमिंग तसेच बास्केटबॉलमध्ये गोल्ड मेडलिस्ट तृप्ती चोरडिया यांना सन्मानपत्र व अकरा हजार रुपये असा मानसन्मान प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन संजय उपाध्याय, आमदार बोरिवली विधानसभा यांच्या हस्ते झाले. पारितोषिक वितरण समारंभ अनिता पाटील, संचालिका व मुख्य वनसंरक्षक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, तसेच माजी आमदार विनोद घोसाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

अनिता पाटील यांनी सर्व दिव्यांग स्पर्धकांच्या उत्साहाचे खास कौतुक करत, आव्हानांना न जुमानता स्पर्धात्मक भावनेने सहभागी होणाऱ्या प्रत्येक क्रीडापटूला राष्ट्रीय उद्यानाच्या वतीने सलाम असे सांगितले.

यासोबतच राष्ट्रीय उद्यानात सुरू होत असलेल्या छोट्या ट्रेनची एक दिवसाची मोफत सफर स्नेहज्योतच्या सर्व दिव्यांग सदस्यांना देण्याची घोषणा त्यांनी केली. तसेच विजेते स्पर्धक आणि शक्तिशाली व्यक्तिमत्व पुरस्कार विजेत्यांना विशेष पारितोषिक देण्याचेही त्यांनी आश्वासन दिले.

कौटुंबिक, सामाजिक व आर्थिक अडचणींना तोंड देत जगणाऱ्या दिव्यांग बांधवांना निखळ आनंदाचा एक दिवस देणेहा स्नेहज्योतचा उद्देश या महोत्सवातून साध्य झाला, असे संस्थेने नमूद केले. स्पर्धकांचे मनोबल वाढवण्यासाठी कार्यक्रमाला अभिनेता अविनाश नारकर, अभिनेत्री ऐश्वर्या नारकर, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सूक्ष्म जीवशास्त्रज्ञ डॉ. गिरीश महाजन, आदी उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)